# माधवानुज

861
Mod

८९५०

# माधवानुज

( कै. डॉ. काशिनाथ हरी मोडक, यांची कविता )

संग्राहक

**श्री. चिंतामण काशिनाथ मोडक**

बी. ए; एल् एल्. बी.

प्रस्तावना लेखक

**श्री. श्रीपाद महादेव माटे, एम्. ए.**

प्रकाशक

**गणेश महादेव आणि कंपनी**

६२१ गिरगांव रोड, मुंबई

एप्रिल, १९२४

किंमत दोन रुपये.

मुद्रक व प्रकाशकः-गणेश महादेव वीरकर

मुद्रणालयः-

'साहित्यसेवक छापखाना' ९५-९७ गिरगांव बॅकरोड, मुंबई

प्रकाशनालयः-

गणेश महादेव आणि कंपनी, ६२१ गिरगांवरोड, मुंबई

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| संग्राहकाचे दोन शब्द, प्रस्तावना, व माधवानुजांचें चरित्र. | १–३२ |
| १ परळीची आग. ... | ३३ |
| २ प्रीतीचा हलवा. ... | ३६ |
| ३ आशा. ... ... | ३७ |
| ४ पर्वती. ... ... | ३९ |
| ५ करमणूक. ... ... | ४० |
| ६ 'कुणिकडे.' ... ... | ४१ |
| ७ बर्न्स कवि. ... ... | ४३ |
| ८ कुबडी तीर्थ. ... | ४५ |
| ९ सज्जनगड. ... ... | ४८ |
| १० भवानी तलवार. ... | ५० |
| ११ पारिजातकाचें फूल.... | ५२ |
| १२ पद्यपंक्ति. ... ... | ५४ |
| १३ संध्याकाळची सहल.... | ५६ |
| १४ तेरड्याचें फूल. ... | ५८ |
| १५ आरोग्याप्रत.... ... | ५९ |
| १६ पुढें पुढें ! ... ... | ६२ |
| १७ दुष्काळ. ... ... | ६५ |
| १८ दगड फोडतांना. ... | ६६ |
| १९ जात्यावर बसून. ... | ६८ |
| २० मुलांचा कोंडवाडा. ... | ७० |
| २१ जाईचीं फुलें. ... | ७२ |
| २२ गाय विकत देतांना.... | ७३ |
| २३ धुकें. ... ... | ७५ |
| २४ कावळ्यास उद्देशून.... | ७७ |
| २५ काय कमी कविला!... | ७८ |
| २६ थंडी. ... ... | ७९ |
| २७ पोवाडे. ... ... | ८० |
| २८ लाजरी. ... ... | ८२ |
| २९ गुडीपाडवा.... ... | ८३ |
| ३० कागदी पतंग. ... | ८५ |
| ३१ किती पर्वती दूर राहिली | ८७ |
| ३२ चितूर. ... ... | ८९ |
| ३३ निधनगीत. ... ... | ९० |
| ३४ प्रेम. ... ... | ९१ |
| ३५ सरस्वतीची प्रार्थना.... | ९३ |
| ३६ रूढीचा प्रभाव. ... | ९५ |
| ३७ कवि आणि कल्पना. | ९७ |
| ३८ महाराष्ट्र भाषेचा विलाप. | ९९ |
| ३९ दुष्काळग्रस्ताचे सुस्कारे! | १०१ |
| ४० पर्जन्याप्रत. ... ... | १०३ |
| ४१ कोकिलाची वाणी ऐकून | १०४ |
| ४२ गोड स्वप्न.... ... | १०५ |
| ४३ भंगलेली मुरली. ... | १०८ |
| ४४ सत्य आणि प्रेम. ... | १०९ |
| ४५ स्फुट श्लोक.... ... | १०९ |
| ४६ तुळसीदास.... ... | ११३ |
| ४७ ही रम्या वनभूमिका. | ११७ |
| ४८ कृष्णाकोयनांचा संगम. | ११९ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| ४९ साहचर्यप्रेम. ... | १२१ |
| ५० माझी आई. ... | १२२ |
| ५१ पश्चात्ताप. ... ... | १२९ |
| ५२ मणिशंकरास. ... | १३२ |
| ५३ तस्कराप्रत. ... | १३३ |
| ५४ हा ओढा काय म्हणतो? | १३४ |
| ५५ मित्राची तसबीर. ... | १३५ |
| ५६ भवान्या. ... ... | १३८ |
| ५७ स्मृतिचित्र. ... ... | १४० |
| ५८ विरोधाभास. ... | १४२ |
| ५९ विसरलेलें गाणें. ... | १४४ |
| ६० त्रिवेणी—संगम ... | १४५ |
| ६१ प्रश्नोत्तरमाला. ... | १४७ |
| ६२ शरयूतटाक. ... | १४९ |
| ६३ दीपविसर्जन. ... | १५१ |
| ६४ दोन ध्वनि. ... ... | १५३ |
| ६५ तुळस आणि सब्जा. | १५४ |
| ६६ सांत्वन. ... ... | १५५ |
| ६७ प्रियेचे अश्रू. ... | १५७ |
| ६८ स्मशानगीत. ... | १५८ |
| ६९ अळवावरचें पाणी. ... | १६० |
| ७० नामलेख. ... ... | १६१ |
| ७१ फुलांचा झेला. ... | १६३ |
| ७२ भगवद्गीता. ... | १६५ |
| ७३ थिऑसफिकल सोसा० | १६६ |
| ७४ जादूचा प्रभाव. ... | १६७ |
| ७५ गुरांचा वाडा. ... | १६८ |
| ७६ अंबानदीच्या तीरावर. | १७० |
| ७७ खंडाळयाचा घाट. ... | १७२ |
| ७८ अशोक वृक्षास पाहून सुचलेले विचार. | १७३ |
| ७९ वनवास. ... ... | १७५ |
| ८० कवि आणि कोकिळ. | १७६ |
| ८१ मूर्तिभंजन. ... ... | १७७ |
| ८२ मराठी ग्रंथकारांचें संमे० | १७८ |
| ८३ वनभोजन. ... ... | १७९ |
| ८४ नवीन वधुवरांचें स्वागत. | १८२ |
| ८५ पलीकडे काय आहे ? | १८३ |
| ८६ चिमणी. ... ... | १८४ |
| ८७ दिवाळीचा सण ... | १८६ |
| ८८ काल, कीर्ति आ० विस्मृति | १८७ |
| ८९ बालकवीचा गौरव. ... | १८८ |
| ९० माझ्या लहानपणीची बाग | १८९ |
| ९१ कावळयांची कावकाव. | १९१ |
| ९२ मधमाशी. ... ... | १९२ |
| ९३ जीवितसाफल्य. ... | १९३ |
| ९४ आत्मयज्ञ. ... ... | १९६ |
| ९५ मूर्तिकार. ... ... | १९७ |
| ९६ कवि आणि मयूर. ... | २०० |
| ९७ फुलांतला वास. ... | २०३ |
| ९८ मुलींची विद्येची भूपाळी. | २०४ |
| ९९ उषास्वप्न. ... ... | २०५ |
| १०० छत्रसाल आणि शिवाजी यांची भेट. ... | २०८ |
| १०१ विषवृक्ष. ... ... | २११ |
| १०२ समाधि आणि जाईची वेल. ... | २१३ |
| १०३ भाऊबीज. ... | २१४ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १०४ लहानमुलें. ... | २१६ |
| १०५ जाईजुईचें भांडण.... | २१७ |
| १०६ देवाचे दूत. ... | २१८ |
| १०७ बाऊ! ... ... | २२० |
| १०८ तीन वृत्ति. ... | २२३ |
| १०९ सोनचांपा आणि निवडुंग. ... | २२५ |
| ११० सुरवंटांस पाहून सुचलेले विचार. ... | २२७ |
| १११ गाण्याची उत्पत्ति.... | २२९ |
| ११२ धन्य कोण ? ... | २३१ |
| ११३ रानांतलें फूल. ... | २३२ |
| ११४ सदोदित!... ... | २३४ |
| ११५ विंचू. ... ... | २३५ |
| ११६ जीवाचें अमरत्व. ... | २३७ |
| ११७ शरत्काल.... ... | २३७ |
| ११८ तारेची प्रणयपत्रिका. | २४० |
| ११९ शकुंतलेची प्रणयपत्रिका | २४७ |
| १२० तेव्हां आणि आतां | २५४ |
| १२१ नैवेद्य. ... ... | २५५ |
| १२२ वाणीचा उपयोग ... | २५६ |
| १२३ भूत, भविष्य आणि वर्तमान. ... | २५७ |
| १२४ श्रेष्ठज्ञान. ... ... | २५८ |
| १२५ गीतांजलि. ... | २५९ |

**मायर्स पंप्स् व त्यांचे सुटे भाग**

फारच स्वस्त भावानें मिळण्याचें ठिकाण

**धि लिमये ब्रदर्स लिमिटेड,**

८ हमाम स्ट्रीट, मुंबई, व २९ पोलाक स्ट्रीट, कलकत्ता.

**Telephone No.**
**24636.**

**Telegrams:**
**"INVEST," Bombay.**

FOR BUYING & SELLING GOVT. SECURITIES

**PLEASE APPLY TO**

# BHIDE SONS & Co.

BANKERS & BROKERS

57 APOLLO STREET, FORT,

## BOMBAY.

OUR ACTIVITIES:

I Deal in Govt. Securities, Port Trust & Municipal Bonds.

**Maintain regular stocks.**

II Buy & sell Shares on account of customers only.

III Arrange loans & Deposits for short & long periods at favourable rates.

IV Accept Savings bank a/cs @5% & deposits on better terms.

V Negotiate Hundies & arrange Foreign Exchanges

Trial orders solicited.

**V. J. BHIDE**, B. Com.
Proprietor

# संग्राहकाचे दोन शब्द

ती. कै. माधवानुज यांची समग्र कविता संकलित अशा स्वरूपांत प्रसिद्ध करण्याचें कार्य त्यांचे हयातींतच व्हावयाचें तें त्यांचे पश्चातहि कांहींना कांहीं अडचणीमुळें आजवर लांबणीवर पडलें याबद्दल वाईट वाटतें.

माधवानुजांची कविता मुख्यतः करमणूक, काव्यरत्नावली, मनोरंजन व किरकोळ अशा वि. ज्ञा. विस्तार, चित्रमयजगत्, नवयुग, आनंद, धर्मजागृति वगैरे मासिकांत आल्या असून 'गीतांजलि' हीं पद्यें मात्र केसरींत प्रसिद्ध झालीं आहेत. प्रत्येक कवितेचें प्रसिद्धीस्थळ निर्णयात्मक असें उपलब्ध नसल्यानें तें दिलें नाहीं. प्रकाशनाचा काल मात्र क्रमवार देण्याचा शक्य तितका प्रयत्न केला आहे.

या काव्यसंग्रहास जोडलेलें कविचरित्र लिहिण्याचें अवघें श्रेय त्यांतील माहिती पुरविणारे कविमित्र ती. रा. किरात, ती. अनंततनय व इतर मित्र यांजकडेच आहे. श्री. श्रीपाद महादेव माटे यांनीं वेळांत वेळ काढून अगत्यपूर्वक प्रस्तावना लिहिली याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

छपाईच्या दृष्टीनें ग्रंथप्रकाशनाचें काम शक्य तितक्या आस्थेनें करून सरस्वतीभक्तांपुढें सादर केलें आहे तें त्यांनीं गोड करून घ्यावें असें इच्छितों.

कल्याण, हनुमानजयंति,<br>ता. १९ एप्रिल, १९२४.

**चिं. का. मोडक**

## गणेश महादेव आणि कंपनीचीं पुस्तकें.

| | |
|---|---|
| १ स्वराज्याचा श्रीगणेशा. | २-४-० |
| २ स्वराज्याची घटना. | २-४-० |
| ३ स्वराज्याची स्थापना. | २-४-० |
| ४ स्वराज्याचा कारभार. | २-४-० |
| ५ स्वराज्यावरील संकट. | २-४-० |
| ६ मराठी रियासत, मध्य वि. ३ | २-४-० |
| ७ ब्रिटिश रियासत, पूर्वार्ध. | ३-८-० |
| ८ श्रीएकनाथ चरित्र. | ०-१२-० |
| ९ भक्तिमणिमाला. | १-८-० |
| १० अजिंक्य तारा. | १-८-० |
| ११ निकोलाय लेनिन. | ०-१२-० |
| १२ ग्रेट ब्रिटनची शासनपद्धति. | ०-१०-० |
| १३ नवजीवन ( नाटक ) | ०-१०-० |
| १४ जोसेफ मॅझिनी. | २-०-० |
| १५ महात्मा गांधी. | २-४-० |
| १६ मानवी कर्तव्यें. | १-०-० |
| १७ माधवानुज ( कविता ) | २-०-० |

### इतर पुस्तकें

| | |
|---|---|
| १ मराठी रियासत, पूर्वार्ध. | ३-८-० |
| २ मराठी रियासत, मध्यवि॰ २ | ३-०-० |

# प्रस्तावना

कै. काशीनाथ हरि मोडक हे मला स्नेही मानीत. मला त्यांच्याविषयीं प्रेम व आदर वाटे. त्यांच्या व माझ्या वयांत पुष्कळच अंतर होतें. पण एकाच आवडीच्या विषमवयस्क माणसांतसुद्धां स्नेहसंबंध रुजत जातो हें आपण सर्वत्र पहातों. तेंच प्रस्तुत ठिकाणीं झालें होतें. त्यांचे वडील चिरंजीव म्हणजे या पुस्तकाचे संपादक हे व धाकटे चिरंजीव रा. भालचंद्रपंत हेही माझे मित्र आहेत. या मित्रांची इच्छा अशी कीं, मी या माधवानुजांच्या कवितेच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहावी. मामूल पद्धति पाहिली तर ज्याची रसिकता सर्वप्रसिद्ध आहे, अशा एकाद्या थोर गृहस्थाला त्यांनीं हें काम सांगावें. पण त्यांनीं मला सांगितलें. माझ्या रसज्ञतेची किंमत ठरविण्याइतपत ते स्वतः मार्मिक व सुविद्य आहेत. असें असतां त्यांनीं सांगितलें तर नाहीं म्हणावयाचें मला कांहींच कारण नव्हतें. कारण संपादक थोड्यांत संतुष्ट होतील असें दिसतें. शिवाय मी जसा केवळ श्रमपरिहारार्थ काव्याचा चुटपुटता वाचक तसा कविही फार हावभरू नव्हे. माझ्यासारख्या सामान्य संसारी माणसाला ज्याची कविता कळून आनंद होईल; चित्ताला विरंगुळा वाटेल; आणि आपल्या लिहिण्याला दुर्बोधिता येईपर्यंत विचाराचा व भावनेचा बारकावा काढीत बसण्याची ज्याला मुळींच संवय नाहीं असा कवि असल्यामुळें या कामांत कांहीं डोईजडपणा आहे असें मला मुळींच वाटलें नाहीं. असो. या कारणामुळें निर्भय होऊन व माधवानुजांबद्दल मला जो प्रेमभाव वाटे त्याला वश होऊन मी पुढील चार शब्द लिहितों.

ही कविता वाचीत असतांना काव्यविषयाविषयीं विचार मनांत येण्याच्या ऐवजीं कविविषयींच जास्त येतात. कदाचित् कवीची प्रत्यक्ष ओळख होती त्यामुळें असें होत असेल. पण त्या विचारांतही एक ठळक विचार असा आहे कीं कवि भारीच कोवळ्या मनाचा असावा. करुणेची सावली सर्व काव्यावर पसरली आहे. या कवितेच्या तोंडावर कळा कसली आहे असें विचारलें तर ती करुणेची आहे असें उत्तर एकदम देतां येईल. कोणा एकाद्याची कविता हातापायांत खुळखुळे घातल्यासारखी म्हणजे केवळ चांगले ध्वनि काढणारी; कोणाची संयपणानें थोडें बोलून मनांत फार आहे

असें दाखविणारी; कोणाची उधळलेल्या तट्टावर बसून पोकळ नगारा वाजविणारी; कोणाची रविवर्म्याच्या सतार वाजवित बसलेल्या सरस्वतीच्या गंभीर व प्रसन्न चेहऱ्याची; अशा अनेक कवींच्या कवितांच्या अनेक परी आहेत. त्यांत माधवानुजांची म्हटली म्हणजे करुणेनें वरचेवर विव्हळ होणारी आहे असें दिसतें. या कवितेंत इतर रस नाहींत, असें नव्हे; पण जात कारुण्याची.

करुणास्पद जें जें कांहीं असेल त्याचें रूप दिसतांच कारुण्यवृत्तीला त्याचें आव्हान व्हावें अशी मनाची ठेवण व घडण मूळचीच बनलेली. करुणास्पद विषयांच्या शोधांत बळेन मन दवडणें हा कवीनें आपला पेशा बनविला होता असें मुळींच नाहीं. सहजगत्या जर तशी वस्तु पुढें आली तर मात्र तिच्यांतील दुर्भाग्यकळेनें कवीला त्या वस्तूची कनव यावी. कवीनें ' काव्य करणें ' हा आपला पेशा मानिला होता व म्हणून त्या त्या वृत्तीची समाधि लाविण्याचा मुद्दाम हेतु ठेविला होता असें नाहीं. मध्यम प्रतीचा संसारी गृहस्थ; शिक्षणाच्या मानानें मनाची मशागत मात्र फार झालेली; घरीं विद्यार्जनाची हौस; वडील माणसांकडून वाङ्मय, सद्विचार इत्यादीकडे ओंढा उत्पन्न झालेला; जुन्या संस्कृतीबद्दल आदरभाव; आपण कोणी ज्ञानी व जीविताच्या कांहीं मुलखानिराळ्या कल्पना बांधून बसलेले व म्हणून त्या अभिनिवेशानें रंगलेल्या दृष्टीनें इतरांपासून तुटून असणारे असे हे गृहस्थ नव्हत. इतरांशीं खेळीमेळीच्या व सहज सलोख्याच्या वृत्तीनें वागून आपला धंदा करीत रहावयाचें; घरेंदारें करावयाचीं; पैका कमवावयाचा; अवघ्याशीं भलेपणा ठेवावयाचा; आणि इतरांहून निराळेपणा कशांत ? तर जे जे जीवितांतले प्रसंग, क्षणमात्र आनंद-विषादांच्या सुखमय प्रवृत्ति उत्पन्न करून इतरांच्या डोळ्यांपुढून सपाट्यानें निघून गेले ते ते कायम धरून ठेवून, त्यांतील भावना वाङ्मयांत स्थिर करून, जें सुख इतरांनीं क्षणमात्र अनुभविलें व ज्याचा त्यांना पुन्हां पूर्ण विसर पडला, तें पुन्हा पुन्हा त्यांच्या अनुभवाला आणून देणें या कामांत. या कामांत कवीनें सुख मानिलें. सुख मानिलें इतकेंच नव्हे तर जास्तीची हाव धरिली नाहीं. म्हणून मी म्हणतों कीं, कवीनें आपल्या वृत्ति व शक्ति बरोबर अजमाविल्या होत्या, हें फार चांगलें झालें. आपापल्या गुणांची ओळख, त्यांच्या मर्यादांची जाणीव व त्यांच्या एकनिष्ठ

विलासांत पूर्ण समाधान हीं जर आपणां सर्वांना लाभलीं तर माणसाचें किती तरी हित होईल. यांत कवीनें फार दूरच्या गोष्टीकडे अगर अति विशाल अथवा सखोल अशा रपेटी केलेल्या नाहींत. सडकेनें जातांना एकादा माणूस कांठाच्या फुलेरी झुडुपाकडे उगाच ओझरता पहात पुढें निघून जातो; पण एकादा जरा वेळ थांबून त्यांचें सौंदर्य अनुभवितो व पुढें जातो. या दुसऱ्याला ममत्वाची कल्पना थोडी जास्त असते इतकेंच. फुलझुडुपें तो हुडकावयासही गेला नाहीं व तीं पाहिल्यावर त्याच्या मोहानें वेडाही पण झाला नाहीं. पण पाहून तसाच पुढें जाणारा मात्र नव्हे. हें या कवीच्या वृत्तीचें खरें वर्णन आहे असें मी समजतों. आपण कवि आहोंत ही गोष्ट माहीत असली तरी कविता करणें हा आपला जीवित–हेतु आहे, सृष्टीनें आपल्याला त्यासाठींच नेमिलें आहे, अगर आपल्या कवितेच्या जोरावर इकडला बाजार तिकडे भरणार आहे हें वेड कवीच्या डोक्यांत शिरलेलें नसल्यामुळें कविता–प्रसवाच्या प्रयत्नाला तो लागलेला दिसत नाहीं. असें मानल्यामुळें पुष्कळ कवींच्या कवितेंतील सहजपणा जाऊन थोड्या पुंजीची फरफट फार काढल्यासारखी त्यांची स्थिति होऊन कृत्रिमता उत्पन्न होते. तसेंच भलतेच अध्यारोप स्वतःवर केल्यामुळें सूक्ष्मदर्शक यंत्रामधून स्वतःकडे पाहण्याची संवय लागते. कारण ‘ कवींचा जीवित–हेतु मोठा असतो व आपण कवि आहों ’ ही विचारप्रणाली तो आपल्यापुढें धरतो व त्यांत वहावतो. माधवानुजांचें असें झालें नव्हतें. असे कवि अर्थातच आहेत कीं, ज्यांच्या मनाचा समावेश मोठा; ज्यांच्या चित्तवृत्तींचा आवेग मोठा; परिस्थितीच्या वाऱ्यानें ज्यांच्या हृदयांत पर्वतप्राय लाटा उठावयाच्या; ज्यांचें मनोमंथनही अतिशय फेंसाळ व ज्यांच्या शब्दांचे आवाजही फार गंभीर व दशदिशा गडगडत रहाणारे. यांना साधेपणा व थोडेपणा मुळींच माहीत नसावयाचा. एवढीशी लहान कल्पना असेना, तिचें ध्वनिस्वरूपांत उतरणें म्हणजे एक मोठा विधिसमारंभ असावयाचा; शिवाय ही कल्पना ते कधीं एकटी दुकटी–नटवून थटवूनच कां होईना–पण सोडावयाचे नाहींत. अशा अनेक एक करून मध्यस्तंबरूप अशी एक विशाल कल्पून, तिच्या आवतीं भोंवतीं यांना ते उभ्या करणार. विश्वांतले बडे बडे प्रश्न, तत्त्ववेत्त्यांच्या बुद्धीला लवकर वश न होणारे विचार यांच्या जंगल–सोडवणुकींत हे कवि गुंतलेले असावयाचे. त्यांची उंची मोठी, हात लांब;

इंद्रियांतून चित्तांत उतरलेल्या संस्कारांना परिस्फुटता न देतां तेथें दीर्घकाळ घोळत ठेवण्याची ताकतही मोठी, तसला कवि हा नव्हे. एकाद्या दांडग्या समुद्रांत बेशक हात टाकीत जाणारे, लाटांच्या उंचीवर उंच होणारे व खोलीबरोबर नाहींसे न होणारे, फेसाला दो दो हातांनीं तडाके देणारे, असे जबर पोहणारे आपण पाहतों. पण दुसरे असेही दिसतात कीं जे कांठापासून फार दूर न जातां पोहण्याचें सुख तेथें खुशाल अनुभवितात; लहान लहान कोलांट्या घेतात; आणि प्रेक्षकांच्या आश्चर्यवृत्ति जाग्या करणें हें आपलें काम नसून पोहण्याचें सुख अनुभविणें व इतरांस त्यांत कसें सुख आहे हें दाखविणें इतकेंच आपलें काम आहे असें मानित असतात. आमच्या कवीची जात ही होय.

प्रसाद हा कवीच्या चांगल्या गुणांपैकीं एक आहे. अत्यंत खोल अर्थ-सुद्धां उघड दाखविण्यासारखी शब्दरचना करणें हें, तो अर्थ मनांत पूर्णपणें बिंबवून घेऊन व बराच वेळ घोळत ठेवून, मग जे बोलतात त्यांना साधतें. ही जात फार उंच आहे. शिवाय असाही प्रकार कांहीं ठिकाणीं दिसतो कीं, अगदीं साधा अर्थ, कीं ज्याला चुचकारीत त्याच्यामागें फारसें शिणावें लागत नाहीं—तोही सांगावयास भली जाडी शब्दरचना करून त्या अर्थाला अवडंबरांतून बाहेर पडूं द्यावयाचें नाहीं. प्रस्तुत ठिकाणीं असें आहे कीं, अर्थ सर्वत्र साधा असला तरी पुष्कळ ठिकाणीं अत्यंत रमणीय; व शब्दरचना तर केवळ सरसकट परम रमणीय. शब्दांशीं झोंबी करण्याचें प्रयोजनच नाहीं. खास मराठीचाच उपयोग सर्वत्र आहे असें नव्हे पण 'संस्कृतं आश्रित्य' जरी असलें तरी वाचकाच्या समजशक्तीच्या अगदीं नजीकचें संस्कृत असावयाचें. संस्कृत व मराठी यांचा सांधून शब्द केला आहे तोही फार मधुर आहे. "मन्मनचोरा!" कवीच्या अतिशय गोड पद्यांतून तर ही उघड अर्थाची शब्दयोजना अधिकच लक्षांत भरण्यासारखी झालेली आहे. आरंभीं जो एक विचार लिहिला आहे कीं, सामान्य रसिकाची सोय या कवींत फार आहे तो येथेंही लागू आहे. मोठी मारामारी करावयास एवढी कोणाची तत्परता असणार ? आणि ती तरी कां तर अर्थ कळावा म्हणून ! सहज कळावा व आनंदासाठीं खर्चावयास मन शिल्लक रहावें अशी सर्वांचीच इच्छा असते. या दृष्टीनें पहातां माधवानुजांनीं साध्या वाचकांची सुद्धां सोय पाहिली आहे हें निर्विवाद आहे. या गुणाच्या लगतच दुसरा एक

गुण नेहमीं रहातो तो म्हणजे चांगल्या नादाचे शब्द घालणें. या गुणाच्या मागें लागून भारीच गुं गुं असे ध्वनि काढणें हें कोवळया वयाच्या व क्वचित्, वयानें वाढूनसुद्धां बाळपण न सोडलेल्या पुष्कळ कवींना फार आवडीचें वाटतें. त्यांची काव्यकल्पना कानाच्या पाळींतच सामावलेली असते. अवडंबरवाल्यांना जशी दिमाखखोरी तशी यांना नादलुब्धता. सुवास सुटला म्हणजे जसे भुंगे धावत यावे तसें कांहीं जादूनें या कवींना जर छोटीं छोटीं रंगीबेरंगी पाखराचीं रूपें दिलीं व एकाद्या पालवीचे घोस लोंबत असलेल्या गच्चीवर कोणी तानसेन बीन बोलवूं लागला तर हे सगळे भरारा त्याच्याभोंवतीं गोळा होतील व नादाच्या छायापडछायांना सुद्धां भुलून गेल्यावर एकमेकांकडे पाहून म्हणतील " गडे हो, आपण स्वतःस कवि समजतो पण आपण गाण्याचे हौशी आहोंत इतकेंच काय तें !" या ध्वनीच्या भुरळींतून बाहेर पडणें फार कठीण असतें. एक तर ती लवकर सोडीत नाहीं व दुसरें असें कीं सोडवून घेतांना तिच्या मोहनीच्या कांहीं डब्याबरोबर चोरून घेऊन बाहेर पडावें लागतें. नाहीं तर अशी रूक्षता यावयाची कीं प्रत्येक शब्दाच्या आवाजाला बरूची पिंजकी चिरफळी असावयाची ! प्रस्तुतचें या बाबतींतलें तोल संभाळण्याचें माधवानुजांचें कसब फार नामी आहे. शब्द साधे व कर्णमनोहर आहेत, त्यामुळें वाचलांना आनंद वाटतो. पहिल्या पहिल्या कवितांत शब्दांना सफाईदारपणा फारसा नाहीं. कवि घटावत आहे हें स्पष्ट दिसतें. पण पुढें बिनकृत्रिमान सुंदरपणा शब्दांना लाभलेला दिसतो.

चालींचें असेंच आहे. पूर्वीचीं वृत्तेंच त्यांनीं घातलीं आहेत. पण चित्त-वृत्ति जेथें विशेष प्रकारें खळबळतील तेथें वृत्तांच्या ताब्यांत रहाणें कठीण जातें हें एक व दुसरें पद्यांच्या चालीनें भावनांच्या व्यक्तीला जी मदत होते तिला वृत्तामुळें कवि मुकतो. म्हणून विशेष प्रसंगीं कवीनें पद्यांच्या चाली घातल्या आहेत त्यामुळें मूळ गोड अर्थाला रसाळपणा आला आहे. या रसाळपणामुळें त्यांचें एक पद्य मुलींच्या गाण्यांत कायम होऊन गेलें आहे. सातारा जिल्ह्यांत कृष्णा-कोयनांचा संगम आहे, त्यावर माधवानुजांनीं जी कविता लिहिली आहे ती अत्यंत लोकप्रिय झाली आहे. इतकी कीं, ' हें गाणें कोणी केलें आहे ' हें सुद्धां माहीत करून घेण्याची म्हणणारींची जिज्ञासा मावळून गेली आहे.

या कवीचें खरें बळ कशांत आहे ? खोल व उदात्त अशीं अर्थवचनें बोलण्यांत नाहीं. शब्दांच्या घोडदौडींत अगर ललकारणींत नाहीं. नवीन महामंत्र घेऊन आल्याच्या अभिनिवेशांत नाहीं. भव्य अशा पौराणिक अगर राजकीय कथानकाचें महाकाव्य रचण्यांतही नाहीं. तर जे प्रसंग डोळ्यांपुढें घडून येतात व तुम्ही आम्ही जे लगोलग विसरून जातों त्यांपैकीं मनोरम असतील त्यांना अचूक उचलून घेण्यांत म्हणजे विषयाची निवड करण्यांत. ही निवड विविध विषयांची असेल तर ती करावयास हृदय खरोखर सदैव ओलें पाहिजे. तें कोणच्याही हृद्य प्रसंगानें द्रवावें. विधवा म्हणजे सुस्वरूप विधवा दिसली म्हणजे वाईट वाटेल तर ज्याला तेव्हांच फक्त वाईट वाटतें तो तेवढ्या प्रसंगीं द्रवणारा कवि आहे असें म्हणावें. यापेक्षां त्याची जास्त स्तुति काय करतां येणार ? पण जर असा कोणी असला कीं, विधवा पाहूनही द्रवतो व भिकारणीला पाहूनही द्रवतो, आगींत सांपडलेली माणसें पाहून द्रवतो, दुकाळांतील कोंडलेलीं पोरें पाहून द्रवतो, दळावयास जवळ कांहीं नसलेली बाई जात्यावर बसलेली पाहून द्रवतो, खडी फोडणाराकडे पाहून द्रवतो तर तो या वरच्या पेक्षां कवित्वावर जास्त हक्क सांगू शकेल हें उघड आहे. त्याचें मन जेथें जेथें कळवळ्याची जागा सांपडेल तेथें तेथें कळवळेल. माधवानुजांच्या विषयनिवडीकडे पहावें म्हणजे ही सह–अनुभूति म्हणजे काय हें लगोलग दिसेल. लांड्या लुगड्याचा काचा मारलेली, इरलें पांघरलेली, डाव्या हातांत काठी घेऊन रुळावरून न झोक जातां सपाट्यानें चालत येणारी व ‘ एक पैसा ’ किंमतीचा रानकरवंदीचा द्रोण गिऱ्हाइकापुढें करणारी, खंडाळ्याच्या धुक्यांत मावळ्याची मुलगी पाहून कवीला समरस होतां येतें. कदाचित् वात्सल्याचा उमाळाही त्याला येत असेल. लहानपणापासून संभाळिलेली गाय पोट जाळण्यासाठीं विकतांना बिचाऱ्या शेतकऱ्याची काय अवस्था होत असेल हें पाहिलें म्हणजे कविता करावयास चांगला विषय आहे असें त्यांना वाटे. म्हणजे काय कीं, मन नेहमीं ताजेंतवानें व स्निग्ध. नवीन चित्र पुढें आलें कीं, त्यांतील रसरूप जीवाला कवीच्या रसज्ञ जीवानें ‘ ओळख पटली ’ म्हणून सांगावें. हा गुण या कवींत फारच उत्कटतेनें दिसून येतो. हेंच कवीचें खरें बळ आहे.

पण विषयाची निवड केल्यावर मात्र कवीनें त्या निवडीस अनुसरून विषयाचा मोठा झेला अगर गेंद बनविला आहे असें कोठेंही दिसत नाहीं. बागेंत हिंडतांना मधाळ व छानदार वासाचें फूल लांबून हेरलें; येथपर्यंतच माधवानुजांची रसिकता आहे; पुढें जाऊं शकत नाहीं. त्याच्या गाभ्यांत हलके हलके शिरून लहान फुलांचाही फुलोरा बनविणें त्यांना साधलें नाहीं. सुंदर कल्पना नेमकी हेरणें म्हणजेच विविधस्वरूप जीवितांतील विषयांशीं स्नेहभाव दाखविणें हें काम साधें नाहीं. तें न झाल्यामुळें अनेकांचीं पांडित्यें व प्रेषितपणाचीं अवसानें मरगळलीं आहेत. पण तेवढ्यानेंच भागत नाहीं. एरवीं बोलतांनासुद्धां कांहीं कांहीं माणसें एकादा शेलका विचार बोलून जातात पण त्याचा आगापिछा व त्याच्या शरीरांतील धागेदोरे यांचें पूर्ण शोधन, निरीक्षण व परस्परावलंब हीं त्यांजकडून झालेलीं नसतात. बौद्धिकरीत्या पिंजून पाहून त्याचें हें बोलणें झालेलें असतें असें नाहीं. अस्पष्ट कल्पनांच्या गर्दींतूनसुद्धां सामान्य सिद्धान्ताकडे सपाट्यानें झेपावत जाणें हा त्यांच्या मनाचा धर्मच असतो, त्यांना बारकावा कळो न कळो. माधवानुजांचें हृद्य विषयासंबंधीं असेंच आहे. तो कोठेंही असो. त्यांना त्याची वर्दी लागावयाची, व त्यांच्या चित्तांत दयेनें, प्रेमानें चलबिचल व्हावयाची. पण जर का तुम्हीं विचारिलें कीं ही चलबिचल मीमांसेनें सांगा, तर माधवानुच कुंठित होतील. मला वाटतें याचें कारण असें कीं, त्यांचें हृदय आंतून कितीही खळखळणारें असलें तरी त्यांचें मन पुरेसें समावेशदार नव्हतें. म्हणजे पुष्कळ गोष्टी मावणें व त्या फार वेळ मावणें. इंद्रियांतून आंत घेतलेल्या विषयाचें तिलक्याच सहानुभूतीनें अविरत चिंतन करून त्याच्या आंतर रूपरेषा ठळक व जास्त जास्त ठळक झालेल्या पहाणें हें त्यांना करतां आलें नाहीं, म्हणजे एकादी वस्तु फुलवीत नेणें त्यांना साधलें नाहीं. त्यामुळें विषयाचें नांव व आरंभ हीं पाहून वाचकाला फार आनंद होतो; पण पुढें त्याचा विस्तार लवकर गुंडाळलेला पाहून वाईट वाटतें. सहानुभूतीचें धुकें मनांत घनदाट भरे पण त्याला अवयव फुटणें झालें नाहीं. असो.


मनांत आलेली सुंदर कल्पना अगर पाहिलेलें चित्र सांगून अगर वर्णून झालें कीं, लगोलग कवि तात्पर्यही सांगावयास उतरतो. यामुळें तर फारच वाईट वाटतें. याचीं उदाहरणें सर्व पुस्तकभर पसरलीं आहेत. इतकेंच नव्हे

तर त्यांच्या उत्तम कवितांत हाच दोष आहे. आजूबाजूला लहान लहान फांद्या फुटून रसरशीत फुलरोपडा नीट सरळत जावा पण फोंफावला नाहीं तोंच बियाला यावा तसा हा तात्पर्यवाल्या कवितांचा प्रकार आहे. तात्पर्य सांगितलें नाहीं तरी कळतें इतकेंच काय तरच तें फार चांगलें दिसतें हा विचार कविलोकांत कायम होण्यास पुष्कळच वर्षे खर्ची पडलीं. आतां मात्र हें पटलेंसें दिसतें. पण माधवानुज जुन्या कविसांप्रदायापैकींच होते म्हणावयास हरकत नाहीं. ते तात्पर्य सांगत. असो. पण विकास नसणें व तात्पर्य सांगणें हा दोष जमेस धरूनसुद्धां वर सांगितलेल्या सहानुभूतीच्या जोरावर माधवानुजांनीं आपल्या कांहीं कांहीं कविता खरोखर अत्यंत सुंदर केल्या आहेत. पैकीं सर्वांत चांगली कविता म्हणजे ‘ दीपविसर्जन ’ ही होय. यांत वर्णिलेल्या प्रसंगाची कल्पनासुद्धां अत्यंत सुखाची वाटते. व तीवरून कवीची अभिरुचि सौन्दर्यशोधांत कशी प्रवीण असे हें उत्तम दिसून येतें. साध्या पाषाणाचे टवके काढून काढून आंतून मनोरम मूर्ति काढणें व ती पूजास्थान बनविणें ही कल्पनाही चमत्कृति व सुंदरपणा यांनीं ओतप्रोत भरली आहे. मनाच्या कळवळयाच्या शेजारचाच विचार म्हणजे नश्वरता व तिच्या चिंतेमुळें उत्पन्न होणारे क्षणैक कां होईना वैराग्य हेंही माधवानुजांच्या पुष्कळ कवितांचें ‘ तात्पर्य ’ आहेसें दिसतें. पण त्यांत विशेष कांहीं नाहीं. त्यांनीं कांहीं श्रृंगार लिहिला आहे पण तो गुलहौशांचा अगर रोमान्स-वाल्यांचा नाहीं. शिष्ट कुटुंबांतील विनयशील माणसानें आपल्या पत्नीशीं केला आहे. हा श्रृंगार फार मनोज्ञ आहे. प्रयागतीर्थ पाहून लिहिलेलें शांत रसाचें पद कवीनें आपल्या पत्नीस धाडिलें आहे. व जामखेडास असतांना पाहिलेलें ‘ स्वप्न ’ त्यांनीं कवितारूपानें दिलें आहे. दोनही कविता सात्विक श्रृंगाराचे गमतीदार नमुने आहेत. असो.

कै. माधवानुजांच्या कवितेसंबंधानें जें दिसलें तें सांगितलें आहे. कवीविषयीं वाचकांचें कांहींही मत होवो. पण इतकें मात्र माहितगारीनें शेवटीं कळवितों कीं मोडक हे आपल्या कवितेपेक्षां फार चांगले होते. कविता ही त्यांची करमणूक होती पण काव्याच्या वृत्तीनें ओलसर झालेली वाणी बोलणें व रहाणी ठेवणें हें त्यांच्या जीविताचें रहस्य होतें.

**श्री. म. माटे.**

## माधवानुज यांचें हस्ताक्षर.



प्रभो मागणें अन्य माझें न कांहीं
कळांचें मला दिव्य या ज्ञान देईं
तुझा दूत मी सर्व ठायीं फिरोनी ।
जगांतील टाकीन दुःखें हरोनी . १०

—०—

माधवानुज.



जन्म
ता. १६।३।१८७२

# ] माधवानुज [

अवसान
ता. २।३।१९१६

( कै. डॉ. काशिनाथ हरी मोडक, कल्याण. )

# माधवानुजांचें चरित्र

( लेखक–श्री० चिं. का. मोडक, कल्याण )

" विनिश्चेतुं शक्ये न सुखमिति वा दुःखमिति वा "

उत्तररामचरितम्

कवि कुलगुरु भवभूतीच्या वर उद्धृत केलेल्या उक्तीप्रमाणें माधवानुजांचें चरित्र लिहावयाचें काम सुखरूप आहे किंवा दुःखरूप आहे हें सांगणें अशक्य झालें आहे. त्यांच्या स्मरणाबरोबर १९ व्या व २० व्या शतकाच्या संधिकाळांत चमकणारे ते एक प्रतिभावान् कवि होते हा विचार मनांत येऊन आनंदाची उर्मी उठते न उठते तोंच त्यांच्या वयाच्या ४४ व्या वर्षीं अंत झाला म्हणून अन्तःकरणांत कालवाकालव सुरू होते. पण त्यांच्या हयातींत त्यांच्या सहवासाचें भोगलेलें अनुपम सुख त्यांच्या पश्चात् त्यांच्या चरित्राचे व काव्यकृतीचे सहवासामुळें परत अनुभवावयास मिळावें या स्वार्थी हेतूनें व त्यांची कविता समजण्यास, त्यांतील इंगित उकलण्यास रसिकजनांस अल्पशी तरी मदत व्हावी म्हणून हें चरित्र लिहावयास आरंभ करीत आहें.

वास्तविक माधवानुजांच्या चरित्र लेखनाचा मान व अधिकार त्यांचे वडील बंधू माधवराव, कविबंधू ' किरात ' किंवा त्यांचे परम चहाते कविमित्र ' अनंततनय ' यांचा आहे. व त्याप्रमाणें त्यांचा मनोदयहि होता व हें काम त्यांनीं केलें असतें तर तें अधिक सरस, मनोहर व रसिकांस प्रिय असें उतरलें असतें यांत मुळींच शंका नाहीं. पण चरित्रलेखनाचे मिषानें महाराष्ट्र रसिकवर्गास सलामी देण्याची इच्छा प्रस्तुत लेखकानें व्यक्त केल्याबरोबर या त्रिवर्ग विख्यात सरस्वतिभक्तांनीं मला पूर्णपणें मदत करण्याचें आश्वासन देऊन व त्याप्रमाणें सर्वस्वी मदत करून हें चरित्र पुरें करविलें आहे.

' माधवानुज ' ( काशिनाथ हरी मोडक ) यांचें जन्मग्राम घाटाखालील सुधागड तालुक्यांत पडघवली हें होय. तें पंतसचिवांचे ताब्यांत आहे. या

बद्दलची माहिती वाचकांस असणें जरूर असल्यामुळें देत आहें. हा गांव पेंढाऱ्यांची धामधूम चालू असतां, देशी संस्थानांत नोकरी करून अगर अन्य रीतीनें मिळविलेल्या संपत्तीचा निर्वेधपणें उपभोग घेण्याकरितां वसलेला आहे. तो एका वृक्षाच्छादित टेकडीच्या खोऱ्यांत असल्यामुळें गांवापासून एक फर्लांगाचे अंतरावर आलें असतां देखील त्याचें अस्तित्व कळत नाहीं. येथें आरंभीं वस्ती करण्याकरितां कुंटे, मोडक, डोंगरे, आठवले, लेले, रानडे, फाटक, दिवेकर व केतकर अशीं १० घराणीं आलीं. यांतील बाबा मोडक यांचा चौसोपी वाडा असून त्यांचे मागील व पुढील दारीं आरबलोकांचा चौकी पहारा होता. त्यांनीं उंटावरून बडोद्या-कडून संपत्ति आणली असें सांगतात. आग लागून पुढें हा वाडा जळाला व सध्यां तेथें जोत्याचे दगडापलीकडे कांहींच अवशेष राहिलेला नाहीं. या वाड्याचे पश्चिमदिशेला कविवर्यांचे वडिलांचें घर आहे. माधवानुजांचे वडिल हरिभाऊ हे कारकुन पेशाचे असून पूर्ववयांत आगाशीच्या बाजूला नोकरी करून होते पण त्यांस तेथील हवा न मानवल्यामुळें ते नोकरी सोडून घरीं आले. त्यांचे चुलत चुलते पुणें येथील श्रीमंत रास्ते ( गोखले ) यांच्या जहागिरीपैकीं कुलाबा जिल्ह्यांत दुशवी गांवावर कारकून होते. त्यांचे वशिल्यानें हरिभाऊंस रास्ते यांजकडे पुणें मुक्कामीं दरमहा ५ रुपयांवर कारकुनाची नोकरी मिळाली. हे फार बाके कारकून असत. त्याचप्रमाणें त्यांस मोरोपंतादि जुन्या कवींचे ग्रंथ वाचण्याचा फार नाद असे. हे शरीर-प्रकृतीनें सुदृढ, दक्ष, निगर्वी, निरलस व व बालोचित सरळ वृत्तीचे होते. गांवांत हरिभाऊ म्हणजे देव माणुस म्हणून यथार्थ समजले जात. स्वकष्टानें पडघवलीसारख्या कुग्रामांत जतन करून फळांस आलेल्या लहान पेरूचे १५।२० बारीक तुकडे करून सुनांसह आपल्या नातवंडांस प्रेमानें व कौतुकानें वाटणारी त्यांची मूर्ति लेखकास चांगलीच आठवते.

यांच्या चुलतीला गीता अठरा अध्याय, निगमसार व परमामृत हे ग्रंथ पाठ येत असत. त्याचप्रमाणें कवींच्या मातोश्री या डोंगरे घराण्यांतील असून फार बुद्धिमान् होत्या. हरिभाऊ हे नोकरीनिमित्तानें परगांवीं असल्यामुळें प्रपंचाचा सर्व भार यांच्यावरच पडे. घरांत त्यावेळीं दहा माणसें खावयास

व स्थिति दारिद्र्याची. असें असतांना देखील या माऊलीनें शक्य तितकें प्रत्येकाचें त्याच्या त्याच्याप्रमाणें यथास्थित करून शिवाय आल्या गेल्या गरजू माणसास सहाय्य करीत असावें. कोणाला सुखासमाधानाच्या गोष्टी सांगून, कोणाला सरलोचित सल्ला देऊन, कोणाची गरज निवारून तर कोणाला घांसभर अन्न देऊन त्या शक्य तेवढी मदत करीत असत. या फार बुद्धिवान्, धोरणी, व्यवहारचतुर, परोपकारी, कार्यतत्पर, व दुसऱ्याचें अंतर जाणणाऱ्या होत्या. त्यांस चार अपत्यें. पैकीं सर्वांत वडील कृष्णाबाई, खालोखाल महादेव, मोरेश्वर व शेवटचे काशिनाथ. यांचा जन्म शके १७९३ (सन १८७२) फाल्गुन शु. ७ शनिवारीं रात्रीं झाला. यावेळीं माधवराव ८ वर्षांचे व मधले बंधू ४ वर्षांचे होते. कवीच्या जन्मकालीं घरांत हरिभाऊंचे चुलते व चुलती, एक सख्खी बहिण मिळून ८।१० माणसें असत. चरित्रनायक रांगते बोलते झाल्यावर घरांत आजू ( हरिभाऊंचे चुलते ) हे माधवराव व दुसरे बंधु यांस म्हणत कीं "आतां आमचे हे झांज पाटील आले; आतां तुमच्यावर पडल्या माश्या." माधवानुज जन्मतः चांगले सुदृढ होते. त्यांतून खेडेगांवांतील शुद्ध हवा, साधी पण हितावह रहाणी व प्रेमळ बंधुभगिनीचा सहवास. त्यामुळें ते लहानपणीं वयाच्या मानानें चांगले चपळ व खेळकर होते. त्यांस बाळकृष्ण म्हणून न्हाऊ घालावयास नेणाऱ्या एका उतार वयाच्या शेजारणीनें कौतुकानें म्हणावें "गोदुमाई, मला किनई याला कडेवर नेववत नाहीं हो. मी आपल्या सुनबाईस त्याला न्यायला धाडून देतें."

६।७ वर्षांचे वयाचे असतांना खेडेगांवांतील मुलांना शोभणारे असे सर्व प्रकारचे खेळ समवयस्क खेळगड्यांबरोबर ते खेळत असत. गांवांतील मुलांत त्या वेळेस दोन तट असत. त्यांपैकीं त्यांच्या शेजारीं रहाणाऱ्या सोमण यांच्या पक्षांत ते सामील असत. पोरपणीं देखील निरुपद्रवी खोड्या करण्यापलीकडे त्यांची मजल कधींच गेली नाहीं. बरोबरीच्या मुलांत वागण्याची संवय असल्यामुळें मनमिळाऊपणा व आनंदीवृत्ति साहजिकच त्यांचे आंगांत बाणली होती. बाळपणांतील त्यांच्या विशेष आवडीची गोष्ट म्हणजे मागले दारच्या परसांत फुलझाडें लावून बाग बनविणें. या आव-

डीचाच उल्लेख त्यांच्या ‘ लहानपणची बाग ’ या कवितेंत केलेला स्पष्टपणें आहे. १९०९ सालीं कल्याण येथें घर घेतल्यावर डॉक्टरीसारखा फुरसुत न मिळणारा धंदा सांभाळून त्यांनीं आपल्या हातानें सोनचाफा, मोगरा, गुलाब वगैरे फुलझाडें लावलीं होतीं व दररोज ते आवडीनें व अगत्यानें देवपूजेकरितां फुलें काढीत असत.

पूर्ववयांत ८ व्या वर्षापर्यंत त्यांना स्वतःच्या घरीं रहावयास सांपडलें. हा त्यांचा काल फारच सुखाचा गेला. त्यांचे दोघेही वडील बंधू व वडील हे विद्याभ्यास व नोकरी निमित्तानें परगांवीं रहात असल्यामुळें घरांत हेच एकटे व त्यांतून सर्वांत लहान. त्यामुळें स्वच्छंदानें बालस्वभावाप्रमाणें त्यांनीं आपल्याच नादांत असावें. मग स्नान खाणेंपिणें वगैरे नित्यकर्मांकरितां आई, ताई व वहिनी ( माधवरावांचें कुटुंब ) यांनीं माधवानुजांस हाका मारीत असावें तरीपण यांचा खेळ चालूंच असे.

वयाच्या ८ व्या वर्षीं यांची मुंज पुणें येथें झाली. माधवानुजांचे वडील रास्त्यांचे आश्रित व गरीब. तेव्हां यजमानणीनें हस्तेंपरहस्तें या घराण्यास मदत करण्याचे बुद्धीनें कवीच्या आईस मुलाला घेऊन येण्यास कळविलें. पडघवलीहून पुणें येथें जावयाचें म्हणजे आंबेनळी नांवाच्या एका अवघड पाऊलवाटेचा घाट चढून येऊन लोणावळें येथें गाडींत बसावयाचें. किंवा खोपोलीस जाऊन कर्जतला गाडी गाठावयाची. पैकीं पहिला रस्ता पुणें येथें जाण्यास जवळचा असल्यामुळें त्यानेंच माधवानुज हे आईबरोबर घाट चढून आले. या रस्त्यानें पुढें त्यांच्या बऱ्याच खेपा झाल्या. येथील निसर्गशोभा कोणाही प्रवाश्यास क्षणभर वाटचालीच्या श्रमाचें विस्मरण पाडील अशी आहे. तिचा कवीच्या मनावर अनुकूल असा परिणाम झाला. पुणें येथें येण्याचा हा कवीस पहिलाच प्रसंग होय.

या वेळेस त्यांच्या मराठी ४ इयत्ता पुऱ्या झाल्या होत्या. पुढें शिकण्याकरितां आपले मामा रा. रामचंद्र चिंतामण डोंगरे हे रोहे येथें शिक्षक होते त्यांचेकडे माधवानुज हे इंग्रजी शिकण्याकरितां गेले. तेथें त्यावेळीं मिशन स्कूल होतें त्यांत त्यांचें नांव घालण्यांत आलें. मामा हे दशग्रंथी उत्तम वैदिक असूनही शाळामास्तर होते.ते चांगलेच बहुश्रुत, कलाप्रेमी, व विद्या-

व्यासंगी होते. त्यामुळें त्यांच्या सहवासांत कवींस अनेक सुभाषितें, आख्यानें व तत्कालीन प्रचलित मराठी कविता यांची ओळख झाली होती. त्यांच्या ठिकाणीं मुळचाच काव्याचा अंकुर असल्यामुळें ते मोठ्या हौसेनें व अगत्यानें नवीन ऐकलेलें सुभाषित किंवा कविताबद्ध कोडें वहींत टिपून ठेवीत. मामा हे सतारही चांगली वाजवीत. आपणही या कलेंत प्रवीण व्हावें असें वाटून तशी इच्छा मामांचे जवळ व्यक्त केल्यावरून त्यांनीं स्वहस्तानें बनविलेली एक सुरेल सतार भाच्यास दिली.

मामांच्या अगदीं उलट मामीचा स्वभाव. तिच्या कडक, तुसड्या व अनुदार स्वभावाचा माधवानुजांच्या मनावर व स्वभावावर अनुकूल व हितावह परिणाम झाला. तो असा कीं, बालवृत्तीला साजेल असा हटेलपणा, खाण्यापिण्यांतील आवड निवड, कामाबद्दल तिटकारा वगैरे स्वभावविशेष या प्रतिकूल परिस्थितीमुळें नाहींसे झाले. व लहान मुलांना अवघड व कमीपणाच्या वाटणाऱ्या अशा स्वतःचें उष्टें काढणें, शिळाभात खाणें या गोष्टी त्यांच्या संवयीच्याच होऊन बसल्या.

रोहें येथें शिकत असतांना माधवानुजांचे सोमण हेच एकटे आपल्या गांवांतले मित्र होते. त्याशिवाय काशीनाथ महादेव काळे हे एक सहाध्यायी होते. व त्यांचा भाऊ बगाराम याचीही विशेष मैत्री होती. मधले बंधु मोरूनाना हे देखील कांहीं दिवस येथेंच होते. उन्हाळयाची व शिमग्याची सुट्टी व गांवांतील वार्षिक माघ महिन्यांतील उत्सव या वेळीं माधवानुजांस पडघवलीस यावयास मिळे. रोह्यापासून पडघवलीपर्यंत १० कोस रस्ता त्यांस चालतच जावें लागे. क्वचित् रस्त्यांत त्या बाजूची गाडी जाणारी असल्यास तिचाहि उपयोग होई. वार्षिक गणपतीच्या उत्सवांत माधवानुजांनीं मोराचीं पिसें पाठीला पायांत घुंगूर अशा थाटांत. सरस्वतीचें पहिलें काम केलें. पडघवलीकरांस हा उत्सव म्हणजे ४ दिवसाचे लग्नसोहाळयासारखा आनंदाचा वाटतो. नोकरीनिमित्तानें, विद्याभ्यासाकरितां, सासुरवाशिणी म्हणून परगांवीं असणारी सर्व मंडळी न चुकतां या प्रसंगास हजर रहावयाची. तीन दिवस कथा होऊन रात्रीं गणपतीचा जन्म व चवथ्या दिवशीं नाटक. जन्मोत्सव जुनाच असून नाटक करावयास

सुरवात सन १८८० सालपासून झाली आहे. त्यांत लहान थोर सर्व दर्जाचे गांवकरी भाग घेतात. व नाटकांत काम करणें म्हणजे गणपतीची सेवा करणें अशी भावना असल्यामुळें गांवकऱ्यांचा फायदाच झालेला आहे. सामान्यतः नाटकाशीं संबंध असणाऱ्यांत जी नैतिक ग्लानि दिसते तिचा येथें पूर्ण अभाव आहे इतकेंच नव्हे तर नाटकांत काम करणारे चांगले नांवारूपास आलेले आहेत. माधवानुजांनींहि या उत्सवांत अनेक वेळां भाग घेतलेला आहे. राणा भीमदेव नाटकांत जयसिंह, गुणोत्कर्षांत संभाजी व तुकाराम नाटकांत शिवाजी ही त्यांचीं तीन कामें फारच उत्तम वठलीं होतीं. त्यांचीं कामें फार उठावदार व तडफेनें होत. त्यांस निरनिराळ्या प्रसंगाचीं भाषणें पाठ असत व त्यामुळेंच त्यांस कविवर्य किरात यांचें लक्ष ओढून घेतां आलें. ती हकीकत पुढें यथाकाल सांगण्यांत येईलच.

रोहें येथें माधवानुजांचें इंग्रजी ४ इयत्तापर्यंत शिक्षण झालें. त्यांचे वडील बंधू माधवराव हे पुणें येथें शिकत होते ते ज्या ज्या वेळीं माधवानुज पडघवलीस सुट्टीनिमित्तानें जात त्या त्या वेळीं मुद्दाम आपल्या छोट्या बंधूरायाला भेटावयास येत. येथें वाचकांस अशी सूचना देऊन ठेवणें अगत्याचें आहे कीं, या त्रिवर्ग बंधूंपैकीं सर्वांत वडील माधवराव व कनिष्ठ काशिनाथपंत यांमध्यें विलक्षण प्रेम होतें व हा वरिष्ठ कनिष्ठ बंधूंमधील जिव्हाळ्याचा संबंध, स्वनामप्रसिद्धीचा मोह आवरून कवीनीं " माधवानुज " हें नांव स्वीकारण्यानें चिरस्मरणीय होऊन राहिला आहे.

माधवानुजांची वयाचे मानानें यावेळेस ग्राहक शक्ति विशेष होती असें त्यावेळीं त्यांस माधवरावानीं धाडलेल्या पत्रावरून दिसतें. ते एका पत्रांत लिहितात " न वृक्ष हे भक्षिति आपुलें फळ । नद्या स्वयें पीति न आपुलें जळ । न धान्य तें आपण मेघ खाती । परोपकारार्थ सतां विभूती ॥ १ ॥ हा एक पद्यात्मक पत्रांतील नमुना तर एका गद्यपत्रांत " वर्तनमात्र शुद्ध असावें. आपण ब्राह्मण त्यांतून मुलगे करितां धर्मावर श्रद्धा ठेऊन यथावकाश स्नानसंध्या ही करावी. त्यावांचून आपणांस शुद्धत्व नाहीं. शूद्र व आपण सारखेच होऊं, पण उपयोग काय ! वेडा मी. हें

हवें आहे कोणाला. आई सांगणार काशिबा, वाटी वाट पहाते आहे, आज गडबडवा परती संध्या. एथें काय आनंदच " अशा सारखा विनोदमिश्रित उपदेश आढळतो. या सहोदरांमधील तत्कालीन पत्रव्यवहारांत बरींच पत्रें सबंद काव्यरूपांत आहेत. एका पत्रांत तर प्रचलित मराठींतील सर्व वृत्तांमध्यें एक एक कविता आहे. तें एक चिमुकलें वृत्तदर्पणच आहे. या पत्रव्यवहारावरून असें ठळकपणें लक्षांत येतें कीं, माधवानुजांस विद्याभिरुचि, मार्मिक भाषाज्ञान व काव्यस्फूर्ति वडील बंधूपासूनच प्राप्त झाली होती. पडघवलींतील पहिले सुशिक्षित माधवरावच. त्यांनीं स्वकष्टाचे जोरावर आपल्या बुद्धिमत्तेस व महत्वाकांक्षेस अनुरूप असें बी. ए. पर्यंत शिक्षण पुरें करून गांवकऱ्यास अभिमानास्पद व अनुकरणीय उदाहरण घालून दिलें. या गोष्टीचा गांवांतील उदयोन्मुख व होतकरू तरुणांवर इष्ट असाच परिणाम झाला. त्यावेळच्या लंगोट्या बिनलंगोट्या बाळगोपाळांना " गुदुमाइचा अन्ना " ( माधवरावांचें नांव ) म्हणजे एक आदरणीय व कौतुकास्पद व्यक्ति वाटत होती. शेजाऱ्यावर जर हा परिणाम तर त्यांच्या बंधुरायाला ते आदर्शवत् व अभिनव सरस्वतिभक्त वाटून त्यांचें अनुकरण करण्याचा मोह पडणें साहजिक होतें.

१८८७चे सुमारास इंग्रजी ६व्या इयत्तेंत माधवानुज हे न्यू इंग्लिश स्कूलमध्यें पुणें येथें होते. त्यांचे त्या वेळचे सहाध्यायी रा. कृष्णाजी गोविंद किनरे हे आहेत. शिक्षक वर्गांत टिळक, नामजोशी व नंदर्गीकर शास्त्री ही प्रख्यात मंडळी होती. याच वर्षीं त्यांची व कै. कविवर्य केशवसुत यांची गांठ पडली असावी; ती पुढें सारखी अखेरपर्यंत वृद्धिंगत होत गेली. पुणें येथील सर्व परिस्थितीचा त्यांच्यावर बराच अनुकूल परिणाम झाला. १८८८ चे सुमारास माधवराव हे बी. ए. झाले. व त्यांस मुंबईत फणसवाडींतील न्यू स्कूलमध्यें नोकरी मिळाली. त्यामुळें माधवानुज पुढील शिक्षणाकरितां तेथें आले. तेथें ६ वी ७ वी इयत्ता पुरी करून ते १८८९ मध्यें मॅट्रिकला बसले. पण त्या वर्षीं गणितांत नापास झाले. वडील बंधू आपल्या भावाची योग्यता जाणतच असल्यामुळें त्यांनीं त्यांस नाउमेद न होतां परत परीक्षेस बसण्याबद्दल प्रोत्साहन दिलें,

येथें माधवानुजांस भेटण्याकरितां केशवसुत अनेकवेळां माधवरावांचे बिऱ्हाडीं येत. ते फारच अबोल असत पण त्यांची कविता म्हणजे बुद्धीचा नुसता लोट आहे असें वाटे. ते अनेकवेळां माधवरावांस रसिक म्हणून आपली कविता दाखवीत. या वर्षी माधवानुजांचा फणसवाडींतच जगन्नाथाच्या चाळींत रहाणारे गोविंदराव करमरकर यांची बहीण बयोबाई यांच्याशीं पडघवली येथें विवाह झाला. हें लग्न ठरलें मुंबईत पण कार्याकरितां पडघवली येथें जाऊन तेथील प्रत्यक्ष वैभव या शहरीं मंडळींच्या दृष्टीस पडल्यावर मात्र ही सर्व मंडळी फार खट्टू झाली. मुंबईसारख्या सुधारलेल्या शहरांतील माणसाला एका आडमार्गातील खेडेगांवीं रहावयाची वेळ आल्यास त्याची जी अवस्था होईल तीच या मंडळींची झाली. माधवानुजांच्या पत्नीस हा फेरबदल पूर्ववयांत बराच जाचक झाला. असो.

मुंबईहून १८९० सालीं वडील बंधू नगरास गेल्यामुळें चरित्रनायक तेथें गेले. प्रिलिमिनरीच्या अगोदर झालेल्या एका परीक्षेंत माधवानुज गणितांत नापास झाल्यामुळें पेपर तपासणाऱ्या शिक्षकानें माधवरावांस 'घरचे शिकविणारे म्हणून हा निकाल वाटतें' असें कांहीं विचारलें. माधवराव सर्व विषयांत सारखेच पारंगत असल्यामुळें आपल्या बंधूंच्या या अपयशाचें त्यांस आश्चर्य वाटलें व त्यांनीं ही घडलेली हकीगत जेवीत असतांना काशिनाथपंतास सांगितली व त्यांची जरा कठोर शब्दांनीं हजेरी घेतली. स्वतःची तिळमात्र कसूर नसतां नैसर्गिक उणीवेबद्दल दोष दिला गेल्यामुळें माधवानुज फार रंजीस झाले. गणित विषयाची उपासना करून तो साध्य करून घेण्याची त्यांची इच्छा व तयारी नसल्यामुळें या पेचांतून सुटण्याचा त्यांनीं निश्चय केला. भाषाविषय उत्तम असतांना गणित विषयानें आपल्यास धोका दिल्यामुळें आपणांस पदवीधर होतां आलें नाहीं ही गोष्ट त्यांच्या मनास लागली होती. म्हणून आपल्या मुलांचा तरी गणित विषय कचा असूं नये अशाबद्दल ते फार काळजी घेत.

मॅट्रिकचा नाद सोडून मेडिकल स्कूलमध्यें जाण्याचें माधवानुजांनीं ठरविलें. व त्याप्रमाणें त्यांनीं त्या ठिकाणीं घेतल्या जाणाऱ्या प्रवेशपरीक्षेची माहिती आणवून ठेविली व आपला डॉक्टर होण्याचा कृतनिश्चय माधवरावांस

कळविला. वडील बंधूच्या मनांत त्यांनीं बी. ए. एल्. एम्. ॲण्ड एस. व्हावें असें होतें; परंतु असलेल्या परिस्थितींत त्यांनीं या बेतास मान्यता दिली. या परीक्षेस सुमारें १०० विद्यार्थी बसले व त्यांत माधवानुज हे पहिले आले, इतकेंच नव्हे तर त्यांच्यांत व दुसऱ्या नंबरच्या उमेदवाराच्या मार्कांत २८६ मार्कांचें अंतर होतें. कांहीं अडचणी दूर झाल्यावर त्यांस पहिल्या वर्षी ९ रुपये Stipend ( शिष्यवृत्ति ) मिळालें व ते १८९१ च्या नव्हेंबरमध्यें बी. जे. मेडिकल स्कूलमध्यें दाखल झाले.

प्रथम ते कांहीं दिवस गांवांत एका मित्राकडे रहात. आपला दुसऱ्यास उपसर्ग न व्हावा म्हणून पहाटे उठून ते २०।२५ घागरी पाणी भरून ठेवीत. नंतर आपल्या अभ्यासास लागत. पण मग ते स्कूलजवळच राहूं लागले. याच वेळेस ते केशवसुतांस घेऊन किरात यांजकडे गेले. किरातांचे मेहुणे वासुदेव अनंत मोडक व माधवानुज एकाच वर्गांत शिकत असल्यामुळें त्यांच्याकडे वारंवार जाणें होई. त्यांस कविता करण्याचा व नाटकें लिहिण्याचा नाद असल्यामुळें माधवानुज त्यांस राणा भीमदेव नाटकांमधील भाषणें पाठ म्हणून दाखवीत. त्यांचे आवाजांत विलक्षण गोडी असून भाषणांि आवेशयुक्त होत असे. प्रवासगृहवैद्यपेटिकेचे कर्ते गेह्याचे रहिवासी वासुदेव महादेव काळे हे त्यांचे जुन्या ओळखीचे सहाध्यायी होते. ते पुढें निवर्तल्यामुळें ही जोडी फुटली.

माधवानुजांनीं पुणें येथील १८९१ ते ९४ या चार वर्षांत मराठी, संस्कृत व इंग्रजी काव्य वाङ्मयाचा चांगलाच अभ्यास केला. जुन्या बाजारांत बारीक टाईपाचे इंग्रजी कवींचे ग्रंथ घेऊन ते रात्रभर त्यांचीं पारायणें करीत. शेक्सपीयर, बायरन, लांगफेलो, टेनिसन, वर्डस्वर्थ व बर्न्स यांच्या कविता त्यांनीं काळजीपूर्वक वाचल्या होत्या. मराठी कवींपैकीं मोरोपंत व वामन पंडित यांच्या कवितांचा व्यासंग बराच झाला होता. त्यांनीं संस्कृत नाटकें व काव्यग्रंथ परीक्षेपुरतेच वाचले होते.

यावेळीं त्यांस कविता करण्याचा फार नाद लागला होता. एका गर्विष्ठ व मडभऊ्या ( पण इमानी, सज्जन व परोपकारी ) मित्रावर त्यांनीं इतकी उत्तम कविता रचली होती कीं, ती ऐकून वसतिगृहांत रहाणारे सर्व विद्यार्थी

पोटें धरधरून हसत असत. व पुढें ६ महिनेपर्यंत मंडळी ती आपल्याशींच गुणगुणत असत. माधवानुजांस कोणताहि जिन्नस दिसला कीं, त्यांस कविता करण्याची स्फूर्ति होत असे व त्यांना सुचलेली कल्पना ते एकदम कवितेंत ग्रथित करित असत. त्यामुळें त्यांस त्यांचे मित्र शीघ्रकवी म्हणत.

कवि या नांवानें रसिकवर्गापुढें येण्याची ही तयारी चालू असतांना देखील त्यांनीं आपल्या अभ्यासाकडे बिलकुल दुर्लक्ष केलें नव्हतें. ते आपल्या कामांत फार दक्ष व तत्पर असत. त्यांची मिडवाइफ्रि व मेडिसिन या विषयावरील लिहिलेलीं नोटबुकें फारच काळजीपूर्वक लिहिलेलीं असत. त्यामुळें व्यंकटराव रामचंद्र या नांवाचे सरकारी वकील हे खाजगी अभ्यासाकरितां तीं मागून नेत. मटिरिया मेडिका हा फार रूक्ष विषय. त्यांतील औषधांचीं नांवें व उपयोग लक्षांत ठेवणें कठिण म्हणून ते लक्षांत रहाण्याकरितां त्यांस माधवानुजांनीं कवितारूप दिलें होतें.

मेडिकल स्कूलमधील ते सर्वांत वयानें लहान पण फार हुषार विद्यार्थी म्हणून डॉ. मेकॉनकी, कॅ. बर्क व भिकाजी अमृत चोभे यांची त्यांच्यावर फार मर्जी असे. १८९३ सालीं त्यांस २१ दिवसांचा विषम झाला. प्रथम ते हॉस्पिटलमध्येंच होते. पण नंतर वडील बंधू येऊन त्यांस गांवांत घेऊन गेले. तेथें अण्णासाहेब पटवर्धन यांचा औषधोपचार चालू होता. शुश्रूषेकरितां मातोश्री घरून आल्या होत्या. यांतून उठल्यावर त्यांस खोकला जडला व तो पुढें अखेरपर्यंत बरा झाला नाहीं. या वर्षापासून त्यांची प्रकृति जी एकदां ढासळली ती परत पूर्व स्थितीवर आलीच नाहीं. १८९४ च्या नव्हेंबरमध्यें ते हॉस्पिटल असिस्टन्टची परीक्षा पास झाले. यशस्वी उमेदवारांत त्यांचा नंबर ४था आला व त्यांस मेडिसिन या विषयांत ‘ बाळकृष्ण चिंतोबा मोने ’ या नांवाचें ३० रुपयांचें बक्षिस मिळालें.

डिसेंबर १८९४ मध्यें लागलीच त्यांची नेमणूक ठाणें येथें सिव्हिल हॉस्पिटलवर झाली. यावेळीं ले. कर्नल कीर्तिकर तेथें सिव्हिल सर्जन होते. माधवानुजांची व त्यांची रसिक म्हणून ओळख झाल्यावर उभयतांमध्यें काव्यविषयक बराच वादाविवाद होत असे. तेथें २ महिने राहिल्यावर

फेब्रुवारी १८९५ त त्यांची बदली मुंबई येथें सर्जन जनरलचे आफिसांत झाली. तेथें त्यांचा वरिष्ठ हेडक्लार्क एक पारशी होता. तो पडला पक्का स्तुतिप्रिय तर माधवानुज पक्के निस्पृह, तेव्हां या उभयतांमध्यें खटका उडाला. पण माधवानुजांच्या कामांत चूक काढतां न आल्यामुळें त्याला गप्प बसावें लागलें. पण याचें उसनें त्यानें माधवानुजांची बदली प्रत्येक वेळीं दुष्काळ किंवा प्लेग ड्यूटीवर करून काढलें. यामुळेंच सरकारी नोकरीच्या पांच वर्षांत त्यांस नेहमीं प्लेग किंवा दुष्काळ कामावर जावें लागलें. पण ते पूर्ण निस्पृह व करारी असल्यामुळें त्यांनीं या सर्व ठिकाणीं बिकट परिस्थिती असूनहि कामें पार पाडलीं; पण त्या हेडक्लार्कला हार गेले नाहींत. मुंबई येथें ६।७ महिने त्यांचा मुक्काम होता; पण एकंदर परिस्थिती अनुकूल नसल्यामुळें त्यांच्या हातून एकदोनच कविता लिहिल्या गेल्या.

सप्टेंबर १८९५ मध्यें त्यांची बदली सातारा येथें झाली. तेथील उत्साहवर्धक हवा, रसिक व प्रेमळ मित्र व प्रकृतीचें स्वास्थ्य यामुळें त्यांची चित्तवृत्ति विशेष प्रसन्न असे. त्यामुळें त्यांनीं आसपासचीं सज्जनगड, परळी, यवतेश्वर वगैरे ठिकाणें पाहिलीं व सज्जनगड, कुबडी तीर्थ, भवानी तलवार वगैरे कविता लिहिल्या. यवतेश्वराचे बाजूला बोगद्याच्या पलीकडे एक मोठा मोगऱ्याचा वेल आहे, तें त्यांच्या आवडीचें बसण्याचें ठिकाण होतें. येथेंच बसून त्यांनीं काव्यदेवीची मनोभावें सेवा केली. येथील रा. दत्तोपंत पारसनीस ( हल्लीं रा. ब. ) यांचा व त्यांचा दृढपरिचय होता, व परस्पर सहवासांत त्यांचा वेळ फार सुखानें जाई. सातारा येथें माधवानुजांनीं आपलें बिऱ्हाड पहिल्यानेंच थाटलें. त्यांचे, वडील मातोश्री व वडील बंधू माधवराव ही त्रिवर्ग मंडळी उन्हाळ्याकरितां तेथें आलीं. कवींचें पहिलें अपत्य यावेळीं ६।७ महिन्याचें होतें. नोकरीवर असतांना स्वतःच्या आप्तेष्टांच्या प्रेमळ सहवासाचें सुख माधवानुजांस फक्त सातारा येथेंच लाभलें. मे महिन्यांत तापानें व खोकल्यानें विशेष बेजार झाल्यामुळें त्यांनीं २ महिन्याची रजा घेतली व ते नगर येथें आपल्या बंधूकडे हवा पालटण्याकरितां गेले. तेथें तात्याशास्त्री कडेकर या नांवाचे आर्यवैद्यकांत पूर्ण पारंगत असे वैद्य होते. त्यांचेकडे माधवरावांचे प्रोत्साहनामुळें माधवा-

नुज नाडीज्ञान शिकण्याकरितां जात. याचा त्यांस नंतर आपल्या धंद्यांत फार उपयोग झाला. आक्टोबरमध्यें ते परत सातारा येथें आल्यावर एकदम तारेनें त्यांची बदली मुंबई येथें ग्रँटरोड स्टेशनवर करण्यांत आली. मुंबईंत प्लेगचा हा पहिलाच उद्भव. डॉक्टर लोकांसही त्याच्या स्वरूपाची पूर्ण अटकळ झालेली नव्हती. त्यामुळें या रोगाच्याबद्दल लोकांत वास्तविक व काल्पनिक भयानक कल्पना फार पसरल्या, जनता एकदम रोगाचें भयानक व तत्काल मृत्युमुखीं टाकणारें स्वरूप पाहून घाबरली होती. अशा या आगीच्या खाईत माधवानुजांस कामावर जावें लागलें हें पाहून माधवराव व इतर आप्त मंडळी यांस चैन पडेना. तेव्हां फार खटपट करून त्यांची बदली नगर येथें करविली. मुंबई येथें असतांना माधवानुजांनीं राजीनामा द्यावा अशी वडीलबंधूची सूचना होती त्यावर माधवानुजांनीं उत्तर दिलें "सरकारला ज्यावेळेस डॉक्टर लोकांची विशेष जरूरी त्यावेळेस मी नोकरी सोडणार नाहीं."

मुंबईहून नगर येथें जाऊन १०।१२ दिवस होत आहेत तोंच त्यांचा हितशत्रु जो हेडक्लार्क त्याच्या कारवाईमुळें त्यांची नेमणूक दुष्काळ कामावर झाली. सदरहू दुष्काळाचें वर्णन त्यांच्या पत्रांत पुढीलप्रमाणें आहे. "-पाऊस नाहीं म्हणून दुष्काळाचें स्वरूप फारच भयंकर झालें आहे. गुरांस खावयास कांहीं नाहीं. वडावर व इतर झाडांवर पानें राहिलीं नाहींत. तींही गुरें खातात. दररोज ८।१० गुरें एकसारखीं मरत आहेत. प्रत्येक लहान खेड्यांत गेलें म्हणजे हाडांचे ढीग दृष्टीस पडतात. लोक तर झुंडीवारी खडी फोडावयास येऊं लागले आहेत. कांहींना तर ४।४ दिवसांत अन्न भेटत नाहीं. अशा रीतीनें इकडे सर्वतोपरी दैना उडाली आहे." या ठिकाणीं माधवानुजांस कामही फार करावें लागे. त्यांचे ताब्यांत दहापांच हजार माणसें असत. त्यांच्या स्वच्छतेची व प्रकृतीची जबाबदारी यांचेवर पडे. त्यामुळें जेवावयास देखील फुरसत मिळत नसे. या १८९७ सालच्या दुष्काळाचा अनुभव माधवानुजांइतका त्यांच्या दुसऱ्या कविमित्रांस क्वचितच आलेला असेल. माधवानुज तर हें सर्व वर्ष

अहमदनगर जिल्ह्यांत निरनिराळ्या ठिकाणीं दुष्काळ कँपवर होते व त्यामुळेंच या वर्षीं त्यांनीं लिहिलेल्या कवितांपैकीं अर्ध्याहून अधिक कविता दुष्काळासंबंधीं आहेत. बाकीच्या कविता त्यांच्या स्वतःच्या स्थितीबद्दलच्या आहेत. कोठेंतरी रानावनांत आतेष्टांपासून दूर व दुष्काळ कामासारख्या जिकिरीच्या कामावर त्यांस रहावें लागत असल्यामुळें ते स्वतः फार निरुत्साही व निराश झाले होते. मध्यंतरीं बरोबरीच्या लोकांसह ते नाशिक येथें गेले होते व तेथील सुप्रसन्न देखावा पाहून त्यांच्या तापलेल्या व कंटाळलेल्या जीवास जरा आराम वाटला. तेथें त्यांनीं ' सरस्वतीची प्रार्थना ' ही कविता लिहिली. त्यांची दुष्काळांतील पद्यें एकंदर दहा आहेत व त्यांमध्यें दुष्काळानें गांजलेल्या प्रजेचे होणाऱ्या अनेकविध हाल अपेष्टांचें हुबेहुब शब्दचित्र आहे.

नगर जिल्ह्यांतून १८९८ सालीं त्यांची बदली पुणें जिल्ह्यांत प्लेगकामावर झाली. मुंबईत प्रथम येऊन प्लेगाचा फैलावा देशावर नवीनच सुरू होत असल्यामुळें सरकारनें प्लेगप्रतिबंधक उपाय फार कडकपणानें चालविले होते. त्यामुळें डॉक्टर लोकांस फार काम पडे. त्यांचे ताब्यांत ८।१० खेडीं असत, व कोठेंहि प्लेगचा उंदीर पडला कीं, तें घर लागलेंच धुऊन काढावें लागे. सुगीचे दिवस, घरें कांदे व बटाट्यांनीं ठेचून भरलेलीं, धुण्याकरितां सर्व घर मोकळें करून द्यावयाचें शेतकऱ्यांचे जिवावर येई. वाटेल तें घ्या पण आमचें घर धुवूं नका अशी ते विनवणी करीत. पण माधवानुज हे पापभीरु व सचोटीचे असल्यामुळें त्यांनीं अशा प्रकारें पैसा न मिळवितां शेतकऱ्यांस शक्य त्या सवलती देऊन आपलें काम बजावलें. त्यांस ८।१० खेड्यांत हिंडावें लागत असल्यामुळें बसावयास घोडा ठेवावा लागे. या वर्षीं त्यांचा मुक्काम चाकण, खेड, मंचर, अवसरी बुद्रुक, नारायणगांव व तळेगांव स्टेशन इतक्या ठिकाणीं झाला. यापैकीं चाकण हें ठिकाण त्यांस फार आवडे. हें पुणें जुन्नर रस्त्यावर दुतर्फा वसलेलें आहे. जवळ भुईकोट किल्ला व एक मैल अंतरावर नागेश्वर नांवाचें रम्य देवस्थान आहे. सरस्वतीचें वाहन मोर तेही तेथें पुष्कळ आहेत. या ठिकाणावर त्यांचें इतकें मन बसलें कीं, पुढें १९०३ व १९१५ सालीं प्रकृति बिघडल्यामुळें हवा बदलण्याकरितां

ते या पूर्वपरिचयाच्या गांवीं येऊन राहिले होते. येथेंच कवि अनंततनयांची पहिल्यानें गांठ पडली. येथें एकदां माधवानुज आपल्या ऑफिसांत काम करीत बसले होते, इतक्यांत त्यांचा वरिष्ठ अधिकारी घोड्यावरून तेथें आला. पण हे कामांत असल्यामुळें यांचें लक्ष साहेबाकडे गेलें नाहीं. तोहि कोणच्याहि प्रकारें आपला अपमान झाला आहे असें न मानतां स्वस्थपणें उभा होता. पुढें यांचे लक्षांत ही गोष्ट आल्यावर त्यांनीं साहेब मजकुराजवळ दिलगिरी प्रदर्शित केली. पण साहेबानें तूं कामांत असल्यामुळें मी तुला व्यत्यय आणला नाहीं असें मोकळया मनानें सांगितलें. अशा प्रकारचीं युरोपियन अधिकाऱ्यांची त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल व कार्यतत्परतेबद्दल खात्री झाली होती. त्यांपैकीं एक अधिकारी म्हणतो " Your ill health was brought on by the excess of work, which has fallen to your lot from the beginning to the end of our anti-plague measures and I wish to state without reserve that no subordinate officer was so much burdened with work as you were. " ( सरकारी प्लेग-प्रतिबंधक उपायांच्या सुरवातीपासून तुला पडलेल्या जबर कामामुळें तुझी प्रकृति ढासळली आहे व तुझ्या इतकें जबर काम दुसऱ्या कोणच्याही दुय्यम प्रतीच्या अधिकाऱ्यावर पडलेलें नाहीं हें मी मोकळेपणानें सांगतों ) यांच्या इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाबद्दलही बऱ्याच अधिकाऱ्यांना आश्चर्य वाटे.

येथेंच यांस जोराचा ताप येऊं लागला. जवळ नात्याचेंच काय पण ब्राह्मणजातीचेंही कोणी नव्हतें. सोबतीला दोन महार व रानांत झोपडी. तेव्हां २ मैलांवर रहाणाऱ्या एका वैद्य आडनांवाच्या शाळामास्तरनें यांस दिवसांतून दोनदां येऊन जेवण घालून जावें. प्लेगमुळें सर्व स्टेशनावर तपासणी असे त्यामुळें घरून कोणीहि येणें शक्य नव्हतें. तेव्हां पुण्याच्या एका नातलगानें टांग्यांतून येऊन यांचा समाचार घेतला. तसेंच एक दिवस यांस विंचू चावला. त्याच्या वेदना इतक्या असह्य झाल्या कीं, ते २४ तासपर्यंत बिछान्यावर सारखे तळमळत होते. अशा प्रकारच्या हालअपेष्टा या पांच वर्षांच्या सरकारी नोकरींत त्यांच्या नेहमींच होत होत्या. पण सरकारी मदत घेऊन हे शिकलेले असल्यामुळें पांच वर्षेपर्यंत नोकरी करणें भाग

होतें. मुदतीच्या आंत नोकरी सोडावयाची तर दंडादाखल ५०० रुपये भरावे लागत होते.

१८९९ च्या सुमारास त्यांची बदली पुणें येथें शनवार पेठेंत जमखिंडीकरांचे वाड्यांतील प्लेगइस्पितळावर झाली. पुण्यांत प्लेगचा कहर चालला होता. रोज इस्पितळांत १००।१५० पर्यंत रोगी येत. बाहेरगांवीं वर्तमानपत्रांतून प्लेगचें वर्णन वाचून लोकांस फारच भीति वाटत होती. पण माधवानुज हे निर्भयपणें या मृत्यूच्या खाईत वावरत होते. पण त्यांचे बंधू माधवराव हे यावेळीं अलाहाबाद येथें होते. त्यांस मात्र एक क्षणभरही चैन पडेना. त्यांचीं नोकरी सोडण्याबद्दल पत्रावर पत्रें येतच होतीं. शेवटीं तर त्यांनीं दंडादाखल भरावे लागणारे रुपये तारेनें पाठविले, माधवानुजांनाही आपल्या वरिष्ठाच्या अडाणीपणाचा अनुभव आला असल्यामुळें ते यापुढें नोकरी करण्यास खुषी नव्हते. शेवटीं नोकरीची मुदत पुरी होण्यास कमी असलेल्या २।३ महिन्यांची त्यांनीं रजा घेतली व नंतर राजीनामा दिला. सरकारी नोकरींतून मुक्त झाल्यावर स्वतंत्र धंद्याकरितां ठिकाण शोधण्याचें काम सुरूं झालें. ते कोणत्याहि ठिकाणीं जाऊन बसते तरी त्यांस यशस्वी होण्याची खात्री होती. पण त्यांचे मनांत शस्त्रक्रियेंत आपली प्रगति व्हावी असें असल्यामुळें व मुंबईचे डॉ. भाजेकर यांनीं त्यांस आपल्या इस्पितळांत काम शिकविण्याचें कबूल केल्यामुळें त्यांनीं कल्याण येथें रहावयाचें ठरविलें. शिवाय येथून त्यांचें घर व सासुरवाडी जवळच असल्यामुळें त्यांस हें गांव पटलें व त्यांत गांवचे खानदानीचे पुढारी नानासाहेब ओक यांच्या मदतीच्या आश्वासनाची भर पडली. म्हणून १८९९ च्या सप्टेंबरमध्यें त्यांनीं आपला दवाखाना कल्याण येथें उघडला. पुढें लौकरच प्लेग सुरू झाल्यामुळें ते माधवराव यांजकडे अलाहाबाद येथें गेले. तेथील निसर्गरमणीय शोभा, गंगायमुनेसारख्या पवित्र नद्यांचें सान्निध्य व धंद्याच्या दगदगींतून सुटका यामुळें या ठिकाणीं त्यांस निर्वेधपणें सरस्वतीदेवीची उपासना करतां आली. येथें त्यांनीं लिहिलेल्या कविता फार उच्च दर्जाच्या व अप्रतीम आहेत. त्या म्हणजे १ दोन ध्वनि, २ विरोधाभास, ३ विसरलेलें गाणें, ४ त्रिवेणीसंगम, ५ प्रश्नोत्तरमाला, ६ शरयूचें तटाक व ७ दीपविसर्जन

या आहेत. यांपैकीं त्रिवेणीसंगम, शरयूचें तटाक व दीपविसर्जन या तर त्या त्या स्थलीं कवि असतां त्यांस स्फुरलेल्या आहेत. दीपविसर्जन ही कविता तर रसिकवर्ग, कवि व नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांस इतकी आवडली कीं त्या कवितेचे निर्मिते म्हणून ते माधवानुजांस आनंद-भरानें कडकडून भेटले.

माधवानुजांच्या काव्यनिर्मितीच्या बाबतींत एक गोष्ट ध्यानांत धरण्या-सारखी आहे. ती अशी कीं, सहजमनोहर व रम्य निसर्गश्री पाहिल्यामुळें मनाची प्रसन्न स्थिति असतांना त्यांच्या कविसहज सूक्ष्मसंवेदनाक्षम अन्तः-करणावर भावनांचें जें तांडव चाले तेंच शब्दरूपानें त्यांच्या हातून कागदावर उमटे. यामुळें त्यांच्या उत्कृष्ट कविता निसर्गांतील नयनमनोहर देखाव्यासंबंधीं आहेत.

अलाहाबाद येथें जाण्यापूर्वी माधवरावांचेकडून पुस्तकें मागवून घेऊन ते बंगाली भाषा शिकले होते. पुढें तो परिचय दृढ झाला. त्यांनीं त्या भाषें-तील अभिजात वाङ्मय कृतीचें परिशीलन केलें. व मराठी वाचकवर्गास बंगाली भाषेंतील कृतीचा स्वाद मिळवून देण्याची कल्पना त्यांस सुचली. म्हणून त्यांनीं बंकीमचंद्राच्या ' कृष्णाकांतेर वुईल ' या कादंबरीचें ' कृष्णा कांताचें मृत्युपत्र ' या नांवानें भाषांतर केलें. तें १९०० त वाई येथील कादंबरीकल्पद्रुमांत क्रमशः प्रसिद्ध झालें व पुढें स्वतंत्र पुस्तकरूपानें निघालें. प्रस्तुत कादंबरी कृतज्ञतेचें द्योतक म्हणून त्यांनीं आपले मामा ती. रा. रा. रामचंद्र चिंतामण डोंगरे यांस अर्पण केली. ही वाचकवर्गाला फार आवडल्यामुळें त्याच ग्रंथकाराची ' कपालकुंडला ' ही कादंबरी माधवानु-जांनीं मराठींत प्रसिद्ध केली. याशिवाय बापु नरसिंह भावे यांच्या 'तरुबाला' या नाटकांतील पद्यांचेंही मराठींत भाषांतर करून दिलें. पुढें त्यांनीं माय-केल मधुसूदन दत्त यांच्या ' मेघनादवध ' या काव्याचें मराठींत रूपांतर करण्यास प्रारंभ केला. सदरहू काव्याचे ९ सर्ग असून १२०० आर्या आहेत. ह्या काव्याचें काम चालू असल्यामुळें १९०२ ते १९०५ सालाप-र्यंत त्यांस स्फुट प्रकरणें लिहितां आलीं नसावींत. ह्या काव्यास दक्षिणा प्राईज कमिटीकडून पारितोषिक मिळालेलें आहे.

कल्याण येथें येऊन स्वतंत्र धंदा सुरू केल्यावर देखील त्यांच्या मागचें तापत्रय सुटलें असें नाहीं. हिंवाळयांतील प्लेगच्या वार्षिक फेरीमुळें करावा लागणारा वार्षिक स्थानत्याग, यामुळें भोगाव्या लागणाऱ्या देहयातना व डॉक्टरीच्या धंद्यांतील एकसारखी दगदग या त्रिविध तापांनीं त्यांस फार दुःख दिलें. या परिस्थितींत विशेष समाधानाची व सुदैवाची गोष्ट म्हणजे त्यांस लाभलेली सुशील, शांत व मनाप्रमाणें वागणारी गृहिणी. या फारशा शिकलेल्या नव्हत्या हें खरें; पण कवींच्या संगतीनें यांस काव्यकृतीचा आस्वाद घेण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें होतें. तारुण्यांत पडघवली येथें आपल्या पत्नीस सोडून प्लेग व दुष्काळ ड्यूटीवर जाण्याकरितां निघ- तांना, घराशेजारीं रहाणाऱ्या आपल्या पत्नीच्या मैत्रिणीस " तुम्ही दोघीजणी गंगायमुनाप्रमाणें एकत्र स्नेहानें नांदा " अशा अर्थाची माधवानुजांनीं एक कविता करून दिलेली होती. सरकारी नोकरींत अस- तांना निरनिराळया ठिकाणीं त्या एकट्या रानावनांत माधवानुजांबरोबर असत. कित्येक वेळां रात्रीं एक जागल्या सोबतीला व रानांतील झोंपडी- तील वस्ती. मुंबईसारख्या सुखसोईनीं समृद्ध शहरांत बाळपण गेलें असतां- नाहि त्या वरीलसारख्या हालअपेष्टांना कंटाळल्या नाहींत. " कृष्णा कोय- नांचा संगम, ' ' सांत्वन, ' ' फुलांचा झेला ' व ' त्रिवेणी संगम " या कवीनीं आपल्या पत्नीस उद्देशून लिहिलेल्या कविता केवळ कविसंकेत म्हणून नसून वस्तुतः सत्यस्वरूपाच्या आहेत. अशा प्रेमळ पत्नीच्या सह- वासामुळें बाह्योपचारांनीं आयुष्यक्रम जितका सुखकर करतां येणें शक्य होतें तितका माधवानुजांना लाभत होता. पण प्रकृतीच्या अस्वास्थ्यानें त्यांना आपलें जीवित कांहीं कांहीं वेळां भारभूत वाटे. शारीरिक प्रतिकूलतेबरो- बरच कल्याणचें त्यांच्या सभोवतालचें वातावरण वाग्देवीच्या उपासनेला अनुकूल नव्हतें. त्यांचे बहुतेक स्नेही सुखवस्तू व कवितादेवीस पराङ्मुखच होते. कित्येक वर्षेंपर्यंत त्यांच्या बैठकींतील मित्रांस ते कविता करितात हें माहीतहि नव्हतें. त्यांचा धंदाहि काव्यव्यासंगास प्रतिकूल होता. कारण दिवसांत केव्हांहि त्यांस तास अर्धा तास निर्वेधपणा मिळत नसे. पण त्यांची या विषयाची आवड व प्रेम फार उत्कट म्हणून इतक्या व्यवधानांत ते

वेळ काढून कविता लिहीत. कविता सहज स्फूर्तीनें आल्याशिवाय ते कधींच लिहीत नसत; त्यामुळें त्यांस वारंवार मासिकांचे संपादकांकडून आग्रह होत असतांहि एखाद्या प्रसंगास अनुलक्षून कविता धाडतां आल्या नाहींत.

१९०२ सालाच्या सुमारास त्यांचें केसरीचे बातमीदार ' अनंत ' व हिंदू मिशनरी वैद्य यांच्याबरोबर विशेष संघट्टन व भेटी झाल्यामुळें ते थिऑसॉफिस्ट झाले. ' मुळचे ते सात्विक वृत्तीचे असल्यामुळें संधि आल्याबरोबर ते थिऑसॉफीच्या लाटेंत सांपडणें सहाजिकच होतें ' असा कविवर्य ' किरात ' यांचा याबद्दलचा अभिप्राय आहे. इतकें मात्र खरें कीं, ते पूर्ण विचार करूनच थि. सोसायटीचे मेंबर झाले होते. त्याप्रमाणें त्यांनीं ज्ञानेश्वरी, भागवत व कांहीं उपनिषदें यांचा पद्धतशीर व काळजीपूर्वक अभ्यास केला. पुढें त्यांनीं ' इमर्सन ' या तत्वज्ञानाच्या आवडीमुळेंच वाचला. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें, धंद्याच्या दगदगीमुळें व मुंबईहून दूर रहाण्यामुळें त्यांस थिऑसॉफीकल सोसायटीच्या नियमाप्रमाणें प्रत्यक्ष काम करणें अशक्य झालें व ते नांवापुरतेच मेंबर राहिले. पण त्यांस सोसायटीच्या आध्यात्मिक कार्याबद्दल नेहमीं आदर असे. त्यांनीं थिऑसॉफिकल सोसायटीचे उद्देश ग्रथित करणारी एक कविता लिहिली व ती करमणूकींत प्रसिद्धहि झाली.

१९०३ सालीं त्यांची प्रकृति फार बिघडली म्हणून ते मे महिन्यांत आपला दवाखाना विकून, परत कल्याण येथें यावयाचें नाहीं असा निश्चय करून चाकण येथें हवा पालटण्याकरितां गेले. तेथें जाऊन १०।१२ दिवस होत आहेत तोंच वडील अत्यवस्थ असल्याची तार आली म्हणून मंडळीस कल्याणास रवाना करून ते स्वतः पडघवली येथें गेले. वडील हरिभाऊ हे चार दिवसच आजारी होते व ते ४ थ्या दिवशीं माधवानुज जाण्यापूर्वीच वारले होते त्यामुळें त्यांस पितृदर्शन झालें नाहीं. या आकस्मिक व्यत्ययामुळें कल्याण सोडून जाण्याचा विचार रद्द करावा लागून परत तेथेंच धंद्यास सुरवात करावी लागली.

नंतर त्यांनीं स्थानांतर व प्रवास फारसा केलाच नाहीं. साहित्यसंमेलन व कविसंमेलनाचे निमित्तानें बडोदें, जळगांव व पुणें येथें ते गेले होते.

पैकीं जळगांव येथील संमेलन प्रसंगीं ' बालकवी'संबंधीं त्यांनीं एक कविताहि केली आहे.

प्रवासाचे निमित्तानें सरस्वतीभक्तांच्या गाठी पडण्याचा योग जरी त्यांस आला नाहीं तरी त्यांच्याकडे कल्याण येथेंच बरेच जण येऊन भेटून जात. १९०४ सालपर्यंत केशवसुत ३।४-वेळां कल्याणला आले होते. त्याचप्रमाणें किरात, टिळक, लक्ष्मणशास्त्री लेले, अनंततनय, पांगारकर, आनंदीरमण, वासुदेवराव आपटे व दासगणू वगैरे कविमित्र व ग्रंथकार निरनिराळ्या वेळीं भेटत असल्यामुळें त्यांस काव्यदेवतेची उपासना चालू ठेवण्यास प्रोत्साहन मिळे. संपादकवर्गापैकीं करमणूकीचे हरिभाऊ आपटे यांचा माधवानुजांवर फार लोभ होता. माधवानुजांचा महाराष्ट्र वाचकवर्गास प्रथम परिचय करून देण्याचें सर्व श्रेय हरिभाऊंसच आहे. आरंभीच्या ३५।४० कविता करमणूकींतच प्रसिद्ध झालेल्या आहेत. कवीचा व करमणूकीचा इतका दृढ सहवास होता कीं, वाचकवर्गास एकाचें नांव निघाल्याबरोबर दुसऱ्याची आठवण होई. करमणूककर्त्यांनीं माधवानुजांच्या कविता गुच्छरूपानें 'घटकाभर करमणूक' या मालेंत प्रसिद्ध केल्या आहेत. हरिभाऊंस माधवानुजांचे काव्यकृतीबद्दल अभिमान व कौतुक वाटे. म्हणून त्यांनीं १९१२ सालीं करमणूकीच्या दिवाळी अंकांत प्रसिद्ध करण्याकरितां अत्याग्रहानें ' शरत्काल ' ही कविता माधवानुजांकडून लिहून घेतली. हीच त्यांची करमणूकींतील शेवटची कविता होय. काव्यरत्नावलीचे फडणीस, मनोरंजनचे मित्र, चित्रमयजगत्‌चे किनरे व नवयुगाचे नाडकर्णी यांचाही माधवानुजांशीं दृढ परिचय होता. त्याचप्रमाणें महर्षि अण्णासाहेब पटवर्धन, यांचें कवीवर अपत्यवत् प्रेम होतें व म्हणून ते कवीच्या शेवटच्या दुखण्यांत मुद्दाम कल्याणास आले होते. सातारचे रा. ब. पारसनीस, मुंबईचे गजाननराव वैद्य यांच्याशीं त्यांचा जिव्हाळयाचा स्नेहसंबंध होता.

धंद्याचे निमित्तानें मुंबईचे डॉ. भाजेकर, वेलणकर व भडकमकर या त्रिवर्गाचा त्यांच्याशीं फार दृढ स्नेह होता. महाराष्ट्रांतील बहुतेक समकालीन कवि त्यांच्या परिचयाचे होते; पण त्यांपैकीं किरात, हे तर त्यांना वडील बंधूच्या सारखेच होते. मेडिकल स्कूलमध्यें असतांना कवीकडे

त्यांचें अन्तःकरण ओढलें गेलें व पुढें हा ओढा सारखा वृद्धिंगत होत गेला. ते स्वतः उच्च दर्जाचे कवि व रसिक असल्यामुळें ते मोठ्या अगत्यानें व प्रेमानें माधवानुजांस त्यांच्या कवितेंतील गुणदोष सांगत. केशवसुताप्रमाणें तुमच्या कवितेंत तडफ व कल्पनेची भरारी नाहीं असें ते म्हणत व माधवानुजांस ही गोष्ट कबूल होती. किरात, केशवसुत व माधवानुज यांच्या वारंवार भेटी होत व त्यांमध्यें होणारा वादविवाद माधवानुज ऐकत असत. कवीच्या शेवटच्या दुखण्यांत किरात मुद्दाम १५ दिवस त्यांच्याजवळ राहिले होते. कवीच्या अकालीं निधनामुळें किरातांचे अंतःकरणास जबर धक्का बसला.

दुसरे मित्र केशवसुत. यांच्या संगतीचा लाभ कवीस ८।९ वर्षेंच मिळाला. यांच्या प्रोत्साहनामुळें आपल्या कविता प्रसिद्ध करण्याची इच्छा माधवानुजांस झाली. ते केशवसुतांस कविसंप्रदायांत फार उच्च दर्जाचे मानीत. पुणें, मुंबई व कल्याण येथें या उभयतांच्या वारंवार भेटी होत व त्यांच्यांत काव्यशास्त्रविनोद होई. ' केशवसुत व त्यांची कविता ' या नांवाची एक कविता त्यांनीं २९ एप्रिल १९०५ रोजीं लिहावयास आरंभ केला व तिच्या ५।६ आर्या लिहिल्या. पुढें ती पुरी करावयाच्या पूर्वींच केशवसुतांच्या अकालीं निधनाची वार्ता कानीं आली तेव्हां मोठ्या कष्टानें

" काळें क्रूर तुला तों नेलें केशवसुता सख्या हरुनी ।
हळहळतें मन्मानस काळाचें अधम कृत्य हें स्मरुनी "

या ओळी लिहून माधवानुजांनीं ती कविता पुरी केली. या उभयता कवि मित्रांमध्यें झालेला पत्रव्यवहार उपलब्ध नसल्यामुळें वाचकवर्गाची फार हानि झालेली आहे.

तिसरे मित्र ' अनंततनय ' यांच्याशीं त्यांचा स्नेह बरोबरीच्या नात्याचा होता. प्लेगड्यूटीवर चाकण येथें असतांना १८९८ सालीं जी यांची ओळख झाली ती आमरण दृढच होती. प्रतिकूल परिस्थितीशीं शरीरबळाचे जोरावर टक्कर देण्याच्या अनंततनयांच्या चिकाटीचें त्यांस कौतुक वाटे. माधवानुजांनीं आपल्या हयातींत कविता प्रसिद्ध करावी असा आग्रह व खटपट अनंततनय करीत होते; पण कवींच्या नादुरुस्त प्रकृतीमुळें ही गोष्ट घडून आली

नाहीं. माधवानुजांची कविता अनंततनयांस फार आवडे. पण प्रकृतीच्या अस्वास्थ्यानें माधवानुजांस मनाप्रमाणें काव्यदेवीची सेवा करतां येत नाहीं याबद्दल त्यांस फार वाईट वाटे. पुणें येथें गेले म्हणजे माधवानुज हे अनंततनयांस अवश्य भेटत. पण अखेरच्या दुखण्यांत माधवानुजांस भेटण्याची अनंततनयांची उत्कट इच्छा कांहीं कारणामुळें पुरी झाली नाहीं व ही गोष्ट त्यांच्या मनाला फार लागली.

१९०७ सालाचे सुमारास त्यांची प्रकृति फार बिघडली. प्लूरसीमुळें डाव्या बरगडींत सुया टोंचल्याप्रमाणें वेदना होत. असे शरीरकष्ट होत असतांना भरींत भर म्हणून प्रपंचांतील अडचणी उभ्या होत्याच. पण त्यांतून मित्रांच्या व गांवकऱ्यांच्या सहाय्यानें ते निभावून जात होते. या सांसारिक तापाच्या व धंद्याच्या दगदगीचा विसर पडावा म्हणून ते काव्यरचना करीत असत. शरीरप्रकृति दुर्बल झाल्यामुळें ५।६ महिने विसावा घेणें या वेळेस अवश्य झालें होतें. पण माधवराव यांस कायमची नोकरी नसल्यामुळें १५।२० माणसांचे कुटुंबपोषणाची जबाबदारी यांजवरच होती त्यामुळें विश्रांतीशिवाय निभणार नाहीं असें समजत असूनही त्यांस ती घेतां आली नाहीं.

पैशाच्या दृष्टीनें त्यांस कल्याणला येण्यापासून फायदा झाला खरा; पण तेथील हवेनें मात्र त्यांचें जीवित अल्पायु व कष्टमय झालें. दिवसभरांत त्यांस तास दोन तास विसावा घेतां येत नसे. दुपारीं १।१॥ वाजतां जेऊन जरा आडवें आंग करावें तों कोणी तरी टांगा घेऊन बोलावण्यास हजर. कित्येक वेळां पानावर बसून तोंडांत घांस घालणार तों कोणी तरी बोलवायास येई; मग यांनीं वाढलेलें ताट तसेंच पुढें सारून रोगी पाहून यावें, मग परत आल्यावर दिनक्रम म्हणून चार घांस खावे.

स्वतः ते इतके प्रकृतीनें गांजलेले होते तरी रोग्याची हांक आल्याबरोबर ते त्याच्या सहाय्यास तयार असत. हिंवाळयाच्या दिवसांत दम्याचा सोसाटा चाललेला, झोप पुरी न झाल्यामुळें डोळे जडावलेले, अशा स्थितींत मध्यरात्रीं देखील ते रोग्यास पाहून येत. आपल्या धंद्यांत सहजासहजीं परोपकार घडतो ही त्यांस पूर्ण जाणीव असे व म्हणूनच ते केव्हांहि अशी संधि दवडीत नसत.

त्यांच्या अंगीं तडफ, कामाचा विलक्षण उरक व पाणीदारपणा असे. एकावेळीं नेटानें बसून त्यांनीं ७५ ताव इंग्रजी मजकूर १०।१२ तासांत सुवाच्य उतरून दिला होता, व लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे कसलेल्या कारकुनांनीं हें काम करणें शक्य नाहीं म्हणून सांगितलें होतें. त्यांचें प्रत्येक काम रेखीव व टापटिपीचें असे. पूर्ववयांत ते तापट होते पण उत्तरोत्तर विचारीपणामुळें ते शांत होत गेले. खोटे-पणाचा व नटवेपणाचा त्यांस तिटकारा असे. ते बोलण्यांत प्रेमळ, स्वभावानें उदार, वृत्तीनें समाधानी, वर्तनानें सरळ व सदा प्रसन्नमुख असत. ते आचारानें कर्मठ नसले तरी शुचिर्भूत असत. ते उत्कट शिवभक्त होते म्हणून वयाचे ३२ व्या वर्षी एक स्वतंत्र भिक्षूक ठेऊन ते रुद्र शिकले व नंतर मोठ्या आवडीनें त्यांनीं पहाटे रुद्रावर्तन सुरू केलें. पण पुढें दम्यानें जोर केल्यामुळें त्यांस ही गोष्ट सोडावी लागली. पण पुढें मरणापूर्वी एक महिनाभर जेव्हां त्यांस किंचित् आराम पडला तेव्हां पार्थिव-पूजा सुरू करण्याचा त्यांनीं निश्चय केला होता.

ते शरीरानें मध्यम उंचीचे, गौरवर्ण असून त्यांच्या डोळयांत एक प्रकारचें पाणी चमके. प्रत्यक्ष फोटो वाचकवर्गापुढें असल्यामुळें याहून शब्द-चित्र देण्याचें कारण नाहीं.

१९०७।८ चे सुमारास इंदुप्रकाशामध्यें एका गृहस्थानें माधवानुजांची बरीचशी कविता भाषांतरित आहे असा आक्षेप घेतला होता. त्याचें निराकरण ‘ चिंतामणि ’ कवीनें गणितशास्त्राधारें त्या काळापर्यंत माधवानुजांच्या प्रसिद्ध झालेल्या कवितांचें पर्यालोचन करून केलें होतें. त्यानंतरहि एक दोन प्रसंगीं असाच आक्षेप घेण्यांत आला होता. त्यांचीं कारणें पुढील प्रमाणें असावीं. पहिलें कारण म्हणजे आक्षेपकांचे डोळयापुढें आद्योपान्त कविकृति नसते. दुसरें म्हणजे १९०३ ते १९०६ या वर्षांत मधुसूदन दत्ताचें मेघनादवध व पुढें १९१३ ते १९१५ सालांत रवीन्द्रनाथ टागोर यांच्या गीताञ्जलीचें मराठी कविताबद्ध रूपांतर करण्यावर माधवानुजांनीं भर दिल्यामुळें सामान्य वाचकांस त्यांच्या स्वतंत्र काव्यकृतीचें विस्मरण होई, वरील कारणांमुळें घेतल्या गेलेल्या आक्षेपांस प्रस्तुतच्या

काव्यसंग्रहानें निर्विवाद व कायमचें उत्तर मिळणार आहे. कारण त्यांच्या १३५ स्फुट कवितांपैकीं गीताञ्जलीसुद्धां फक्त १८ च कविता बंगालींतून रूपांतरवजा असून बाकी ११७ स्वतंत्र आहेत. १९१० सालापासून १९१६ सालापर्यंत स्वयंप्रेरणेनें अशी त्यांनीं क्वचित्च कविता लिहिली. ज्या कांहीं १०।१२ लिहिल्या आहेत त्या निरनिराळया मासिकांच्या संपादकांच्या आग्रहावरून लिहिल्या गेलेल्या आहेत. त्या लिहिण्याकरितां त्यांना आपलें वाचन चालू ठेवावें लागे. त्यामुळें Ella Wilar Wlcox व Emerson यांच्या कविता, जपानी व चिनी भाषेंतील उत्कृष्ट राष्ट्रीय गीतें व ऐतिहासिक काव्यप्रसंगाकरितां कर्नल टॉडचें ' राजस्थान ' हीं पुस्तकें त्यांनीं वाचलीं. मधून मधून आनंदांत प्रसिद्ध करण्याकरितां सुलभ कविता व विविधज्ञानविस्ताराकरितां ४।५ कविता त्यांनीं लिहिल्या. पैकीं आनंदाकरितां तर आपल्या जुन्या वहींतील १८९६ सालीं लिहिलेली ' तेरड्याचें फूल ' ही कविता धाडून दिली. १९१२ पासून धंद्याचीं व संसाराचीं कामें त्यांना इतकीं असत कीं आपल्या आवडत्या विषयाकडे लक्ष देण्यास त्यांस सवडच मिळत नसे. उत्तरोत्तर प्रकृति क्षीण होतच होती. त्यांत १९१३ सालीं हार्टडिसीझची भर पडली. त्यामुळें ते अधिकच खचत चालले. पण अशी प्रकृति असतांनाही रसिकवर्य तात्यासाहेब केळकर यांनीं गीताञ्जलीचा स्वाद मराठी वाचकांस मिळण्याकरितां तुम्हीं त्याचें कविताबद्ध रूपान्तर करा अशी इच्छा प्रकट केल्यावरून प्रेमानें व आवडीनें माधवानुजांनीं रवीन्द्रबाबूंचीं सर्व बंगाली पुस्तकें आणून त्यांचें परिशीलन केलें व त्या उद्योगाचें फल म्हणजेच त्यांचीं गीताञ्जलीचीं केसरींत प्रसिद्ध झालेलीं गीतें होत.

१९१५ सालाच्या एप्रिलपासून त्यांची प्रकृति पार ढासळली. ते परत चाकण येथें हवा पालटण्याकरितां गेले. तेथें पहिले महिना पंधरा दिवस जरा बरें वाटलें, पण खाण्यांत येणारे तांदूळ आंबेमोहराचे नव्याचे असल्यामुळें पचनेंद्रियावर फाजील ताण पडून एके रात्रींत त्यांचें लिव्हर इतकें वाढलें कीं, दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांस आपली अवस्था फार भयंकर झाल्याचें आढळून आलें, व यापुढें चाकणसारख्या आडवळणाचे गांवीं रहाणें धोक्याचें

वाढून ते लागलेच एकटेच तळेगांवीं निघून आले. पुढें कल्याणला आल्या-वर २ महिनेपर्यंत त्यांची प्रकृति चिंताजनकच होती. पुढें २।३ महिने कांहींसा उतार पडला पण १९१५ चे नव्हेम्बर पासून त्यांस Anjina Pectoris चे झटके येऊं लागले व दिवसांतून ४।५ वेळां श्वासोश्वास करणें अशक्य होऊन जीव गुदमरूं लागला. प्रकृतीच्या या अत्यावस्थ स्थितींतच गांवांत प्लेगची धामधूम सुरू झाली म्हणून ते बाहेर रहावयास गेले. ती जागा अत्यंत अडचणीची व अपुरी, थंडीचा कडाका फार, ते स्वतः आजारी म्हणून घरांत शुश्रूषेकरितां येऊन राहिलेल्या माणसांची गर्दी, अशा सर्व बाजूंनीं सारख्या आपत्ति आलेल्या होत्या. त्यांतच रोगाचें पाऊल पुढें पडून दुखणें उदरावर गेलें. हातापायास सूज आली. घोटभर पाणी प्यायलें कीं, पोटास रग लागे. २।२॥ महिन्यांत झोप बिलकूल लागलेली नव्हती. इतरांच्या बाबतींत कसल्याही रोगास हार न जाणारे डॉक्टर ( माधवानुज ) स्वतः असहाय झाले. त्यामुळें अतिपरिचयाचे स्नेही भेटावयास येतांच त्यांच्या डोळयांना पाणी येऊं लागलें. समाचारास येणाऱ्या इसमाशीं मनमोकळेपणानें बोलणें चालणें होतच असे. यांच्या-शिवाय इतराचें औषध न घेणाऱ्या रोग्यास औषधोपचार सुचवीतच होते. पण स्वतःच्या रोगाचें हरण करणारा भगवान् श्रीशंकराशिवाय दुसरा कोणी नाहीं हें ओळखून त्याची मनोभावें मानसिक सेवा आरंभिली. केळगांवचे विष्णुपंत लेले व किरात अशांच्या सत्संगतीचा लाभ या दुखण्यांत घडलेलाच होता. ऐहिक बाबींची निरवानिरव चालविली. मध्यंतरीं कांहींसा उतार पडलासा वाटला. त्यामुळें ते स्वतःहि कांहींस फसले. पण १ मार्चला गेले ३ महिन्यांत एकदाहि न आलेला ताप आला. त्यामुळें घशास कोरड पडली. अंगाची आग होऊं लागली. पण अखेर कुपथ्य होऊं नये म्हणून शिवरात्रीचे दिवशीं पाण्याचा थेंबहि प्यायले नाहींत. संध्या-काळपासून जीव घाबरा होऊं लागला. १० वाजतां इतर मंडळीस भिऊं नका असें सांगितलें. पण नंतर ११॥ चे सुमारास एकाएकीं हृदयाची क्रिया बंद पडली, व सारेंच आटपलें ! पुढें काय लिहूं ! ज्यांच्या कृपा-छत्राखालीं लहानाचा मोठा झालों तें छत्र एकदम ढासळून पडलें ! ! !

# माधवानुज.

## १. परळीची आग.

१८९२ सालीं परळीस आग लागून १५ घरें खाक् झालीं; त्या भयंकर
गीं कवि हजर होता, व त्या वेळेस खालील पद्यें त्यानें लिहिलीं.

(एका स्त्रीचा विलाप.)

घांवा ! घांवा ! त्वरित शमवा अग्निनारायणाला
कोण्या दुष्टें अवचित असा घातला घोर घाला;
देवा आम्हांकडुनि असली कोणती चूक झाली
जीच्या योगें त्वदिय हृदयांतील माया निमाली ? १

आणा पाणी झडकरि कुणी आग ही पेट घेई
हा हा ! आतां स्थिति अमुचि ती काय होणार बाई;
याहो याहो सकल जनहो काय मौजा पहातां
ऐशा वेळीं स्फुरण न चढे तूमच्या काय हातां ? २

काढा काढा शिरुनि सदनीं माझिया तान्हुल्याला
ओढा कीं हो झडकरि कुणी सांपडे जें तुम्हांला,
भीती सोडा सकल मनिंची हो धरा धीर चित्तीं
धैर्यत्यागा कधिं न करणें सज्जनीं हीच रीती. ३

झंजावाता क्षणभरि सख्या थांब तूं वाहण्याचा
अग्नीलागीं मदत करण्या योग्य हा वेळ कैंचा ?
आहे मैत्री उभय तुमची स्निग्ध, हें ज्ञात मातें
या दीनेची समयिं परि या येउं दे कींव तूंतें. ४

आधीं वन्हि प्रकटित करी आपुल्या चंडतेला
त्यांतूनीं हा दिनकर मिळे साह्यकारी जयाला,
आहे झाला म्हणुन भडका पोळतें आंग फार
होणें कैशी शिव शिव गती आमुची ती अखेर ! ५

बाबा सूर्या प्रखरकिरणा एवढा तप्त तूं कां
दीना कन्या तुजसि सदया मारिते दीर्घ हांका,
माझी येवो तुजसि करुणा आंवरी बा करांतें
तारी तारी झडकरि अतां या तुझ्या लेकरांतें ! ६

बारा गेले उलटुनि असे ऐन झाली दुपार
खालूनी हे मम दिनकरा पोळती पाय फार,
तापे डोकें अतिशय असे तोंड गेलें सुकून
मेघामध्यें क्षण ह्मणुनि तूं स्वस्थ राहे लपून. ७

पाणी पाणी करुनि मम हा कोरडा कंठ झाला
वायूलागीं जरि विनविलें ये न माया तयाला !
केली नानापरि विनवणी मी जरी भास्कराची
आली नाहीं लवभरि तया कींव या कन्यकेची. ८

झाली झाली हर ! हर ! दयासागरा ठार रक्षा
आली आतां खचित अमुच्या या कपाळीं कुभिक्षा;
नाहीं कांहीं इतर उरला मार्ग आम्हां सुखाचा
मेल्या दैवा शरम न तुला वाटली काय नीचा ? ९

गेले डोळे रडुनि रडुनी फार माझे सुजोनी
नाहीं झाला तिळहि अमुचा फायदा ओरडोनी,
आतां माझे करितिल पती काय ते दीनवाणे
आम्हांलागीं अवचित कसें ग्रासिलें संकटानें ! १०

नाहीं अम्हां जवळ अडका एक खर्चावयाला
नाहीं दाणा खचित उरला एकही खावयाला,
गेलीं सारीं जळुनि वसनें जाहली ठार दैना
कंठावे ते दिन तरि कसे जीविताचे कळेना. ११

आला वर्षासमय, सजला मेघ वृष्टी कराया
आम्हां नाहीं परि गरिबशी झोंपडीही बसाया,
कोठें जावें निघुनि न कळे कोण देईल थारा
आहे देवा बहुत अमुचा जाहला कोंडमारा. १२

केला आतां अतिशय जरी शोक मी व्यर्थ होय
गेली गोष्टी घडुनि न तया राहिलासे उपाय,
अंतीं आतां तुज करितसे एक देवा विनंती
अन्या कोणावरि न असली पाठवावी विपत्ती ! १३

**पडघवली, १८९२.**

---

## २. प्रीतीचा हलवा.

कां बाले हलवा करीत बससी तूं व्यर्थ ओटीवरी ?
वाटे काय कृतींत लाभ तुज या जाणे न मी अंतरीं;
त्रासा सोसुनि एवढ्या तव, मुली, होणार थोडें हित,
अल्पाच्याकरितां बहू गमविणें ही का सुधी पद्धत ? १

अग्नीशीं बसुनी सुकोमल तनू झाली निखाऱ्यापरी,
झाले लाल तुझे कपोल मृदु जे ताज्या गुलाबापरी;
एकामागुनि एक घर्मकण गे ! त्यांच्यावरी लोटले,
शोभे जेंवि दवें गुलाबकलिका तेंवी मला भासले. २

प्रीतीयुक्त मनें करूनि हलवा देणें जरी, गे, प्रिया,
घ्यावा त्रास करूनियां स्वतनुला बाई वृथा कासया ?
" नाथा दे हलवा करून " तुज हें प्रीतीच सांगे जरी
प्रीतीतें हलवा कसा मधुर हा लागेल नेणे तरी ! ३

तूझे निष्कपटी मधूर वच जें मानूनि त्यातें तिल,
प्रीती जी हृदयीं तुझ्या वसतसे ती शर्करा निर्मल
घेऊनी, हलवा तयार कर गे ! नाथा तुझ्या द्यावया
ज्यातें सेवुनि तोष होइल खरा चित्ताप्रती त्याचिया. ४

" दे मातें हलवा, प्रिये ! " प्रियकरें केली कधीं मागणी,
आहे जो हलवा तुला कथियला तो नीट आणी मनीं;

त्यालागीं करण्या तुला अडथळा येणार नाहीं कदा
बाजारीं चढला जरी दर अती त्या साखरेचा सदा ! ९

१४ जानेवरी, १८९३.

---

## ३. आशा.

" आहे काय जगांत लाभ जगुनी निःसार सारें दिसे
औदासीन्य असें भरूनि उरलें आनंद कोठें नसे ! "
ऐसे क्रूर विचार येतिल जधीं आशे ! मदीयांतरीं
द्याया खिन्न मनास धीर मम तूं धांवून ये सत्वरी. १

जीं मातें जगतांत या प्रियकर प्राणाहुनी वाटती
प्रेमाच्या लहरी जयास बघुनी माझ्या हृदीं ऊठती,
ऐशांतील कुणी विपन्न जर, मी वेडावलों देखुनी
आशे खिन्न मनास धीर मम तूं देण्यास ये धांवुनी. २

" दासी मी तुमची " असें वदुनियां आधीं वरूनी मनें
मागूनी अवधीरिलें जरि कुणी क्रूरें मला स्त्रीजनें,
प्रीतीहीन निराश होउनि अती मी बैसतां त्या क्षणीं
द्याया खिन्न मनास धीर मम ये धावून आशे झणीं. ३

एकादी झटुनी स्वयें परहितासाठीं करावी कृती
वाटूनी मज, लागलों बहुत मी प्रेमें करायास ती,
येऊनी इतुक्यांत दुष्ट शिवली मातें निराशा जरी
आशे खिन्न मनास धीर मम तूं देण्यास ये सत्वरी. ४

आर्यावर्त सुरम्य देश अमुचा पावो सदा उन्नती
शत्रूंची सगळ्या तदीयचि पडो मृत्यूमुखीं आहुती;
इच्छा होउनि पूर्ण ही न, जरि ये मध्यंतरीं आपदा
द्याया धीर मनास ये झडकरी धांवूनि आशे तदा. ५

अस्ता क्रूर समस्त जाउनि जुन्या चाली रिती लौकरी
होवो स्तुत्य सुधारणा प्रिय अती या आर्यभूमीवरी;
आले लोक दुराग्रही जर कधीं या आड हेतूंचिया
आशे धांवुनि येइ गे मम मना उत्साह तो द्यावया. ६

जेवीं स्वच्छजला नदी प्रिय गमे भारी तृषार्ता नरा
आशे तेविं अम्हांस तूं, तुजविणें नाहीं दुजा आसरा;
तूझी पूर्ण कृपा असेल जरि या अज्ञान बालावरी
काळाचें भय ही न मी मग कधीं मानीन गे अंतरीं ! ७

पुणें, ११ आगष्ट, १८९३.

# ४. पर्वती.

पद.

पर्वती । जहाली किती । दीन संप्रती । स्थिती तव बाई
तुज पाहुनि हृदयीं शोक अनावर होई ! धृ०
कोपलें । दैव लोपलें । तेज मागलें । कुठें तव सगळें !
त्वच्चरणपरायण दास कुठें ते अगळे ! १
समशेर । घेउनी ठार । करुनि रिपुभार । तदिय शिरकमलें
वाहिलीं तयांनीं चरणीं तव विमले ! २
उल्हास । वाटला खास । सकल चित्तांस । पाहुनी तुजसी
परि उदास आतां हाय अम्हां तूं दिससी. ३
हें पुणें । दिसतसे सुनें । नृपालाविणें । पहागे भासे
मृत, शरीर, आत्मा सोडुनी जातां जैसें. ४
गांजिती । संकटें अती । प्रजा संप्रति । जहाली दीना
ही पाहुनि दैना ये न कशी तुज करुणा ! ५
स्वामिनी । स्वकर जोडुनी । तुझी विनवणी । करीं मी अंतीं
हो प्रबुद्ध अतुल प्रकट करीं निजशक्ति ! ६
सत्वरी । शक्ति दे खरी । आमुच्याकरीं । कृपाळू माते
मग पळांत टाकूं जिंकुनि दुर्दैवातें ! ७

पुणें, १५ आगष्ट, १८९२.

## ८. 'करमणूक.'

करमणूक येण्यास नेहमींपेक्षां उशीर झाल्यामुळें कवीचें मन खिन्न होऊन सुचलेलं विचार.

बाई कर्मणुकी, तुला उशिर कां येण्यास गे लागला
द्याया भेट मला; असे तुजविणें हा जीव कष्टावला
ये तूं लौकरि ये जिथें असशि गे तेथूनि धांवूनि ये
भेटीवीण तुझ्या मदीय हृदया उल्हास नाहीं सये. १

अस्ता जाउनि तो गभस्ति, पडतां अंधार आलों घरीं
हाहा ! मी चुकलों कुठें घर इथें तें राहियेलें दुरी,
चित्तीं चिंतित कीं तुला उचलुनी घेऊनि वेगें करीं
प्रेमें बोधसुधेस सेविन, शिवे तों ती निराशा खरी ! २

होतां यापरि मी निराश वरिली चित्तें उदासीनता
नेत्रां मत्स्थितिची भयाण पुतळी तेव्हां दिसे तत्वतां.
प्रेमाची हृदयें त्यजूनि सगळीं येथून हाहा ! दुरी
पोटाची भरण्यास खांच नशिबीं आलीचना नोकरी ! ३

कोठें जन्मद मत्पिता वसतसे कोठें असे माऊली
दुःखाच्या समयीं मजप्रति गमे जी आश्रया सांउली,
चित्ताची जडणी, मना रिझवणी, साऱ्या सुखांची खनी
कोठें प्रेमळ भामिनी वसतसे खेड्यांत रानीं वनीं ! ४

होत्या येत अशा विचारलहरी जोरांत माझ्या मनीं
येऊनी इतुक्यांत तों अदळला कानीं सुदिव्य ध्वनी
"वेड्या होसि निराश कां वद असा ही खिन्नता कासया
आहे कर्मणुक प्रसन्न करण्या चित्ताप्रती तूझिया. ५

साधी लीन अती विनोदचतुरा सत्यप्रियालापिणी
लोकां सर्व सुधारण्या झटतसे निर्भीड जी होउनी,
सांगे गोष्टि कधीं कधींहि चुटके सांगे मना रंजवी
दावी सृष्टचमत्कृती कधिंकधीं गाई सुकाव्यें नवीं." ६

ऐसे ऐकुनि रम्यशब्द हृदया आली जरी शांतता
उत्कंठा मनिंची दुणावलि परि दुर्वार्य हो तत्वतां;
माझ्यानें धरवे न धीर तुजला मी उत्क भेटावया
ये गे कर्मणुकी जिथें असशि तूं तेथूनि धांवूनियां ! ७

ठाणें, २२ डिसेंबर, १८९४.

---

## ६. 'कुणिकडे.'

कुणिकडे दडाले अमुचे उमदे वीर।
ओसाड जाहली दुनिया झाला हाहाःकार ! ध्रु०

मर्दुमकीचे गेले दिवस शूरत्वाचा झाला ऱ्हास
चढला गंजचि समशेरींस झाले बोथट भाले खास
कुणिकडे ! १

कोठें गेला शूर शिवाजी कोठें छातीचा तानाजी
कोठें पडला जाउनि बाजी धीट शिपाई तो संभाजी
कुणिकडे ! २

रावबाजि तो कुठुनी भेटे पाटिल बोवा गेले कोठें
चतुर मुत्सद्दी नाना मोठे हिरे हरपले दैवाचि खोटें
कुणिकडे ! ३

प्रसंग जेथें दारुण झाला कोण बिचारी पानिपताला
'अष्टें' 'खरडें' या नांवाला लोक लागले विसरायाला
कुणिकडे ! ४

प्रचंड हत्ती ते जिलबीचे उंटें सांडण गण बाजींचे
शिंग तुतारी रणभेरींचे निनाद विलया गेले साचे
कुणिकडे ! ५

काय दयेचा पाझर सुकला आम्हां लावुनियां रडण्याला
वीररवीनो ! कां मावळलां तिमिर ग्रासी या भूमीला
कुणिकडे ! ६

शूर पवाडे तुमचे साचे कुठुनी नशिबीं हो गायाचे
आम्ही खडतर प्रारब्धाचे सूर काढितो 'रडगाण्याचे' !
कुणिकडे ! ७

हे शूरांनो निज तेजाला देहीं अमुच्या सत्वर वाला
म्हणजे दावुनि शूरत्वाला बदलुनि टाकूं दीनदशेला
कुणिकडे ! ८

मुंबई, ६ एप्रिल, १८९५.

---

## ७. बर्न्स कवि.

जन्म १७५९ मृत्यु १७९६

वर्षें शंभर जाहलीं कविवरा ! तूंतें मरोनी पुरीं
देई त्वत्कविता अजूनि हृदया आनंद माझ्या तरी;
कोठें देश तुझा जलापलिकडे भारी दुरी येथुनी
आर्यावर्त कुठें, परंतु उपजे वात्सल्य माझ्या मनीं. १

दोघे जन्म न पावलों, न बसलों एक्या कुळीं वा स्थळीं,
नाहीं भेट, तरी परस्पर मनें वात्सल्य तें आकळी;
आहे प्रेम कसें कुठें वसतसे तज्जन्म कोठें असे
नाहीं आजवरी कधीं उकलिलें हें गूढ कोणी कसें ! २

वस्तू दोन परस्परां सतत ज्या तत्त्वामुळें ओढिती
तत्त्वें त्याच रिघे तुझ्या कविवरा ! काव्यांत माझी मती;
जैसा सद्रस पाझरे उकलितां द्राक्षाफळातें करें
वाहे प्रेम तसें तुझें उकलितां सत्काव्य म्यां आतुरें. ३

प्रेमानें धरुनी करांत अपुल्या शेतामधीं नांगर
लीलेनें जणुं गाइलीं बहु तुवां काव्यें सदा सुंदर,
साधीं नम्र खरीं तुला यश परी त्याहीं दिलें भूवरीं
जाईचीं कुसुमें वनीं विकसलीं कां वास नोहे तरी ? ४

शेता नांगरितां हळूच निघतां उंदीर मातींतुनी
केलें प्रेमळ काव्य त्यावर तुवां त्यातें झणीं पाहुनी;
साधा मूषक पावला अमरता संगें तुझ्या तो परी
होतां सज्जनसंग नीच जनही मोठेपणातें वरी. ५

पद्यें पर्णकुटींत राहुनि तुवां आजन्म जीं गाइलीं
लीलेनें, असती अहा मज गमे दिव्यत्व तीं पावलीं;
त्या पद्यांत दिसे तुझी सुरुचिरा मातें सदा आकृति
वर्षें शंभर लोटलीं तुज जरी सोडोनि या भूप्रति. ६

जेथें निर्झर वाहती, विकसती नाना लता सुंदर,
वायू शीतल खेळती, द्विजतती आलापिती सुस्वर,
ऐशा शांत निसर्गरम्य विषयीं वासा करूनी सदा
काव्यें गाउनि धन्य भूमि अपुली केली तुवां जन्मदा. ७

साधें प्रेमळ काव्य वाचित तुझें स्वच्छंद होतों घरीं
कांहीं सेवुनि रम्य पद्यकुसुमें आनंदलों अंतरीं,
झाला सौख्यद पूज्य भाव हृदयीं उत्पन्न माझ्या अती
केलें नम्रपणें तया प्रकट मी शार्दूलविक्रीडितीं. ८

१८९६.

# ८. कुयडी तीर्थ.

हें स्थान चाफळाजवळ आहे. या तीर्थाच्या उत्पत्तीविषयीं खालील आख्यायिका सांगण्यांत येते.

घेऊनि एक दिवशीं शिवभूपतीस
गेले वनांत फिरण्या गुरु रामदास,
जायास सांगुनि समस्त जनांस मागें
ते चालले हळुहळू विपिनांत दोघे. १

होती तदा किति तरी रमणीय वेला
तेजोनिधी दिनमणी गगनीं उदेला;
नानापरी विकसलीं सुमनें सुरेख
यद्रूप पाहुनि वरी मन फार तोख. २

पुष्पांतला मधुर सेवुनि गंध सारा
होता वहात गगनीं बहुमंद वारा;
वृक्षांवरी बसुनि पाक्षि समस्त होते
रम्यस्वनें करित मंजुल गायनातें. ३

चाले प्रभातसमयीं गुरुशिष्य जोडी
ओढे नद्या गहन लंघित खोल खिंडी;
होत्या वनीं उपलकंटकयुक्त वाटा
त्यांच्या परंतु चरणीं रुतला न कांटा. ४

मार्गीं शिवास शिकवी गुरु राजनीति
  नाना कथा कथुनि दाखवुनी प्रतीति;
ऐकूनि शब्द गुरुचे बहु दिव्य गोड
  चित्तीं झणी नृपतिच्या पडला उजेड. ५

हर्षोदधींत शिवभूपति मग्न झाला,
  झाला प्रवास किति तो न कळे तयाला;
मार्ग क्रमीत असतां भरली दुपार
  चालूनि फार थकला नृपती अखेर. ६

संताप दे वरुनि दारुण अंशुमाली
  धूलीमुळें चरण पोळति फार खालीं,
लागे तहान नुरलें बल चालण्याचें
  कोमेजलें वदनपंकज भूपतीचें. ७

'थांबा' म्हणूनि वदवे गुरुतें न त्याला
  होता सुशिष्य गुरुमागुनि चाललेला;
कैसा तरी हळुहळू उचली पदांतें
  तों पाहिलें वळुनियां गुरुनें तयातें. ८

'कांरे हळू उचलिसी, शिवबा पदातें ?
  गेलास काय दमुनी तुज काय होतें ?'
ऐसे पुसे सदय सद्गुरु त्या शिवाला
  देई परी न नृप उत्तर तें तयाला. ९

ज्यांचीं पदें स्मरुनि किंकर मुक्त झाले
ज्या वांचुनी नच चराचर विश्व चाले,
त्या जाणिलें गुरुवरें नृपतिस्थितीतें
बोले सगद्गद म्हणूनि गुरू शिवातें. १०

' वत्सा, मनीं तिळभरी नच खेद मानीं,
देतों तुला त्वरित निर्मळ गोड पाणी;
ऐसें वदूनि अपुला उचलून पाणी
भूमीवरी शिवगुरू कुबडीस हाणी. ११

तों वर्तलें नवल भूमि दुभंग होई
आंतूनि निर्झर मनोहर एक येई !
आकंठ तज्जल पिऊनि नृपाल धाला
चित्तीं स्मरे गुरुचिया विमलां पदांला. १२

तेव्हांपासुनि झाली ती भूमी सुप्रसिद्ध या लोकीं
' कुबडी–तीर्थ ' सुनामें वर्णियली माधवानुजें श्लोकीं. १३

सातारा, १५ मे, १८९६.

## ९. सज्जनगड.

भूपाळी.

साताऱ्याजवळील परळीचा किल्ला ऊर्फ सज्जनगड पहावयास कवि गेला होता व त्या समयीं खालील पद्य त्यानें रचून समर्थांच्या चरणीं अर्पिलें होतें.

सज्जनगड देखिला नयनीं चित्त मुदित झालें
श्रीरामदासचरणीं भावें मस्तक नत केलें, ध्रु०

मातले यवन महीवर फार
करिती गोब्राह्मणछल अनिवार,
करावया तयांचा संहार
लोकीं अवतरले. १

बोधिला सेवक शिवराणा
सांगुनी राज्याच्या धोरणा,
स्वप्रेमाची उज्वल खुणा
भगवें पट दिधलें. २

' चाल करींगा शत्रूंवरी
होशिल विजयी तूं संगरीं '
शिवास उत्तेजुनि यापरी
आपण दुरि गेले. ३

प्रेमें राहुनि सज्जनगडीं
हातीं घेउनिया कुबडी
हरुनी दासांचीं सांकडीं
त्यांतें तोषविलें. ४

कांहीं काल गडीं बसुनी
अखिल रिपूंतें संहारुनी
गोविप्रातें सांभाळुनी
अंतर्हित झाले. ५

ऐसे सज्जनगडकृतवास
शिवगुरू सद्गुरु रामदास
यत्स्मृति नाशी सर्व तमास
हृदयीं ज्यां धरिले. ६

आर्यावर्ती फिरुनि जरी
ऐसा कोणी अवतारी
होईल दैवें, समजा तरी
दैन्य लया गेलें ! ७

सज्जनगड, २५ मे, १८९६.

---

## १०. भवानी तलवार.

( चाल–माझें नवलाचें पांखरूं । कसें मी मारूं. )

स्वामी तव गेला निघुनी । दीन भवानी धृ०

नाथ तुझा गे विक्रमशाली
कुमारमाता अगळा व्याली
यत्कीर्तिजलीं पृथिवी न्हाली
तो नर मानी. १

संगें असतां शिवरायाचे
तुवां पराक्रम केले साचे
गळे कापिले अमित रिपूंचे
जहाली हानि. २

जोंवरि होता तो नरवीर
तुजला होतें तेज अपार
तुला पाहतां असंख्य शूर
पळाले रानीं. ३

असे विचित्रा गति दैवाची
हीन दशा तुज आली साची

होसी दासी परकीयांची
राहुनि म्यानीं. ४

स्वामी जोंवर होता त्राता
काळहि थरथर कांपत होता
स्पर्शी तुजला परि तो आतां
नीच करांनीं. ५

तुझी अवस्था पाहुनि, माते,
हृदय विषादें दाटुनि येतें
ये अश्रूंचें नेत्रीं भरतें
धीर सुटूनी. ६

अश्रू माझे पडुनि वरते
तेज जरी तव पूर्विल येतें
त्यांस गाळिलें असतें येथें
सतत बसूनी. ७

मूर्तिमती तूं वीरश्री गे !
स्फुरित करी हीं अमुचीं अंगें !
दीन दशेला म्हणजे वेगें
टाकुं हरूनी. ८

सातारा, ३० मे, १८९६.

---

## ११. पारिजातकाचें फूल.

( सकाळीं झाडावरून पडतांना पाहून सुचलेले विचार. )

पुण्यें उणे जे पडतात लोक
ते पावती सत्वर मृत्युलोक,
वदे अशी संतत संतवाणी
तत्सत्यता पाहिली काय कोणीं ? १

पुष्पा, तुला या समयीं बघून
साधूक्ति वाटे मज सत्य जाण,
आलेंस खालीं तरुतें त्यजून
पुण्यांश जातां सगळा सरून. २

स्वर्गोपरी वृक्ष तुला जहाला
सौख्यास देता, अनि घात झाला;
आतां तुटे संगति सज्जनांची
त्या रम्य वृक्षावरच्या फुलांची. ३

सेवा तुझी शीतल मारुतांनीं
केली किती गाउनि गोड गाणीं,
गुंजारवा सुंदर षट्पदांनीं
केलें मरंदा तुझिया भुलोनी. ४

सेवावयातें तुझिया सुवासा
करीत होते अहि नित्य वासा,
समस्त आतां विपरीत झालें
मातींत दैवें तुज फेंकियेलें. ५

स्थिती तरूच्या वरची सुखाची
मातींत झाली विपरीत साची,
तो स्वर्ग कोठें सुखशांतिसार
पृथ्वी कुठें दुःखमयी अपार ! ६

होईल आतां तुज दुःख फार
पुष्पा, तुला कीटक ओढणार
मनुष्य पापी तुज वेंचितील
मुलें नखांहीं तुज टोंचितील. ७

जरी तुला त्रास अतीव होय
दिव्यत्व तूं सोडुं नको स्वकीय;
आली जरी दीन दशा अपार
न सोडिती स्वत्व कदापि धीर. ८

घडेल संसर्ग तुझा जयांस
प्रभाव दावी अपुला तयांस;

ज्या बोलती ‘ स्वत्व ’ असें जगीं या
तें सांग तूं सर्व जनां शिकाया. ९

पडघवली, २० जुलई, १८९६.

---

## १२. पद्यपंक्ति.

आशा म्हणजे काय असे ?
कमलावरचा जल बिंदू,
मानिति मौक्तिक मतिमंदू
सुज्ञां परि तें जलचि दिसे. १

जयास म्हणती हर्ष जनीं,
प्रतिबिंबचि तें चंद्राचें
जलीं दिसतसे मौजेचें,
क्षणांत जाई परि निघुनी. २

वैभव म्हणजे काय तरी !
ज्योत दिव्याची केवळ तें,
फू करितां ती मालवते
तेज निघोनि जाय दुरी. ३

जियेस मैत्री जन बोले,
शवावरिल ती सुममाला,
वास मिळेना कवणाला
क्षणभर निववी परि डोळे. ४

यौवन म्हणजे काय जनीं ?
महोदधीची लाट असे,
क्षणभर मोठी फार दिसे
पळांत जाई परि विरुनी. ५

लोक बोलती धर्म जया,
केवळ पोकळ असे ध्वनी,
कांहीं नसतां दृश्य जनीं
देइ कल्पना रूप तया. ६

प्रचंड सृष्टी जया वरी,
ज्याविण जग हें शून्य दिसे,
असें प्रेम तें काय असे ?
सकल जगा जें दास करी ! ७

कांहीं नाहीं केवळ कोळी,
सूक्ष्म तंतुतें काढोनी,

सर्व जगातें बांधोनी
टाकी पसरुनि बहु जाळीं. ८

कशांत आहे सौख्य खरें ?
पहा मनातें विचारुनी,
शांति जगीं या सुखजननी !
जया लाधली तोचि तरे. ९

१८ ऑगष्ट, १८९६.

---

## १३. संध्याकाळची सहल.

चलरे मित्रा झडकरि जाऊं कोठें दूर फिराया
अभ्यासातें करुनी शिणली कोमल तव ही काया. १

कशास घेसी पुस्तक हातीं फिरफिरुनी वाचाया
काय फायदा वाटे तुजला करिसी श्रम कां वायां ! २

किती मजेचा ! किती सुखाचा दिसतो सायंकाल
किती मनोहर दिसतो गगनीं दिनकर तेजोगोल. २

येई सत्वर पती आपुला भेटायातें आतां
म्हणुनि जहाली दिशा पश्चिमा आशायुक्ता रक्ता. ४

वृक्षस्कंधीं बसुनी मैना मधुर करी गानातें
गोड तियेच्या ऐकुनि ताना हर्ष अती कानांतें. ५

स्वच्छंदानें पहा कसा तो फिरतो नादी भ्रमर
स्वतंत्रतेचें स्तोत्र गातसे गुणगुण करुनी फार. ६

पुढें येऊनी जरा पहारे सृष्टीची शोभा या
कळे न ज्यातें मूल्य तियेचें जन्म तयाचे वायां. ७

सृष्टी केवळ सुदिव्य पुस्तक बोधानें भरलेलें
जो जन त्याचीं वाची पानें त्यातें ज्ञान उदेलें. ८

वल्ली, पादप, पक्षी, वायू, सागर, तें आकाश
ज्ञान नरा जें देती न मिळे शिकुनी नाना कोश. ९

पुरे वाचणें पुरे नकोरे हातीं पुस्तक घेऊं
सृष्टिपुस्तका वाचायातें चलरे येथुनि जाऊं. १०

धडे तयांतिल पाठ करूनी येऊं मग निजधामा
ज्ञानदीपिका उज्वल करुनी शोधूं आत्मारामा ११

२८ ऑगष्ट, १८९६.

## १४. तेरड्याचें फूल.

भाऊ, नवीन बघ हें फुल तेरड्याचें
सौंदर्य यावर किती विलसे मजेचें,
हें स्पर्शकोमल किती सुखवी करांस
हा लाल रंग रमवी मम लोचनांस. १

मिथ्या न तूं सकल जें वदतेस, ताई,
हें तेज सुंदर परी टिकणार नाहीं
त्वां पाहिलेंस तिसऱ्या दिवशीं फुलास
होशील तूं बघुनि त्यास तरी उदास. २

सौंदर्य वैभव दिसे रमणीय साचें
आहे परी सकल हें धन दों दिसांचें,
आणूनि हाच सुविचार मनीं विवेकी
जैं जाय वैभव लया पडती न शोकीं. ३

आतां मनांत धर एकचि गोष्ट ताई,
दैवें जरी तुजसी वैभव थोर येई,
मोहांत तूं पडुं नको क्षणही तयाचे
जाऊं नको विसरुनी फुल तेरड्याचें. ४

पडघवली, १ सप्टेंबर, १८९६.

# १५ आरोग्याप्रत.

( कवि चार वर्षें सतत आजारी असतां एक दिवस त्रासून खालील उद्गार त्यानें काढिले आहेत. )

ये, अनामया, भेट दे जरा
जाहला असे जीव घाबरा;
सोडिलें तुवां कासया मला
कोणता गुन्हा सांग जाहला. १

काळ कंठिला मी सुखें किती
संगतीं तुझ्या त्या नसे मिती,
चित्त रंगलें त्यामुळें अती
कोठुनि तुला ती असे स्मृती ! २

रम्य अंगणीं खेळ खेळलों
घोर काननीं दूर हिंडलों,
लंघिले जरी तुंग मी गिरी
भीति वाटली ती न अंतरीं. ३

खावया मिळे मीठ भाकरी
लागली परी ती सुधे परी,

वस्त्र नेसलों हीन मी जरी
खेद वाटला तो न अंतरीं. ४

आप्त बांधवां टाकुनी घरीं
ग्राम सोडुनी चाललों दुरी,
संकटें जरी घोर पातलीं
भीति मानसा या न वाटली. ५

संगती तुझी दिव्य कामदा
दे सुखा सदा नाशुनी गदा,
ज्यांस लाधली दिव्य देणगी
धन्य धन्य ते जन्मले जगीं ! ६

जाहलों परी दीन संप्रती
रोग कोपले फार गांजिती,
हाय ! मानसा क्लेश होतसे
त्रासलों अती शांतता नसे. ७

देशि औषधें इंग्रजी किती
घेतलीं परी मानलीं न तीं,
दान अर्पुनी तर्पिलें ग्रहां
फायदा परी नाल्पही अहा ! ८

अंग रोडलें, तोंड सूकलें
गाल बैसले, नेत्र खोंचले,
तेज अंगिचें सर्व लोपलें
क्षीणतेमुळें धैर्य सूटलें. ९

विश्व हें मला शून्य भासतें
प्राणवापिका शुष्क वाटते,
अन्न पाणिही ना रुचे मला
भारभूत हा देह जाहला. १०

काय मीं करूं, केंवि मी करूं,
दीन मी कुणा हाय हंबरूं,
कंठ दाटला, पूर लोटला
लोचनीं, अहा! ऊर फाटला. ११

शोक नावरे चित्त बावरे
ये, अनामया, वत्सला त्वरें,
मित्र हा तुझा दीन जाहला
वाटतो कसा त्याज्य तो तुला ! १२

रम्य आपुला कुंज सोडुनी
मारुतावरी येइं बैसुनी,

भेट दे मला, भेट दे मला
प्रार्थना असे एवढी तुला. १३

येउनी त्वरें नाशुनी गदा
वारि आपदा दे सुखा सदा,
हीच याचना येउं दे दया
बा अनामया ! नान्य कामया. १४

९ सप्टेंबर, १८९६.

---

## १६. पुढें पुढें !

( अंजनी गीत. )

एक दरीच्या तोंडापाशीं
बसलों होतों एके दिवशीं
गाळित दुःखें मी अश्रूंसी
टपां टपां ! १

रम्य चंद्रिका होती पडली
प्रसन्न नयनां सृष्टी दिसली
परि मच्चिंता वाढत गेली
क्षणोक्षणीं ! २

गत गोष्टींचें स्मरण करूनी
प्रीतिस्वप्नें आणुनि ध्यानीं
विफल जाहल्या आशा म्हणुनी
मनांतल्या, ३

होतचि होतें दुःख मनाला
दरीतुनी तों ध्वनी निघाला
' चलरे येथुनि ' तो मज वदला
पुढें ! पुढें ! ४

जो गेला तो दुःखी काल
परी सुखाचा असे पुढील
कळेल तुजला त्याचें मोल
पुढें ! पुढें ! ५

खरी प्रीति ज्या ठायीं वसते
जेथें आशा विफल न होते
असे सुखाचें जग बा परि तें
पुढें ! पुढें ! ६

तोड पाश रे येथिल सारे
तुला ओढिती जे माघारे

डोळे मिटुनी चल बावरे
पुढें ! पुढें ! ७

ध्वनि जें वदला तें समजोनी
हिंडत आहे डोळे मिटुनी
एकसारखा रानोरानीं
पुढें ! पुढें ! ८

परंतु जग तें लाधत नाहीं
हेतु मनींचा सफल न होई
किती करूं मी प्रवास पायीं
पुढें ! पुढें ! ९

अदृश्यरूपा भविष्यकाला !
मला येऊं दे तुझ्या स्थलाला
नको टाकुनी जाऊं मजला
पुढें ! पुढें ! १०

मुंबई, २१ नोव्हेंबर. १८९६

## १७. दुष्काळ.

[stamp]

स्वातंत्र्याचे दिवस अमुचे सर्व गेले लयाला
गेलीं सारीं अनुपम सुखें, वांकडा काळ आला;
आम्हां आतां सतत छळितीं संकटें घोर नाना
दुर्दैवानें हरहर ! पुरें खावयाही मिळेना. १

गेले सारे बहुत चढुनी शेतकी व्यर्थ गेली
त्यांतूनी तो अदय बनला ये न पर्जन्य वेळीं,
वृष्टी ! वृष्टी ! म्हणुनि रडुनी कोरडा कंठ केला,
आक्रोशाचा तिळभर परी लाभ नाहीं जहाला. २

गेलीं शेतें सुकुनि सगळीं जाहली ठार दैना !
नाहीं आतां खचित उरला खावया एक दाणा;
जो गेला तो दिवस बरवा केंवि येई पुढील
जाळी चिंता अकरुण अहा मानसा सर्व काळ. ३

आली पाळी निशिदिनिं कुणा राहण्याची उपाशी
कोणी कोणी उदर भरण्या चालले दूरदेशीं,
पत्नीलागीं पति नच पुसे माय सोडी मुलांतें,
जो तो आहे करित हृदयीं आपुल्या काळजीतें. ४

नाहीं चारा मिळत पुरता खावयातें गुरांतें
पाणी त्यांतें विपुल न मिळे स्वच्छसें प्यावयातें;

नाहीं कोणी फुकटहि तयां बाळगाया तयार
देती प्राणां फिरुनि फिरुनि हंबरूनी अखेर. ५

दुर्दैवानें नकळत कसा घातला थोर घाला
भक्षायातें अवचित जनां क्रूर दुष्काळ आला,
होई आतां कुठुनि सुटका मार्ग कांहीं सुचेना
कंठावे हे दिन तरि कसे जीविताचे कळेना. ६

ये ये देवा ! सदयहृदया ! नाश चिंता अनंता
नाथा आम्हीं तुज विनवितों तारि आतां अनाथा;
दुष्काळातें त्वरित शमवी काळजी सर्व वारी
देवा आम्हां तुजविण दुजा संकटीं कोण तारी ? ७

९ डिसेंबर, १८९६.

---

## १८. दगड फोडतांना.

दुष्काळसंबंधीं जीं खडी फोडण्याचीं कामें चाललीं होतीं त्या ठिकाणीं कवि असतां, खडी फोडणाऱ्या एका स्त्रीची स्थिति पाहून खालील पद्यें त्यानें लिहिलीं आहेत. या पद्यांत, खडी फोडतांना तिच्या मनांत चाललेले विचार लिहिले आहेत.

पट्कन् दगडा फुट् फुट् फूट
किती कुटूं मी तुज कुट् कूट् ॥ ध्रु० ॥

ही हातोडी हातीं धरुनी
माझे सांधे गेले गळुनी
एकसारखी घर्षण पडुनी
गेले तळवे हे सुजुनी. १

शक्ति न आतां अंगीं उरली
गात्रें सगळीं विकल जहालीं
तुज येऊं दे आतां करुणा
अन्नदायका जड पाषाणा ! २

खडिचीं अठरा जधीं घमेलीं
फोडिन तेव्हां मिळणें चवली
पोटापायीं दीन दशा ही
हाय ? कपाळीं आली पाही. ३

हा दुर्दैवा दगड फुटेना
फोडाया तो हात उठेना
हे अश्रूंनो वरती पडुनी
टाका दगडा या मृदु करुनी. ४

अश्रु तरी ते पडतिल कोठुनी !
गाळुनि गाळुनि गेले सरुनी !
हाय कपाळा काय करूं मी !
फोडूं कैसा दगड अहा मी ! ५

प्रिय हस्तांनो आतां अंतीं
करित्यें तुम्हां एक विनंति
स्वीकाराहो काठिण्याला
या दगडाशीं झुंजायाला ! ६

बेलापूर, १२ जानेवारी, १८९७.

---

## १९. जात्यावर बसून.

दुष्काळ कामावर, एक स्त्री एके दिवशीं दळावयास जात्याजवळ गेली; परंतु पहाते तों जवळ धान्य नाहीं. त्यासमयीं तिनें खालील उद्गार काढिले आहेत.

अभंग.

दळूं बाई दळूं काय जात्यावरी
नाहीं धान्य घरीं मूठभरी. १

कशाची मी घालूं तयांत वैरण
आळवूं गाऊन गाणें कैचें. २

वेंचूनियां आणूं काय सूक्ष्म रेती
रस्त्यांतील माती आणूं काय ! ३

जरी रेती माती होती धान्यासम
पर्जन्याचें काम काय होतें ! ४

निर्मीयेली जेव्हां परेशानें सृष्टी
केली एक मोठी चूक त्यानें ५

मृत्तिकावाळूंत पोषणाची शक्ति
ठेविली असती तरी मग— ६

सारी दूर होती जीवांची विपत्ति
क्रूर चिंता चित्तीं नको होती. ७

तरंग हे सारे कल्पनेचे परी
वस्तुस्थिति खरी वेगळीच. ८

नाहीं दळायातें धान्य मूठभरी
बसूं जात्यावरी कशासाठीं ? ९

ठेविलें मी तुला जात्यारे नेऊन
भिंतीशीं टेकून लाडक्यारे. १०

जेव्हां कांहीं काळें धान्य येई घरीं
तुज कडेवरी आणीन मी. ११

पवित्र गोमयें भूमी सारवून
तेथें मी स्थापीन तुजलागीं. १२

आणूनियां पुष्पें वनींचीं सुंदर
कणसें घोसदार जोंधळ्याचीं. १३

खोंवीन तुझ्या मी माथ्यावर तूरा
करीन साजरा समारंभ. १४

नवीन गव्हांचा नैवेद्य करून
तुज मी अर्पीन मनोभावें. १५

मंजूळशा मग गाण्यातें गाऊन
तूज आळवीन लाडक्यारे. १६

स्वस्थपणें रहा भिंतीशीं संप्रति
मानूं नको खंती विनाविल्यें. १७

पोटाची भराया खांच कोठें तरी
जात्यें आतां दूरी येथून मी. १८

बेलापूर, १५ जानेवारी, १८९७.

---

## २० मुलांचा कोंडवाडा.

दुष्काळ कामावर काम न करणारीं मुलें कोंडून ठेविलीं असतात; भोंवतालीं कांटेरी कुंपण, वर आकाश आच्छादन आणि खालीं दगडाळ जमीन आसन, अशा ठिकाणीं तीं तळमळत असतात. त्यांची दशा पाहून कोणाचें हृदय द्रवणार नाहीं !

दीन दशा बालांची । बघवेना
मज या साची धृ०

निज मातेच्या अंकावरुनी
क्रूरपणानें दूर करूनी
ठेवियलीं हीं येथें
नच कवणा करुणा यांची. १

माळजमीनीवर हीं सारीं
तळमळतातीं ऐन दुपारीं
छत्र नसे वर कांहीं
वाराया किरणें रविचीं. २

घालुनिया कुंपण कांटेरी
कोंडिलिं सारीं या आवारीं
करितातीं आक्रोशा
राहति जननीविण कैंचीं. ३

वत्स न राहे धेनूवांचुनि
नदी न वाहे उगमा टाकुनि
प्रीति कधीं नच सोडी
संगति निज विषयांची. ४

अधिकाऱ्यांनो, सूज्ञ तुम्हीना !
ये न कशी मग तुम्हां करुणा !
तारा हो या दीनां
इतुके हा कवि याची. ५

**नोंदवणी, २४ जानेवारी, १८९७.**

## २१. जाईचीं फुलें.

कवि आपल्या मित्राच्या भेटीस गेला असतां त्यानें त्याचा जाईच्या फुलांनीं सत्कार केला त्या प्रसंगास उद्देशून.

स्वागत केलें माझें, सन्मित्रा, त्वां फुलांस देऊन
झाला मोद मनाला प्रेमें त्यांचा सुगंध सेवून. १

जीं ' दारचीं ' फुलें त्वां अपुल्या मज आणुनी दिलीं सुमनें
होता पुंज गुणांचा नव्हतीं तीं सत्य जाइचीं सुमनें. २

कारण त्या पुष्पांनीं कथिलें भाषा स्वकीय बोलून
" वरिवरि हुंगुनि आम्हां वेड्या देऊं नकोस फेंकून. ३

जे गुण असती साधे हितकर अंगांत आमुच्या चार
घे शिकुनी त्यां योगें स्वर्गाचेंही खुलें तुला द्वार. ४

जैसा परिमल अमुचा टाकी सज्जन मनास मोहून
तव कीर्तीचा परिमल जग मोहूं दशदिशीं दणाणून. ५

आहे जगांत अमुचें निर्मल अतिशुभ्र सर्वदा रूप
तैसें तुझें असावें वर्तन त्या नच शिवो कधीं पाप. ६

आम्ही कोमल तैसें हृदय असावें तुझें सदा साच
कोमेजावें त्यानें दीनांचा पाहुनी जगीं जाच. ७

रूप मनोहर अमुचें दिसतें परि तें नसे रहायाचें
जग हें असार सारें जें दिसतें तें अखेर जायाचें. ” ८

इतुकें बोलुनि थकलीं, सुकलीं, मुकलीं स्वकीय तेजातें
जाईचीं दिव्य फुलें असलीं फेंकलि कोण हो हातें ! ९

तीं धन्य रम्य कुसुमें, मित्रा, तूं धन्य सत्य त्यांहून
मी धन्य धन्य कां कीं माझ्या तीं पावलीं करीं निधन. १०

नगर, २४ जानेवारी, १८९७.

---

## २२. गाय विकत देतांना.

एका शेतकऱ्यानें काढलेले उद्गार.

( चाल—अजि अक्रुर हा० )

मी अधम तुला विकतों, कपिले गाई
येथुनि तूं आतां जांई ध्रु०

जोंवरि मज होतें दैव गडे अनुकूल
केला मी त्वत्प्रतिपाल;
मानुनि तुजलागीं जननीसम मी केली
तव सेवा वेळोवेळीं ॥ चाल ॥

चारिलें तुला मीं रानीं
पाजिलें झऱ्याचें पाणी

तुज रंजविलें मंजुळशा गानांहीं
क्षणही तुज त्यजिलें नाहीं. १

तव मजवरही झाले बहु उपकार
किती बोलूं नाहीं पार
जरि मजकडुनी केव्हां चुकली सेवा
त्वां नच गे धरिला दावा ॥ चाल ॥
सोडुनी दुधाच्या धारा
पोशिलें अनाथा पोरां
त्वां पडुं न दिली दुग्धाची कमताई
होउं कसा तव उतराई ? २

आतां काळ परी हर हर आला खोटा
तृण धान्या पडला तोटा;
तुज पोशियलें आजवरी प्रेमानें
संग्रहिचीं विकुनी धान्यें ॥ चाल ॥
आणिलें गवत तुझ्यासाठीं
नच झालों केव्हां कष्टी
आतां नाहीं गे मजजवळी दमडीही
तृण कोठुनि आणूं बाई ? ३

पोटासाठीं मी टाकितसे तुज विकुनी
मन कष्टें निष्ठुर करुनी;

तूं झालिसगे आतां परकीयांची
मत्संगति तुटली साची ॥ चाल ॥
येथुनी त्वरें तूं जा गे
पाहसी वळुनि कां मागें
जा लौकरी जा क्षणही येथ न राहीं
धनि तुजला ओढुनि नेई ! ४

सोंदवणी, २८ जानेवारी, १८९७.

---

## २३. धुकें.

सकाळीं टेंकडीवर उभें असतां पूर्वेकडे दाट धुकें पडलें होतें व कांहीं-
एक दिसत नव्हतें, त्यावेळेस कवि आपल्या मित्रास म्हणतो.

धुकें आहे, मित्रा, बघ कितितरी दाट पडलें !
दिसेना पूर्वेला रुचिर रविचें बिंब दडलें;
हिमाचीं हीं खंडें बघुनि इतुकीं एक बनलीं
गमे कीं संतांचीं सुविमल यशें एकवटलीं. १

धुक्यामाजी आजी शिखर गिरिचें पूर्ण लपलें
तळींचें तें खेडें अवचितचि कोठें हरपलें;
दिसेना कोठें ती विमल सरिता वाहत असे
असोनी नाहींशी क्षण मजसि दृष्टी गमतसे. २

पुढें नाहीं कांहीं दिसत नयनांतें अपुलिया
मनांच्या चक्षूंतें परि सकल तें दृश्य, सखया;
करांनीं झांकोनी नयन अपुले घे क्षणभरी
मनश्चक्षूनीं तूं निरखिशिल सारे झडकरी. ३

निघे आनंदाची सुविमल नदी दिव्य जिथुनी
जया लागीं साधू सतत म्हणती स्वर्ग म्हणुनी;
वसे तो आकाशीं वचन गमतें सत्य न मला
मला वाटे कीं या सकल जगतीं स्वर्ग भरला. ४

दिसे जी जी वस्तू मनुजनयना स्पष्ट जगतीं
असे ती दिव्यत्वें सतत भरली सत्य पुरती;
परी तें दिव्यत्व प्रकट न कधीं चर्मनयना
म्हणूनी वाटे कीं जवळि नच तो स्वर्ग अपुणां. ५

धुकें मायारूपी सकल जगतीं या पसरलें
म्हणूनी स्वर्गातें खचित जग सारें विसरलें;
विवेकें मायेचें पटल अवघें सारुनि जरी
बघे अंतर्दृष्टी जन खचित त्या स्वर्ग न दुरी. ६

जणूं सन्मातेच्या उदरिं लपुनी पुत्र बसला
महीगर्भीं आहे दडुनि बसला स्वर्गचि भला;
पहा, मित्रा, त्यातें त्वरित अपुल्या दिव्य नयनीं
नसे स्वर्ग व्योमीं परि वसतसे याच भुवनीं. ७

षडघवली.

## २४. कावळ्यास उद्देशून.

हीं पांच पद्यें ज्या दिवशीं लिहिलीं त्याच दिवशीं संध्याकाळीं
कवीला पत्ररूपानें आपला प्रियकर मित्र भेटला !

‘ काव काव ’ शब्द असा करिसी कासया
काय गूढ हेतु तरी बा रवांत या ?
सुप्रभात जों न अजुनि जाहली पुरी
सोडुनि निज नीड पातलासि कां दुरी ? १

“ कोणि तरी येत असे पाहुणा घरीं ”
जन म्हणती सुचवि भाव काकवैखरी;
हाच जरी त्वदिय रवीं हेतु वायसा
शब्द करित बैस सुखें बा सख्या असा. २

‘ मित्र भेट होय कधीं सौख्यवर्धिनी ’
चिंताकुल म्हणुनि असें जाहलों मनीं,
सोडुनियां मित्रवरा पुण्यपत्तनीं
स्वामिदास्य करित फिरें दूर निर्जनीं. ३

प्रेमहृदय जवळि नसे कोणि संप्रती
एकाकी दीन असा जाहलों अती;
तुजसि तरी काकवरा येउं दे दया
बोलावुनि आण सख्या त्वरित माझिया. ४

सफल करीं मदिय बसे हेतु जो मनीं
तृप्त करिन खचित तुला गोड भोजनीं;
विश्वसुनी मदिय वचन सुभग वायसा
' काव काव ' तूं खुशाल बोलरे असा ! ६

गोंदवणी, २ फेब्रुवारी, १८९७.

---

## २५ काय कमी कविला !

पद.

( चाल—जाऊं कामाला० )

काय कमी कविला, जगीं या काय कमी कविला ध्रु०
त्रिभुवन मंदिर मिळतें सुंदर सतत रहायाला १
रविशशि तारे तत्पर सारे प्रकाश द्यायाला २
हिमनग देई उज्वल रत्नें मेरु सुवर्णाला ३
सुरसरिता दे मधुर सुधेचा प्याला प्यायाला ४
नंदनवनिच्या कुसुमित वल्ली देती सुमनांला ५
स्वर्गसमीरण देवदूतही गाती गीतांला ६
परी कल्पनाधीन सुखें हीं सकल, गमे मजला ७
धन्य कवी तो धन्य कल्पनासंग जया झाला. ८

नगर, २० फेब्रुआरी, १८९७.

## २६. थंडी.

दुष्काळ कामावरील एक मनुष्य रात्रीं थंडींत कुडकुडत असतां म्हणतो.

करूं कसें ध्रु०

हा फार झोंबतो गार शरीरा वारा
मज नसे उबारा, कोठें घ्यावा थारा
करूं कसें हो करूं कसें ! १

ही कडक अतीशय लागे अंगा थंडी
ही पार फाटुनी गेली पातळ माझी बंडी
करूं कसें हो करूं कसें ! २

मज गमे करावी शेकोटी शेकाया
परि नसे मुळींही सर्पण तें जाळाया
करूं कसें हो करूं कसें ! ३

जर जाउन आणूं रानीं वनींचीं फाटीं
यमदूत शिपाई करिती मजलागीं अडकाठी
करूं कसें हो करूं कसें ! ४

हा ! हाय ! हुडहुडी फार हिंवाची भरली
हीं अशक्त गात्रें सगळीं गारठुनीया गेलीं
करूं कसें हो करूं कसें ! ५

नच सुचे सुखाचा उपाय दुसरा आतां
करुं कसें मनाला जाळी संतत चिंता.
करूं कसें हो करूं कसें ! ६

तूं तरी सत्वरी जाळ मला गे चिंते !
मग फिरून न कधीं थंडी लागे या अंगातें
करूं कसें हो करूं कसें ! ७

२१ फेब्रुआरी, १८९७.

---

## ३७. पोवाडे

—:*:—

इतिहासप्रसिद्ध स्त्रीपुरुषांचे पोवाडे वाचून सुचलेले विचार.

स्वामिकार्यार्थ जे झुंजले संगरीं
वीरचूडामणी नष्ट झाले तरी
काय केल्या तयां विक्रमाच्या कृति
राष्ट्रगीतें अम्हां आज हीं सांगति. १

स्वामिनिष्ठा तशी देशभक्ती गुरू
ठार मारूं रणीं शत्रुला वा मरूं—
शौर्य ऐसें दिसे स्पष्ट गीतांत या
वीर्य अंगीं चढे यांस वाचूनिया. २

आज सत्ता लया पूर्ण गेली जरी
काळ कंठी प्रजा बंदिवानापरी;
पूर्वकालाचिया पाहतां योग्यते
क्षुब्ध होऊनि हें चित्त भांबावतें. ३

अंश तेजोनिधी पूर्वजांचे अम्ही
दास्यपंकीं बसूं काय कीं नेहमीं ?
सत्य केव्हां तरी पारतंत्र्यांतुनी
मुक्त होऊं अशी येत आशा मनीं. ४

जन्म ज्यांचे असे आर्यभूमीमधीं
धन्य शाहीर ते धन्य वाटे सुधी !
निर्मुनीया तयीं वीरकाव्यप्रति
ज्ञात केल्या जनां पूर्वजांच्या कृति. ५

मग्न होते अहा गाढ ऐशा तमीं
हे पवाडे, जशी मौक्तिकें कर्दमीं;
मोल त्यांचें जधीं जाणियेलें खरें
उद्धरीलें तयां गौरकायें नरें. ६

बालकांनो तुम्ही हें पवाडे करा
पाठ, यांतें स्मरा गात यांतें फिरा;
देशसद्मा तुम्ही स्तंभ मोठे मनीं
आणुनी हें झटा फार रात्रंदिनीं. ७

वीर काव्यें अशीं सर्वदा वाचुनी
कां न बाणे खरी देशभक्ती मनीं !
शौर्य अंगीं रुजे देशभक्तीमुळें
दैन्य ज्याच्या भये दूरि दूरी पळे. ८

खंडाळा, १५ मार्च, १८९७.

---

## २८. लाजरी.

उद्यानीं फिरतां सुरेख दिसली कुंडीमधें लाजरी
होते शोभत तीवरी किति तरी ताजे हिमाचे कण,
गेलें बाष्प जळें भरुनि गमलें मातें तिचे लोचन !
प्रातःकाळ उजाडला म्हणुनि ती आनंद वृत्ती वरी. १

गेलों मी जवळीं तिच्या झरझरां तों ती मनीं लाजली
भीतीनें बहु कांपली जणुं सती पापी नराच्या छलें,
हस्तानें इतुक्यांत मी निज तिचें वेगें वपु स्पर्शिलें
झाली तत्तनु कोमला पुलकिता दृष्टी झणी झांकली. २

भारी वाइट वाटलें मज तिची पाहून ऐशी स्थिती
झालें काय तरी कळे नच उभा मी ठाकलों विस्मयें,
तों झाला मजला मुळीं न कळतां कानांत माझ्या ध्वनि
'दुष्टा ! पापमयी तुझी निशिदिनीं आहे जगीं या कृति. ३

वागावें जगती कसें तुज, दिसे, माहीत नाही नयें
नाहीं योग्य तुला सतीस छळणें जी शुद्ध वागे जनीं !' ४

ता. २२ एप्रिल, १८९७.

---

## २९. गुडीपाडवा.

उभारा ! गड्यांनो गुड्यांतें उभारा !
मनींच्या झणी दूर चिंता झुगारा,
नवें वर्ष आलें नवा रोज आज
नसे राहिलें अल्प दुःखास काज. १

अहा प्रेम, आनंद, उद्योग आशा
अशांनीं किती शोभती सर्व आशा;
दिसे वस्तुमात्रांत आनंद साचा
कसा योग आला घडूनी सुखाचा. २

मनीं मानुनी चांगला आज वार
करावयास व्हा देश सेवा तयार;
बरा उद्यमा द्या रजा आळसातें
बरा मार्ग हा सांगतों मी तुह्मांतें. ३

जयांपासुनी लाभ नाहीं रतीचा
कसा वीट तुह्मां न ये त्या कृतींचा ?

असे काय त्या शुष्कक्रूप्णांत सार
जळेना नको तो तयाचा विचार. ४

असे आपुला देश दुःखीं बुडाला
कळेना कुठें सौख्यभानू दडाला;
उठा हो उठा सत्वरी धांव ठोका
विषद्वैरि गांठूनिया त्यास ठोका. ५

घुसा पार्लमेंटांत जा हक्क मागा
खरी आपुली जी स्थिती तेथ सांगा;
दयाशील ती माउली थोर राणी
न ऐकेल कां आपुली ती कहाणी ! ६

गड्यांनो नका घालवूं या घडीतें
त्वरें सज्ज व्हा कार्य न्याया तडीतें;
नका हो बसूं व्यर्थ मारीत माशा
नका दाखवूं अन्य लोकां तमाशा. ७

उभारा ! गड्यांनो गुड्यांतें उभारा
मनींच्या झणी दूर चिंता झुगारा;
करा देशसेवेस आरंभ आज
उदासीनतेला नको आज काज. ८

---

## ३०. कागदी पतंग.

उडे मजेनें गगनीं पतंग
तया बघूनी मन होय दंग;
खुले किती रंग तरी तयाचा
भुले न त्या पाहुनि कोण साचा ! १

क्षणांत येई पृथिवीतलाला
क्षणांत जाई उडुनी नभाला;
क्षणैक वृक्षावरती बसूनी
डुले मनीं मानुनि हर्ष मानी. २

करून आंदोलक मारुतातें
घे झेलकावे अपुल्या तनूतें;
असून तो केवळ कागदाचा
सुखी किती देह तरी तयाचा. ३

पतंग मारी गगनीं भरारी
धरूनियां आश्रयभूत दोरी;
मला स्थिती ती जरि लब्ध होती
सुखास सीमा कुठुनी रहाती ! ४

हे स्फूर्ति देवी ! कविराजमाते !
हे दिव्य शक्ते ! करिंगे कृपेतें;

त्वद्दिव्य तेजांतुनि अंश मातें
दे थोडका सत्वर किंकरातें. ५

तेजांश तो मानुनि दिव्य दोरा
चढेन त्याच्यावर मी भरारा;
विचारवायूवरतीं बसूनी
पाहीन सृष्टी मग मी तिथूनी. ६

फोडूनियां द्वार क्षणीं नभाचें
शिरेन त्या रम्य पुरीं सुरांचे,
क्षणैक सौंदर्य बघून त्याचें
जाईन देवालयिं कल्पनेचे. ७

लुटून भांडार तिचें प्रयत्नें
आणीन सारीं जमवून रत्नें;
सुवर्ण रज्जूंत तयां गुफून
सुपद्यमाला स्वकरीं करीन. ८

हे स्फूर्तिदेवी ! मग त्वत्पदांला
वाहून ती सुंदर पद्यमाला;
वर्णीन मी किंकर तत्प्रभाव
नवीन काव्यें रचुनी सदैव. ९

## ३१. किती पर्वती दूर राहिली.

एके दिवशीं कवि आपल्या नवीन मित्रासह पर्वतीवर जात असतां कांहीं पायऱ्या चढून गेल्यावर त्याचा मित्र थकला व ' पर्वती किती दूर राहिली अजून ? ' म्हणून त्यानें कवीस विचारिलें त्यावेळीं कवीनें जें उत्तर दिलें तें खालीं दिलें आहे.

" किती पर्वती दूर राहिली
मित्रा वद अजुनी,
उमेद गेली सारी पहिली
गेले पद दमुनी. " १

" चढुनि पायऱ्या आहे जाणें
शंभर बा अजुनी,
असे पर्वती जरी पहाणें
क्लेश तरी न गणी. २

" दुःखापासुनि असे सुखाचा
उगम मनीं हें जाण,
लाभ व्हावया सौख्य धनाचा
असुखाची खणखाण. ३

" जरी मधाची तुला माधुरी
चाखायाची आस;

मधमाशीचा दंश विषारी
लागे सहणें खास. ४

" जगिक सुखाचा आहे पाया
दुःखावर त्या साच,
दुःख जगींचें जातां विलया
नष्टचि सुख तेव्हांच ! ५

" या संसारीं जो दुखांना
सोशिल आधीं फार,
सुखें तयाला पुढती नाना
निश्चय कीं मिळणार. ६

" अनंत दुःखें सोसुन गेले
जे जे पूर्वी शूर,
पहा पहा ते स्वर्गीं झाले
देव किती तरि थोर ! ७

" स्वर्ग पाहिजे जरी मिळाया
खटपट कर मोठी,
उद्योगाविण सारें वाया
गोष्ट न हे खोटी. ८

" जरी पर्वती पहावयातें
उत्सुक असती फार,

तरी आपुल्या उच्चल पदांतें
मित्रा वारंवार !" ९

## ३२ चितूर.

—:*:—

हें कोंकणांत एक प्रकारचें फुलपांखरूं आहे; कवि त्यास धरण्याचा प्रयत्न करीत असतां तें हातीं न लागतां दूर उडालें, तेव्हां निराश होऊन तो म्हणतो:—

थांब चितूरा । कां उडसी दूर भरारा ॥ ध्रु० ॥

ओळख अपुली बाळपणींची
विस्मृति पडली तुजला कैंची
खेळगडी हा इतुकें याची
दे या थारा. १

दाखिव मजला पंख तुझे ते
वर्णभिन्नता ज्यांवर खुलते
सुरधनु सोडी बघतां त्यातें
गर्वहि सारा. २

प्रेमें चुंबित कोमल सुमनें
गा तूं गाणें गूढ रवानें
मला श्रवूं दे तया मजेनें
मन्मन चोरा. ३

बनलों पापी मी जगतीं या
दूषित झाली माझी काया
सोडूं नको तूं म्हणुनि गड्या या
करि उद्धारा. ४

रम्य पांखरा माझ्या सखया
स्पर्श घडूं दे तुझा करा या
थांब जरा कां पळसी वायां
सैरावैरा ! ५

पडघवली.

---

## ३३. निधनगीत.

कवीच्या एका मित्राची कन्या वारली त्या प्रसंगीं कवीनें हें आपल्या मित्रास पाठविलें आहे.

( चाल:—अजि अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला )

कन्यानिधनाची ऐकुनि वार्ता कानीं
ये पूर जलाचा नयनीं ॥ ध्रु० ॥
सत्प्रीतिलता सुंदर कलिका फुलली
यद्रूपा दृष्टी भुलली;
जों वास तिचा मधुर न पुरता आला
यमकर तों घाली घाला. ॥ चाल ॥

पारणें न फिटलें नयनांचें
सन्मित्रा तुझिया साचें,
तो हा ! हा ! ती गेली गेली गळुनी
प्रीतिलता माता त्यजुनी. १

ये चंद्राची कोर जणूं उदयाला
गृहगगना उजळायाला
क्षणभर चमकूनी अस्तंगत ती झाली
सर्वांतें फसवुनि गेली ॥ चाल ॥
होतसे शोक अनिवार
दुःखानें दाटे ऊर
परि लाभ नसे सखया शोक करूनी
जग भंगुर ठेवी ध्यानीं. २

अहमदनगर, १७ मे, १८९७.

---

## ३४. प्रेम.

—:*:—

( चाल:—अर्धतनू वारुळीं बुडाली० )

अखिल विश्व हें कां न दिसे मग शून्य वनाच्या परी
गेलें प्रेम लयाला जरी ॥ ध्रु० ॥

या विश्वाचें जीवित केवळ चाले प्रेमावरी
संसृति प्रेमसुखाची करी

स्वरूप त्याचें वर्णायातें शक्त नसे वैखरी
तयाची मूर्ति न दृग्गोचरी ॥ चाल ॥
त्याचा संभव कोठें असे
स्थानीं कुठल्या केव्हां बसे—
अतर्क्य सकलां असुनी ज्याची खूण पटे अंतरीं. १

तेजोराशी दिनमणि उगवे गगनीं प्रेमामुळें
तडागीं सारस तैसें फुले
चंद्र पाहुनी पयोनिधीला भरतें कीं येतसे
कांतमणी द्रवतसे ॥ चाल ॥
याचें कारण नाहीं दुजें
एका प्रेमाविण, गूढ जें
परंतु ज्यानें मोहित केली सारी दुनया खरी. २

स्फूर्ति तरंगी चित्त कवीचें उंच खळाळे किती !
कल्पना दिव्य अती नाचती
वृत्ति तयाच्या प्रसन्न होतां पद्यें वदनांतुनी
भराभर बाहिर येती जनीं ॥ चाल ॥
मंजुल मुरलीचा तो ध्वनि
सुंदर चित्रांची रेखणी
कवि होतसे आश्रय नसतां प्रेमाचा पळभरी. ३

दिव्य प्रेमा ! शुद्ध प्रेमा ! सकल सुखाच्या घरा
मातें केवळ तूं आसरा

काळ कंठितों कृपेमुळें तव एकाकी काननीं
दूर मी बंधु मित्र सोडुनी ॥ चाल ॥
तूं कंटक शय्येवरी
पसरुनी मखमालचि साजिरी
विषम विषासम भवास देसी अमृताची माधुरी. ४

दुष्काळ कँप, खंडाळा, जानुवारी, १८९७.

---

## ३७. सरस्वतीची प्रार्थना.

( चाल—अर्धतनू वारुळीं बुडाली० )

सरस्वती गे करितों तुझिया चरणांशीं याचना
पुरवि तूं एक मनःकामना ॥ ध्रु० ॥
सुंदर मंदिर नलगे मजला वास कराया जरा
नको ती चारु जरी इंदिरा
मृदुल फुलांची सुखकर शय्या नलगे सेवावया
नको ते मिष्टान्नहि खावया ॥ चाल ॥
लागे गोड शिळी भाकरी
शय्या कंटकयुक्ता बरी
हीन वसनही जरि नेसाया दुःख न त्याचें मना १

कवितेवांचुनि अन्य न वाटे विषय जगीं या बरा
माउली तुझिया या किंकरा

गोदावरिच्या रम्य तटाकीं राहुन रात्रंदिनीं
रमावें कवितेतें घेउनी ॥ चाल ॥
बैसे भृंग सरोजावरी
सेवित मकरंदाची झरी
तसें करावें संतत वाटे काव्यरसस्वादना २

संग कराया त्या कवितेशीं धडपडतों मी जरी
मला ती लोटुनि देई दुरी
अरसिक म्हणुनी दुर्वचनांहीं मजलागीं ताडिते
वदू मी जातां धिक्कारिते ॥ चाल ॥
झालों खिन्न मनीं मी अती
गाळितों अश्रुजलातें किती
धिङ् मम जीवित, होती नाना चित्तातें वेदना ३

स्फूर्ति सखी तव आहे चतुरा प्रेष तिला तूं त्वरें
करिल ती जननी ! माझे बरें
त्या कवितेचा गर्व हरूनी करण्या तिज किंकरी
स्फूर्ती शिकविल जादू खरी
मग जादूचें सहाय्य मिळतां कवितेला भारुनी
करिन मी माझी अनुगामिनी ॥ चाल ॥
होतां कविता दासी, मन
जाइल रंगीं हें दंगुन
मनोज्ञकाव्यें रचुनी मग मी करिन तुझ्या पूजना ४

नाशिक, २४ मे, १८९७.

## ३६. रूढीचा प्रभाव.

हे रूढि गे, तव पराक्रम थोर बाई
वर्णू तयास न शके मम कल्पनाही;
स्त्रीजाति तूं असुनि, दास तुवां स्वकीय
केले किती नर सुबुद्ध जगांत हाय ! १

वाटे सदोदित तुझा सकलां दरारा
कांपे तनू बघुनियां तुजला थरारा;
आज्ञा कधीं नरवरां तव मोडवेना
शब्दांसही क्षणभरी तव तोडवेना. २

मी मी असें सतत जे वदले मुखानें
ते हाय ! गाय बनले तव दर्शनानें
सत्कल्पना किति तरी हृदयांत आल्या
त्यांच्या, परी अहह त्या सगळ्या निमाल्या. ३

कोणी जरी धरुनि धीर तुझ्या विरुद्ध
वागे, तया त्वरित तूं करिसी निबद्ध;
छी थू करून करिसी पुरती फजीति
ऐशी विलक्षण तुझी जगतांत रीति ४

जे जे प्रशस्त गमते तुजला, तयाची
लोकीं घडो अनुकृति तव आस साची

देई न वा अनुकृती सुख मानवास
क्रूरे ! विचार तव हा न शिवे मनास ५

जो तूं अम्हां शिकविसी क्रम वर्तनाचा
त्यांतील दोषगण ये नजरेस साचा
ऐसें असून, नच धैर्य पुरें अम्हांतें !
‘ हा दोष ’ गे म्हणुनियां कथण्यास तूं तें ६

जादू तुझ्या अजब गे भरली शरीरीं
वाणीमधीं विलसतें तव तेज भारी
प्रज्ञा असून सगळे जन बुद्धिहीन
झाले, अहा ! तुजपुढें बनले सुदीन ! ७

तूं क्रूर मूर्त विवशी गमसी मला गे
चित्तीं तुझ्या लवभरी करुणा न वागे
बोलून गोड परि दावुनि शुद्ध हेतु
नेसी हरून अमुचीं सगळीं सुखें तूं ८

दुःखें समाज बहु भोगितसे सदैव
आहे तुझा सकल तो कुटिले प्रभाव
तूं घालिसि गरल सौख्य सुधारसांत
तूं कंटकां पसरिसी अमुच्या पथांत ९

हे रूढिराक्षसि ! तुला करितों विनंति
अंतीं, त्यजून हृदयांतील सर्व भीति

चांडाळिणी झडकरी करि तोंड काळें !
आतां पुरे छळ, तुझे रुचती न चाळे ! १०

वडाळा, १२ जून, १८९७.

---

## ३७. कवि आणि कल्पना.

येई एकदिनीं कवि स्वसदनीं हिंडून रानांतुनी
तों पाहे नयनीं सुखिन्नवदनीं दुःखें रडे कामिनी;
गेला घाबरुनी पुसे विनवुनी तीतें करां जोडुनी
कांगे दुःख मनीं मला वद झणी कां अश्रु हे लोचनीं. १

‘ नाथा काय विचारतां मज वृथा मी दुर्भगा तत्वतां
खायातें पुरता न घांस मिळतां वस्त्रीं सदा हीनता;
हाकोनी वनिता करीत कविता रानीं तुम्हीं हिंडतां
आतां कष्टदशा अशी मज पुरे कंटाळलें जीविता.’ २

‘ काया कष्टविसी कशास करुनी गे कल्पने काळजी
कांतेला कविच्या कुठून करणें लागे फुका काळजी
तूझी प्रीति खरी सदा मजवरी राहील कांते जरी
इच्छा मी पुरवीन सर्व तव गे एका क्षणाभीतरीं’ ३

“ पूर्वीं सेवियला असेल न असा सीतासतीनें पति
सावित्री भजली नसेल अपुल्या त्या सत्यवानाप्रति;

नाथा भीति मदीय त्यांहुन अती नाहीं तियेला मिती
जी आज्ञा मजला कराल करण्या तीतें असे संमति." ४

'ये गे तूं इकडे तरी झडकरी खेळूं जरा फूगडी
हस्तीं हस्त धरून घट्ट बसवूं स्वप्रीतिची गे घडी'
ऐसें बोलुनि कल्पनाकर कवी हस्तामधीं घालित
जादूमंत्र म्हणीं मुखीं पुटपुटे तो वर्तलें अद्भुत ! ५

काड्यांची मग झोपडी कडकडां खालीं पडे मोडुनी
येई सुंदर भव्य मंदिर तदा बाहेर भूमींतुनी;
पार्श्वीं निर्झर वारिनें भरुनियां वाहूं त्वरें लागला
रम्य प्रांगणदेश पादपलतापुष्पीं दिसे शोभला. ६

वृक्षीं बैसुनि पक्षि मंजुल रवें गायाप्रती लागले
क्रीडा हंस मयूर काक बकही चित्तांत आनंदले;
गेली दीन दशा कुबेरनगरी तेथें बने सत्वर
गर्वा सोडुनि सर्व लीन बनुनि ये स्वर्ग पृथ्वीवर. ७

जेव्हां जेव्हां गरज पडली वस्तुची कल्पनेला
तेव्हां तेव्हां मग धरुनियां सत्वरी तत्कराला
जादूमंत्रा कवि पुटपुटे वस्तु तों प्राप्त होई !
या रीतीनें पुरवि कवि तो कल्पनाकामनाही. ८

१७ जून, १८९७.

# ३८. महाराष्ट्र भाषेचा विलाप.

कै. वामन दाजी ओक यांच्या मृत्यूवर कविता.

त्यजुनि सहसा मातें जासी कसा वद वामना !
उचित करणें ऐसें कैसें दिसे तुझिया मना
तुजविण दिसे पुत्राशून्या मला निखिला धरा
फिरुनि कुठुनि त्वन्मूर्ती ती दिसेल मनोहरा ! १

सहन करुनी दुःखें नाना मला जननीसम
समजुनि मनीं सेवा केली तुवां तनया मम;
पुरवुनि अहा आनंदानें मनांतील कामना
सतत दिधले सौख्यालागीं तुवां मज वामना. २

तुझ्याविण कसें करूं अहह ! मी कुमारा तरी
बघून कवणाकडे सुख वरूं मदीयांतरीं ?
स्मरून कृतितें तुझ्या भडभडून येतें उरीं
नको स्मरण तें नको दुखवितें शरांच्या परी. ३

सुदीन कविता रडे पिटुनि घे स्ववक्षस्थला
रडे धरणि तोडिते अपुलिया करें कुंतला;
तनूवरिल फेकिते रुचिर भूषणें कोमला
तुला स्मरुनि ती मुला अहह होय शोकाकुला. ४

तो काव्यसंग्रह तुझा मधु बाल दीन
झाला, तुला निशिदिनीं रडतो स्मरून;
आतां तया उचलुनी अपुल्या करांहीं
प्रेमें कडेवर दुजा वद कोण घेई ? ५

झाले न अब्द पुरते अजुनी तयाला
जन्मून सात इतुक्यांतचि घोर घाला
आला तयावर, असे करपून गेला
शोकानलीं प्रखर विव्हल बाल झाला. ६

वार्ता ऐकुनि वामना तव रडे स्वर्गीं कवी वामन
टाहो फोडितसे मयूर कवि तो दुःखें तुला बाहुन;
गाळी अश्रुजला स्मरून तुजला तो मुक्त मुक्तेश्वर
शोकें विव्हळ जाहली स्वहृदयीं ती शारदा सुंदर. ७

गेला हा ! हा ! काव्यरसाचा प्रेमळ भोक्ता गेला !
सर्व रसिकता घेउन संगें भेटाया अमरांला. ८

भरे हृदयिं माझिया अहह दारुणा शून्यता !
सुदीन कविता वरी तुजविणें सुता शून्यता !
तुझें निधन आणि तें रुचिर संग्रहा शून्यता !
जगीं तुजविणें दिसे सकल, शून्यता ! शून्यता ! ९

नगर, २० जून, १८९७.

# ३९. दुष्काळग्रस्ताचे सुस्कारे !

हल्लीं कवि ज्या ठिकाणीं आहे त्या ठिकाणाच्या आसपासच्या खेड्यांत दुष्काळाचें स्वरूप फारच भयंकर झालें आहे; व प्रत्येकजण आपल्या जिवास कंटाळला आहे; अशा कंटाळलेल्या मनुष्यांपैकींच एकाचे खालील उद्गार आहेत.

सोडुनि सोडुनि शिणलों बायां दुःखाचे मी सुस्कारे
हृदय करपलें तेज हरपलें नसे सुखाचें मज वारें;
तुझें जीविता प्रचंड ओझें पळभर आतां सहवेना
प्रवास कष्टद कंटकमय या शून्य जगांतुन करवेना.

माझी चिंता जळेल का ?
दुःख मनींचें पळेल का ?

तडफड तडफड हातपाय हे थकलों भारी झाडोनी
आशा आशा करीत बसलों हताश अंतीं होवोनी
जोंवरि आहें जिवंत तोंवरि सरातिल माझीं दुःखें का ?
नाहीं ! नाहीं ! अशक्य अगदीं मृत्यूवांचुन त्या एका ! १

जे गेले ते दिवस सुखाचे आनंदाचे अहा किती
क्रूरा चिंता या हृदयातें माहित तेव्हां ती नव्हती;
जाडी भरडी मीठ भाकरी दीन झोपडी सेवोनी
आनंदानें कंठित होतों काळ जगातें विसरोनी.

चिंतेचा मी दास परी
दुःखें गांजिति परोपरी

भक्षायातें अन्न मिळेना नेसायातें वस्त्र नसे
दुष्काळाचे दिवस कसे हे जाती चिंता मनीं वसे;
इकडुनि तिकडे तिकडुनि इकडे वेडा जणुं मी फिरत असे
या पोटाच्या लागुनि नादीं शिणलों आतां करूं कसें ! २

शेतें गेलीं शेतें गेलीं बैलहि गेले ते मरुनी
घरांत वाजे नकार घंटा गेली शक्ति मम हरुनी;
कामासाठीं वणवण फिरतों सोय न लागे कुठे परी
धनिकजनाच्या जवळी जातां टोंचुनि वदती परोपरी.

देवा आतां काय करूं !
उदरीं कंटक काय भरूं ?

हरहर ! देवा ! किती हेलना होत असे या दीनाची
वसुंधरे गे ! घे मज उदरीं किंकर तुजला हा याची.
अंत कासया बघसी आतां उघड आपुले दरवाजे
येतों ! आलों ! बघ हें जननी टाकुनि देहाचें ओझें. ३

वडाळा, २५ जून, १८९७.

## ४०. पर्जन्याप्रत.

या पद्यांत एक दुष्काळपीडित स्त्री मृगनक्षत्रापासून म्हणण्यासारखा पाऊस एकही पडला नाहीं म्हणून पर्जन्याची प्रार्थना करिते आहे अशी कल्पना केली आहे.

ये पर्जन्या विनवी तुज दीन कन्या ॥ ध्रु० ॥

देसी जीवन तूं या जगता
ऐसे असुनी कां रे आतां
पाहसि अमुच्या सदया अंता
जहाली दैना. १

किति दिन आतां दुःख सहावें
अन्नावांचुनि कैंवि रहावें
मुलां कसें मी या पाळावें
मार्ग सुचेना. २

मडकीं भांडीं औतें शेतें
विकुनी केलें निर्वाहातें
परि मज आतां भक्षायातें
अन्न मिळेना. ३

कधीं सेवितें कंदमुळांतें
केव्हां कोमल तरुपर्णांतें
कधीं करूनी केवळ असतें
जलाच्या पाना. ४

क्षीण जहाली सारी शक्ति
नुरलि जिवाची हृदयीं भक्ति
कां न माझिया आतां मुक्ति
मिळे या प्राणा. ५

ये दुःखानें हृदयीं भरतें
रडतें धरणीवर मी पडतें
आक्रोशूनी तुजला मरतें
धीर उरेना. ६

ये ये ये ये दीन दयाळा
असशिल तेथुनि धांव कृपाळा
जीवन देउनि आम्हां बाळा
करीरे त्राणा. ७

चढाळा, दुष्काळ कँप, ३० जून. १८९७.

---

## ४१. कोकिलाची वाणी ऐकून.

संध्याकाळीं कवि आपल्या झोंपडींत सचिंत बसला असतां त्यास
कोकिलवाणी ऐकूं आली त्या समयीं तो म्हणतो:

संध्येची रुचिर प्रभा पसरली, गेली रवीची छवी
लोपानी, तरुकोटरीं शिरतसे वेगें खगांची तती;

एकाकी बसुनी खुशाल बहलीं वृक्षाचिया कूजितीं
नादी कोकिल आपुल्या, गमतसे गूढार्थ हा सूचवी.

आतां रम्य वसंत येइल अहा आनंददायी मना
प्रेमानें सहकार पूजिल तया वाहूनियां मंजिरी;

वल्ली पल्लवितां तशा निजकरीं वाहून माल्यें बरीं
प्रीती मूर्तिमती वसंत दुहिता मोहील कामीजनां.

लागे कोकिल कंठचंचु अपुली संशोधुनी गावया
आतां काव्यविशारदा प्रिय सख्या, कां तूं उगा बैससी?

ये ये आश्रम आपुला झडकरी सोडून तूं अंगणीं
प्रीतीच्या कवनास गा मजसवें चिंता झुगारूनिया.

आलों ! थांब ! सख्या पिका, समजलों हेतू तुझा मानसीं
गातों गान तुझ्यासवें कविजनां निद्रिस्त पाचारुनी.

खंडाळा, दुष्काळ कँप, मार्च १८९७.

---

## ४२. गोड स्वप्न.

दिवस झाले बहु पाहुनी प्रियेला
म्हणुनि गेलों भेटण्या मी तियेला;
नद्या नाले लंघून गिरी थोर
निजागारा पोंचलों मी अखेर. १

गृहामाजी टाकिला जों न पाय
बाळ कडियेवर घेउनी स्वकीय,
सखी आली जलकलश घेउनीया
वदे आश्चर्यें मजसि पाहुनिया. २

" किती दिन हें राहणें दूरदेशीं
प्रिया ? टाकुनि काननीं दीन दासी !
बाळ तान्हा हा मधुर करी लीला
नसे कोणी कौतुकें पहायाला. " ३

शब्द इतुके बोलून कंठ दाटे
प्रिया--नेत्रीं अश्रुचा पूर लोटे;
कलश हस्तांतिल गळुनि पडे खालीं
तदा शोकाकुल फार मनीं झाली. ४

" त्वरित चित्तांतील सोड गडे चिंता
तुला संगें नेईन सत्य आतां
आज पासुनि टाकूनि तुला दूर
न मी पळभरही खचित राहणार. " ५

असें बोलुनि जों धीर द्यावयाला
तिच्या पाठीवर हात टाकियेला,
चूक पेटीची बोंचली कराला !
तयासरसा सुख-हेतु नष्ट झाला ! ६

नेत्र उघडुनि पाहतां सभोंवार
प्रिया दिसली नच तें न निजागार,
परी होतों एकला झोंपडींत
पडुनि शयनीं यामिनी घालवीत ! ७

पुढें आलें मज कळुनि सर्व कांहीं
स्वप्न होतें सत्य तें, सत्य नाहीं;
स्वप्नसृष्टींतिल सर्व अहा खेळ
मला त्यांनीं भुलविलें अल्पकाळ. ८

प्रिय स्वप्ना, त्वां फसविलें मला ना !
प्रिया कोठें ! मी कुठें ! बाल तान्हा !
वृथा मातें क्षण त्यांसि भेटवूनी
पुनः विरही टाकिलें ना करूनी ! ९

जरी स्वप्नांतील भास खरे होते
हाय ! सौख्या मग काय कमी मातें !
मुळीं नसती वाटली मना चिंता
जरी वसती सर्वदा दूर कांता. १०

जामखेड, जुलई, १८९७.

## ४३. भंगलेली मुरली.

( ' होय मला अपशकुन० ' शापसंभ्रम )

हा ! मुरली भंगली !
प्राणाहूनि जी प्रिय मज झाली. ॥ धृ० ॥

जीतें ओष्ठीं धरतां प्रेमें
काव्य कराया स्फूर्ति जाहली. १

घेउनि जीतें सायंकालीं
मंजुल गीतें बहु गायीलीं. २

ऐकुनि जीची मधुरा वाणी
उदासीनही वृत्ति रंगली. ३

आनंदाची सरिता केवल
दुर्दैवानें आटुनि गेली. ४

हरहर ! मुरली जाय लयातें
टाकुनि मातें चिंताजालीं. ५

स्फूर्तिस गेली घेऊनि संगें
कवितेतें जी प्रेमळ व्याली. ६

कशी करावी कविता आतां
न कळे मातें मतिही भ्रमली. ७

मंचर, २० एप्रिल, १८९८.

## ४४. सत्य आणि प्रेम.

### सत्य.

कालें करून नव यौवन नष्ट होई
सौंदर्यही सकल सत्य लयास जाई;
योद्धे रणीं पडति दुर्ग तसे अनेक
आहे ध्रुवासम सुनिश्चल सत्य एक. १

### प्रेम.

" कच्चा धागा प्रेमका मत् खैंचो तूट जाय "

विकारें जगीं पालटे रूप ज्याचें
तया कोण मानील हो प्रेम साचें ?
खरी प्रेम रज्जू तुटेना कधींही
जरी तोडिली ओढुनी दो करांहीं. २

सातारा, जुलई, १८९८.

## ४५. स्फुट श्लोक.

हे वृश्चिका तव असे विषयुक्त नांगी
गर्वा कशास म्हणुनी धरिशी निजांगीं;
जातांच दुर्विधिबळें सहसा तुटून
दीनाहुनी पुढति होशिल सत्य दीन. १

हे पारिजातकलिके तुजला बघोनी
संतोष पावति गडे मम नेत्र दोन्ही;
त्वत्सौकुमार्य तुजला परि सोडणार
होतों सुखिन्न मनि येउनि हा विचार. २

मधुर मृदुल भृंगा गुंजतोसी कशाला
अशिशिरकर आतां पश्चिमाशेस गेला;
रुचिर कमल लागे सत्वरीं हें मिटाया
त्यजुनि म्हणुनि यातें जा कसा दूर ठाया. ३

शुद्धात्मा मी मजसम नसे कोणिही सत्वशील
दुग्धा ऐसें समजुनि मनीं तूं जरी फूगशील
एकाएकीं लवण पडतां थोडकेंहीं तुझ्यांत
त्वद्गर्वाचा खचित सखया नाश होई क्षणांत. ४

तूंते शक्ति असे अपार अनला जाळावयाची जनीं
कां तूं गर्व म्हणूनि दाविसि असा बाहेर धूमांतुनी ?
सारें तेज निघोनि जाइल तुझें पाणी जरी ओतिलें
अनोन्याप्रति शत्रु विश्वपतिनें आहेत निर्मीयले. ५

अस्ता जाउनि चंद्रमा झटकरी जेव्हां सरे यामिनी
प्रेमें ये परिरंभण्यास सविता प्राचीदिशा कामिनी,
त्यातें आडवुनी ढगें परि अहा त्याच्या सुखा नाशिती
अन्यातें बघुनी सुखी सुख जगीं होई न दुष्टाप्रती. ६

सदा वससि तूं जरी निजगुणें नृपाच्या शिरीं
तुला रुचिर कामिनी भुलुनि बैसवीती करीं;
परंतु वसतो हिऱ्या गुरु तुझ्यांत बा दोष हा
तुझा कणही सेवितां त्वरित जीव जातो पहा. ७

पाषाणा तुज योजिती जन जरी बा नीच कार्याप्रति
होऊं खिन्न नको मनांत सखया आहेस मोठा अती;
येतां योजक सुज्ञ चारु पुतळा काढील तूझ्यांतुनी
वस्तूचा उपयोग होत नसतो कारागिरावांचुनी. ८

पुष्पाचा वास ज्याच्या ग्रहण करूनिया नासिके तोष होतो
ज्याची पाहून कांति तरुणिजन मनीं फार लज्जा वरीतो,
हा हा ! ऐशा गुलाबीं परि जगपतिनें निर्मिलें कंटकाला
दोषावांचूनि नाहीं खचित जगतिं या कोणि जन्मास आला. ९

'का' 'का' शब्द कशास फार करिसी वृक्षावरी वायसा
बैसोनी, तव हर्ष कर्कश रवें होणार लोकां कसा !
गर्वानें फुगुनी खुशाल कर तूं घोर स्वना यापरी
येतां कोकिळ बा तुला पळुनियां लागेल जावें दुरी. १०

कंदर्पा शुद्ध रूपा बघुनि तव मनीं कुंद लज्जीत होय
होई साऱ्या जनांचा सतत तुज जरी सेविलें पुष्ट काय;
तूझ्या त्या दुष्ट दर्पे परि नच सुजनां वाटसी माननीय
एक्या दोषें अहाहा गुणगणहि कसा लुप्त होऊन जाय. ११

नेत्रा सौख्य करी तुझी बघुनियां हे दाडिमा चारुता
वाटे सत्य मला विधी तुज अती दावी वृथा क्रूरता;
सौंदर्यस्थिरता अहा तुजसि तो देता विधाता जरी
थोडाही मिळता न मान मग त्या बा माणिका भूवरी, १२

तूझें प्राक्तन पारिजात कुसुमा मातें गमे चांगलें
सौगंधें परिपूर्ण तूं असुनियां सद्रूपही थाटलें;
देती दुष्ट भुजंग ते परि तुला वासार्थ तो त्रास ना
जे जे थोर तयांस लागति जगीं भोगावया यातना. १३

जेव्हां ये उदयास वासरमणी प्राची दिशेलागुनि
शोधाया निजभक्ष्य जाति उडुनी पक्षी स्वनीडांतुनी;
घेसी टांगुनि आपणास तरूच्या शाखेस तूं वाघुळा
किंवा कौठुनि गर्दभास कळणें गोडी असे जी गुळा. १४

मेघाची तीव्र वृष्टी जरि तव शिखरीं पर्वता होत आहे
सिंहव्याघ्रादि पृष्ठीं तव पशुगण तो सर्वदा हिंडताहे;
त्वच्चित्तातें न ठावें कधिंहि तरि गड्या नांव तें खिन्नतेचें
अन्यार्थ त्रास पीडा निशिदिनिं सहणें ब्रीद हें सज्जनाचें. १५

१८९८.

---

# ४६. तुळसीदास.

तुळसीदास म्हणून जो एक प्रसिद्ध साधु होऊन गेला तो पहिल्यानें फार स्त्रीलंपट असे. एके दिवशीं त्याची स्त्री माहेरीं असतां तो रात्रीचा उठून तिचे गांवास गेला व एका खिडकींतून भुईपर्यंत एक सर्प लोंबत होता त्यास काम-मदानें अंध होऊन दोर आहे असें मानून त्यावरून तो चढून वर गेला व आपल्या प्रियेस भेटला. पतीनें केलेलें धाडस जेव्हां त्याच्या स्त्रीस समजलें तेव्हां तिनें "मजवर इतकी प्रीति करतां तीच जर ईश्वरावर कराल तर जन्माचें सार्थक तरी होईल" असा उपदेश करून त्याची कानउघाडणी केली. तुळशी-दास लागलाच शुद्धीवर येऊन त्या दिवसापासून तो पूर्ण विरक्त बनला. हाच प्रसंग खालील पद्यांत वर्णिला आहे.

जयें श्रीरामाचें चरित लिहिलें रम्य कवनीं
यशोरूपें जो या अजुनी करितो वास भुवनीं,
विरागी तो कैसा प्रथम तुळसीदास बनला
कथा ती ऐकोनी करितिल मनीं लोक नवला. १

तयाची स्त्री साध्वी बहु गुण युता देवि [1]ममता
गमे साक्षात् लोकीं अवतरलि कीं देवि ममता;
असे ती प्रीतीची बहुत तुळसीदास तिजला
भजे भावें जैसा भ्रमर भजतो रम्य कमला. २

जरी नाहीं कांता क्षणभरि कधीं त्यास दिसली
सुचेना ताच्चित्ता क्षणहि न कुठें वृत्ति रमली;

---

1 तुळसीदासाच्या स्त्रीचें नांव

मनीं ध्यानीं स्वप्नीं विषय न तयां ज्ञात दुसरा
करी कामक्रीडा विविध सखि संगें सुरुचिरा. ३

पुढें गेला ग्रामा सहज तुळसीदास निघुनी
तया मागें त्याची जनकसदनीं जाय गृहिणी;
निजागारातें तो त्वरित परते कार्य करुनि
परी पत्नी कोठें प्रियकर न पाहे स्वनयनीं. ४

हृदय मग तयाचें जाहलें फार खिन्न
निजगृह नयनांतें भासलें सर्व शून्य;
क्षणभरि करमेना अन्नपाणी रुचेना
विरह जिवलगेचा ताप दे, त्या सहेना. ५

कांहीं न कार्य करणें सदनीं निवांत
एकीकडे तुळसिदास बसे सचिंत;
कांतेचिया निज करी प्रिय चिंतनाला
ऐशा स्थितीत दिन सर्व लयास गेला. ६

होतां निशा करुनि सत्वर भोजनातें
शय्यागृहीं निघुनि जाय निजावयातें;
शय्येवरी पहुडला परि झोंप येना
चित्तीं अती तळमळे मन आकळेना. ७

सुममृदु गमली जी एकदां रम्य शय्या
बहुत कठिण लागे कामिनी वांचुनीया;

विरह करित भारी वेदना तच्छरीरीं
जणु विषमय विंचू काय नांगीस मारी. ८

त्यातें सुचे मग उपाय सुरेख एक
निद्रिस्त पाहुनि गृहांतील सर्व लोक,
सोडून सत्वर निघे निज सद्म जाया
ग्रामास त्या वसतसे प्रिय जेथ जाया. ९

जेथें करी वास तदीय कांता
तो ग्राम दो कोसचि दूर होता;
जाया तयातें बरवी न वाट
धोंडे बहू कंटक तीक्ष्ण दाट. १०

जग घनतिमिरानें जाहलें व्याप्त सारे
मधुनि मधुनि सों सों सूटती घोर वारे;
श्रवण कटु करीती कीटकें शब्द नाना
अवघड बहु त्यातें मार्ग डोळां दिसेना. ११

लागून ठेंच दगडावरि झोंक जाई
पायीं रुते हळुच कंटक रक्त येई;
ऐशापरि बहुत भोगुनि संकटांतें
कामार्त ये अपुलिया गृहिणीगृहातें. १२

गृहामाजी जाया बहुत तुळसीदास झटला
परी नाहीं कोठें हरहर ! तया मार्ग दिसला;

निराशेनें तेव्हां गरगर वराभोंवति फिरे
झुरे चित्तीं दुःखें आठवुनि मनीं स्वप्रियकरे. १३

आहे प्रेमा तुझीरे अघटित करणी वर्णवे ती न यासी
देसी अंधासि दृष्टी त्वरित करिसि तूं अंधही डोळसासी !
अग्नीतें शांतवीसि प्रखर, वितरसी सौम्यता कंटकासी
तूं जादूगार मोठा भयकर भुजगा रज्जुसा भासवीसी. १४

होता पन्नग कृष्ण लोंबत महा खालीं गवाक्षांतुनी
कामांधा नच ओळखे हरखला दोरी तया मानुनी;
वेगानें चढुनी तयावर शिरे तो कामिनीमंदिरीं
कांतेतें अपुल्या हळूच उठवी स्पर्शा करूनी करीं. १५

झाली जागृत देखुनी प्रियकरा चित्तीं करी विस्मया
रात्रींचे इतुक्या कुठून ? सखया आलां कसें ? कासया ?
साध्वी प्रश्न करी पतीस अपुल्या प्रार्थून दोहीं करीं
" आलों दोर चढून मी वर सखे "-तो बोलिला उत्तरीं. १६

हातीं घेऊन दीप ती मग बघे वेगें गवाक्षाकडे
सर्पाचें बहुथोर भेसुर कडें दृष्टीस तीच्या पडे ?
त्यातें पाहुनि ती मनीं दचकली भ्याली सती बोलली
" नाथा साहस हें भयंकर तुम्हीं केलें किती यास्थळीं. १७

ज्यातें दोर तुम्हीं मनीं समजलां तो घोर आहे अही
केला दंश तुम्हां तयें न विधिनें केली कृपा थोरही;

नाथा जीवित सत्य आज तुमचें जातें लया हाय ना ?
माझेंही तुमच्या सवें, अहह ती मातें नको कल्पना. १८

आतां मी करित्यें विनंति इतुकी जोडून दोन्ही करां
ऐसें साहस आजपासुनि तुम्ही केव्हां न हो आचरा;
आसक्ती विषयीं अशी नच बरी सोडून द्या लौकरी
जी प्रीती करितां तुम्ही मजवरी तैशी न कां ईश्वरी ? १९

जें नित्य तें त्यजुनि कां भजता अनित्या
हें नाशिवंत सगळें नच गोष्ट मिथ्या;
भावें धरा चरण त्या दृढ राघवाचे
तोडील जो सकल पाश झणी भवाचे " २०

श्रवण पत्नीच्या करुनि दिव्य बोला
त्वरें शुद्धीवर तुलसिदास आला;
बने सोडुनि संसार तो विरक्त
पुढें झाला विख्यात रामभक्त २१

१९९८.

---

## ४७. ही रम्या वनभूमिका.

ही रम्या वनभूमिका कितितरी आनंद हे मन्मना
छायेतें पसरून वृक्ष करिती शांत श्रमार्ता जना;

नाना फुल्लता स्वकीय सुमनें प्रेमें मला अर्पिती
गाणीं मंजुळ गाऊनी खगतती कर्णांस संतर्पिती. १

पाहूनी मज हीं विलोल हरिणें भीतीमुळें धांवती
येथें या हिरव्या तृणांतुनि किती मुंग्या त्वरें चालती;
स्वच्छंदें फुल पाखरें सुरुचिरें नाना उड्या मारिती
कोळी काढुनि सूक्ष्म तंतु आपुलीं जाळीं नवीं बांधिती. २

हें येथें हिरवें दिसे तृण अहा नेत्रां किती सुंदर
वेगें वाहत यांतुनी खळखळा हा चालला निर्झर;
तोयाचे उडती तुषार पडती ते या तृणाच्या वरी
पावोनी स्थिरता क्षणैक झुलती सन्मौक्तिकाचे परी. ३

साधाया स्वहिताप्रती झगडती जेथें सदा माणसें
कार्यें नित्य जिथें अनंत घडती शांती मनाला नसे;
ऐशी ती गमली गमो सुखकरी कोणास मुंबापुरी
ही मातें वनभूमिका अधिक दे तीहुन सौख्यापरी. ४

वासातें करुनी प्रचंड नगरीं ज्याचें मन क्षोभलें
घ्याया शांति सुखोपभोग म्हणुनी जें फार उत्कंठलें;
त्यातें या वनभूमिकेंत मिळते भोगावया शांतता
चिंतासंतति जी मना मळविते जाई लया तत्वतां. ५

कार्यें शांतपणें समस्त करिती प्राणी इथें आपुलीं
नाहीं माहित नीच मत्सर तयां ठावा न तैसा कली;

त्यातें लावुनि एकदा नियम जे त्या ईश्वरानें दिले
प्रेमें पाळुनि, अल्प जीवित जगीं ते लोटिती आपुलें. ६

गेलों होउनि बद्ध मी सतत या संसार जालांतरीं
दुर्दैवें मज सांपडे न म्हणुनी वागावया त्यांपरी;
पापी दुष्टमति प्रमत्त नर या लोकीं बहू नांदती
त्यांचा तापद होतसे प्रतिदिनीं संसर्ग मातें अती. ७

कंटाळून जगास मी जरि कधीं आलों स्थळीं या पुन्हां
शांतीतें वनभूमिके वितर ही माझी तुला प्रार्थना;
एकांतीं मग मी बसून तुझिया गे रम्यकुंजांत या
भक्तीनें परमेश्वरास भजुनी नेईन आयू लया. ८

१८९८.

---

## ४८. कृष्णा कोयनांचा संगम.

( चाल—गडे हो सत्यहि गुरुची खुण० )

सखेगे, सुरेख संगम किती, कृष्णा मिळली कोयनेप्रति
किती विशाल तट हे अहा !
प्रिय सखे उभी तूं रहा
क्षण येथिल शोभा पहा
सखेगे० १

बहु चकाकते यावरी
ही सुरेख सिकता, परी
जाय गळुनि धरितां करीं
सखेगे० २

जगिं असे सुखाचे क्षण
नर झटे धराया पण
जाति तयास ते फसवुन
सखेगे० ३

झष जलीं उड्या मारिती
भय न या सुखी हे किती !
भव जलीं रमूं या रिती
सखेगे० ४

बघ दोघिंचि मैत्री किती
एकमेकिंस आलिंगिती
दोन असून एकचि होती
सखेगे० ५

जर अशींच अपुलीं मनें
एक होतिल गे प्रीतिनें
मग सुखास कुठुनी उणें
सखेगे० ६

स्थळ पवित्र हें गे जगीं
जन बघेल जो लोचनीं
अघ हरेल त्याचें क्षणीं
सखेगे० ७

## ४९. साहचर्यप्रेम.

( इंग्रजीवरून )

झालें जरी मन तुझें सखया उदास
मी रंजवीन मधु गाउनि गीत त्यास;
वृत्ति प्रसन्न असतां करुनी स्मितातें
संगें तुझ्या क्रमिन मी आपुल्या दिनांतें. १

निद्रा जरी तुजसि ये शयनीं पडून
राहीन सन्निध तुझ्या सखया बसून;
दुःखामुळें तुज कधीं जर ये रडाया
येई न अश्रुजल कां मग लोंचना या ! २

बाहेर येइ हृदयांतुनि जो उसासा
तो मी प्रतिध्वनित बा न करीन कैसा ?
चिंतार्णवांत बुडतां तव सौख्य नौका
झालेंच सौख्य मम नष्ट न यांत शंका; ३

येईल जैं निधनकाल तुझा अखेर
प्रेमें तदा रडुनि बोलुनी निश्वसून;
सांगून हे तुजसवें दहण्या शरीर
शांतींत दिव्य मग मी सखया मरेन ! ४

## ५० माझी आई.

कवि अहमदनगरास असतांना एके दिवशीं कांहीं कारणावरून त्यांस आपल्या आईचें स्मरण झालें. व मनास फार वाईट वाटलें; त्या प्रसंगीं खालील पद्यें त्यानें लिहिलीं आहेत.

जननि तव वियोगें दुःख होतें मनाला
दिवस बहुत झाले पाहुनि त्वत्पदांला;
त्यजुनि तुजसि आलों एकटा दूर देशीं
तुजसम ममतेनें वागवी कोण यासीं ! १

स्मृति तव मज होते माउली फार फार
तुजविण मज भासे शून्य सारें अगार;
अशन शयन मातें गोड कांहीं न लागे
तुझि सुरुचिर मूर्ती मन्मनीं नित्य वागे. २

खळ खळ खळ डोळां चालती अश्रुधारा
स्मृति तव मज होतां अंग कांपे थरारा;
तिळ तिळ तुटतो हा जीव गे तूजवीण
पळहि मजसि भासे एक वर्षासमान. ३

सदयहृदय माते तूज केव्हां बघून
तव सुखकर चित्तीं मूर्ति मी साठवीन;
निशिदिनिं हृदयांतें तोडिती हे विचार
म्हणवुनि मजलागीं होतसे दुःख फार. ४

कथिसि मजसि तूं जे शब्द माझ्या हिताचे
परिसुनि पुरवावें कोड केव्हां मनाचें;
मजवरि बहु झाले गे त्वदीयोपकार
कितिक तरि गणूं मी त्यां नसे सत्य पार. ५

ग्रहण करुनि मातें प्रीतिनें स्वोदरांत
जननि दशम मासीं सोडिले या जगांत;
प्रसव बहुत पीडा दे, परी तूं न कष्टी
तिळ, मजसि कृपेनें दाविली रम्य सृष्टी. ६

प्रतिदिनिं नियमानें दुग्ध तें पाजियेलें
मजसि हळद तैला लावुनि न्हाणियेलें;
चुकुनिहि मजलागीं काय लागेल दृष्ट
म्हणुनि मज तुवां गे लाविलें गालबोट. ७

चुकुनि जरि कधीं मी दृष्टीच्या आड जाई
सदय हृदय तूझें बावरें फार होई;
त्वरित निजकरीचें कार्य सोडून कांहीं
मजसि हुडकण्यातें जात होतीस आई. ८

जर कधिं चुकुनी मी लागलों क्रंदण्याला
' कुणि मम अगबाई मारिलें तान्हुल्याला; '
म्हणवुनि इतरांतें पूशिलें त्वा भिऊन
उपकृति तव कैशी सांग फेडील दीन. ९

शिशुपणिं बहुबाळा शोभतीं बाळलेणीं
म्हणुनि करविली त्वां तायती एक आणी;
सुभग मनगट्याही घागऱ्या डूल वाळे
उपकृति तव कैशी मी वदूं गे प्रियाळे. १०

रुचिर गजनि तूं गे मुंबईहून उंची
अणवुनि शिवली या बालका रम्य कुंची;
तशिच बहुत केली अंगडीं टोपडीं ही
खचित तव कृपेला माउली पार नाहीं. ११

जरि कधिं बसलों मी हट्ट घेऊन कांहीं
त्वरित पुरविला तो तूंच ना सांग आई;
क्षणतरि तुज आला राग गे सांग काय ?
तुझि उपकृति कैंशी बाळ वर्णील माय. १२

जरि परगृहिं केव्हां जासि तूं भोजनातें
त्यजुनि न मजलागीं सत्य गेलीस मातें;
तनुमनधन सारें अर्पिलें बालकातें
उपकृति तव कैशी वर्णवे वैखरीतें ? १३

निशिदिनि मलमूत्रीं लोळतां अज्ञ पुत्र
तुजसि न कधिं आली माउली खास खंत;
घडि घडि मळवीलें ओकुनी अंबराला
परि न तुज कदाही माउली राग आला. १४

हळु हळु मग आई लागलों चालण्याला
मधुनि मधुनि तैसे शब्द उच्चारण्याला;
श्रवण करुनि माझ्या रम्य अव्यक्त बोला
जननि तव जहाली कौतुकें वृत्ति लोला. १५

कितिक वद तुझ्या मी आठवूं सत्कृतींतें
अगणित असती त्या पार नाहीं तयांतें;
जणु उपकृति देवी पातली मूर्तिमंत
बघुनि तुजसि माते येतसे मन्मनांत. १६

जरि करवुनि जोडा स्वांगिंच्या कातड्याचा
जननि तव पदीं गे घातला मीच साचा;
उपकृति तव नाहीं फेडणें शक्य बाई
वद वद उतराई हा कसा पुत्र होई !! १७

अगणित अपराधां सर्वदा मी करोनी
खचित तव जिवाला टाकिलें त्रासवोनी;
उचित मजसि शिक्षा पामरातें म्हणोनी
हर हर हर दैवें टाकिलें दूर रानीं. १८

सतत जननिपाशीं राहती जे सुखांत
खचित मजसि वाटे धन्य ते धन्य होत !
कितितरी हतदैवी सत्य मी पोर आई
स्मरुनि तुजसि माते ओरडे सर्वदाही. १९

तुजसि कितिक वेळां स्वप्निं मी पाहतों गे
तुजसि कितिक वेळां स्वप्निं बोलावितों गे;
जवळि बसत आहे अंबिका, काय भीती
म्हणुनि कितिक वेळां चिंतितों मी स्वचित्तीं. २०

उघड उघड आहे स्वप्न तें फार खोटें
क्षणभरि परि चित्ता देउनि स्थैर्य मोठें;
त्वरित निघुनि जाई, सत्य येई कळून
तिळभरि सुख नाहीं हाय ! चिंता म्हणून. २१

हर हर उदराची खांच या नीच फार
प्रियकर तिजसाठीं सोडणें ये अगार;
खचित खचित देवा त्रास देतो प्रवास
अरिसही न घडो हा ही करी दास आस. २२

सदय हृदय देवा एक आतां विनंती
करित तुज असें मी ठेवि तीं नीट चित्तीं;
जरि तव मनिं कांहीं द्यावयाचेंच मातें
त्वरित मजसि देई मीच जें मागतों तें. २३

मजसि मुळिच नाहीं आवडी दागिन्यांची
सुभग बहुत उंची वस्त्र नेसावयाची;
तरुण सुगुण ऐशा गोडशा कामिनीची
वसति जवळि व्हावी ही न इच्छा मनींची. २४

मजसि गरज नाहीं पार्वती शंकराची
मजसि गरज नाहीं इंदिरेच्या वराची;
मज भजन कराया आवडे फार आई
तदितर जगतीं या देवता अन्य नाहीं. २५

सतत मम असो ती माय नेत्रांसमोर
जननि हृदयसद्मीं बागडो हा कुमार;
करयुगुल असो हें मातृसेवेंत मग्न
नयनमधुप राहो तन्मुखाब्जीं सुलग्न. २६

मजवरि जरि आलीं संकटें घोर नाना
जरि गुरु गदयोगें जाहलों दीनवाणा;
विसर न तरि तूझा माउली गे पडेल
हृदयिं तव असूं दे नम्र हा बाल-बोल. २७

जरि न मुळिं मिळालें अन्न भक्षावयाला
जरि न मुळिं मिळालें वस्त्र नेसावयाला;
विसर न तरि तूझा माउली गे पडेल
हृदयिं तव असूं दे नम्र हा बाल-बोल २८

जरि करित पुरीं या वास विद्यार्जनाला
जरि उदर भराया चाललों मी पुण्याला,
विसर न तरि तूझा माउली गे पडेल
हृदयिं तव असूं दें नम्र हा बाल-बोल. २९

शिशुपण दुरि गेलें जाहलों प्रौढ आतां
परि समज अजूनी अंबिके फार कोता;
म्हणुनि जरि जहाल्या या करानें चुक्या गे
जननि मज नको तूं देउं सोडून रागें. ३०

उदय दिनकराचा पश्चिमे हें घडेल
चुकुनि अमृत बिंदु प्राणनाशा करील;
सहज शिशिरतेला चंद्रमाही त्यजील
परि न मम मनींची मातृभक्ती चळेल. ३१

स्मरण तव जहालें माउली फार याला
विपुल सलिल दुःखें पातलें लोचनाला;
क्षण मन रिझवाया गुंफिली पद्यमाला
सहज, जननि ती मी अर्पितों त्वत्पदाला. ३२

साधी कविता माला येई बरवा न वास कुसुमाला
मोल परि प्रेमाला देती जें रसिक तें न हेमाला ३३

नगर, १८८९.

## ५१. पश्चात्ताप.

नको तळमळूं दीन मना तूं आठवुनी गत काला
स्मरण तयाचें कारण होतें मातें अनुतापाला. १

म्या नीचानें म्या दुष्टानें आत्महितावर घाला
घालुनि हातें फेंकुनि दिधला ज्ञान सुधेचा प्याला. २

किती खरोखर सुखकर होती कोमल बाल्यदशा ती
नीच जगाशीं ओळख नव्हती, नव्हती चिंता चित्तीं. ३

स्वतंत्र होतें मानस माझें भ्रमरासम विहराया
आशा होत्या तरुण मनींच्या तेजोयुत ही काया. ४

नवीन तेव्हां सृष्टी दिसली रात्रंदिन नयनांतें
वृक्षलतांशीं पवित्र होतें बंधुत्वाचें नातें. ५

स्वच्छंदानें खेळुनि दिनभर रात्रीं जातां शयनीं
निजवित होत्या किन्नरयुवती गाउन मंजुळ गाणीं. ६

अशा रीतिनें काळ क्रमितां एके दिवशीं आली
विद्या देवी अवचित रात्रीं घेउनि मजला गेली. ७

कांचनमय निजपक्षांखालीं मजलागीं झांकोनीं
अमित योजनें लंघुनि गेली निजकुंजातें उडुनी. ८

तुंग गिरीच्या शृंगावर तो कुंज तियेचा होता
कुंजामागें सुंदर निर्झर होता एक वहाता. ९

प्रेमें मग ती घेउन मजला देवी कुंजीं गेली
धरुनि करातें माझ्या मजला ऐसे वदती झाली. १०

" द्वार उघडुनि आंत कुमारा जाई तूं त्यज भीति
आहे माझें विलास—मंदिर तेथें करि बा वसति. ११

तेथें तुजला ज्ञानसुधेनें भरले घट दिसतील
परी तयावर घोर विषारी वृश्चिक ते असतील. १२

दंश तयांचा सहन करूनी त्यांतील घे घट हातीं
आनंदानें सुधा तयांतिल सेवित जा आतृप्ति. १३

नको वृश्चिकां दुखवूं त्यांनीं दंश जरी तुज केला
गोष्ट एवढी ठेवुनि ध्यानीं लाग झणीं कामाला." १४

बरें म्हणूनी देवीचरणीं भावें केलें नमन
आशीर्वचना देउनि मग ती पावे अंतर्धान. १५

आतुर झालों सुधारसांचे घुटके घटघट घ्याया
विलासशाळेमाजी दिव्य स्वैरपणें विहराया. १६

सत्वर म्हणुनि द्वार उघडुनी उत्कंठेनें आंत
शिरुनि सुधेचा घट घ्यायातें घातियला मी हात. १७

हाय ! हाय ! तों वृश्चिक अपुली वेगें नांगी मारी
तीव्रवेदना क्षणांत या मम झाल्या सर्व शरीरीं. १८

असह्य होतां दंशवेदना विसरुनि देवीवचन
अविवेकानें म्या नीचानें केलें वृश्चिकहनन. १९

तयाबरोबर सुधा घटांतिल सारी आटुनि जाई
कुंज मनोहर न दिसे नयनां अदृश्य गिरिही होई. २०

तेव्हांपासुन पडलों आहें गर्तेमाजीं घोर
धडपड करितों निघावयातें तींतुन मी बाहेर. २१

प्रयत्न सारे निष्फळ होती शोक मनातें होय
एक जन्म तो कुठुनि हरहर ! कुंज दिसे रमणीय. २२

भयाण भासे वनसम मातें जग जीवित गतसार
श्रवणीं पडती सतत अमंगळ घुबडांचे घूत्कार. २३

तेव्हां चुकलों म्हणुनि मुकलों सौख्यालागीं सकल
तळमळ आतां पुरे मना तव ऐके माझा बोल. २४

अवसरी बुद्रुक, ५ नोव्हेंबर १८९८.

---

## ५२. मणिशंकरास.

तारीख ७ ऑगष्ट सन १८९७ चे करमणुकीत 'माधवानुजास' म्हणून मणिशंकर कवीनें एक कविता प्रसिद्ध केली. आहे तीस उत्तरादाखल खालची कविता आहे. ही कविता तेव्हांच लिहिली होती परंतु कांहीं कारणानें तशीच आज-पर्यंत पडुन राहिली.

उशीर मणिशंकरा मजसि फार झाला खरा
तुझ्या उचित सूचनें त्वरित द्यावया उत्तरा;
कृपा करुनि तूं नको म्हणुनि राग आणूं मनीं
विनंति इतुकी तुला करितसे करां जोडुनी. १

तुझी उचित सूचना खचित वाटते या मना
करीन बहु यत्न मी तिजपरी सदा वागण्या;
परंतु जर म्यां कधीं चुकुनि चाल नाहीं दिली
तुवा हृदयिं पाहिजे त्वरित गोष्ट ही घेतली. २

मदीय कवितासखी बहुत बा असे मानिनी
अशीच धरि चाल तूं तिज असें म्हणावें कुणी !
तिला मधुर जी गमे सतत चाल ती स्वीकरी
अनाथ कवि हा तिची कुठुनि चाल जाणें तरी. ३

करी भ्रमण ती जिथें फिरत हा तिच्या मागुनी
असे सतत लोल तत्सहज सुंदरक्रीडनीं,

जशीं शिकवि याजला सुकविता तशी हा पदें
हळूं हळुच टाकुनी सुवचनें मुखानें वदे. ४

दुजी कथुनि गोष्ट ही तुज, निरोप मी घेतसें
स्वभावरमणीयता सुवनिता-विलासीं वसे;
स्वभाव कृतिच्याहुनी अधिक रम्य सुज्ञां दिसे
खरा रसिक त्यांतला सहज भेद जाणीतसे. ५

१८९९.

---

## ५३. तस्करप्रत.

प्लेगच्यावेळीं कवि रानांत एकटा रहात असतां एके दिवशीं रात्रीचा एक चोर आला. परंतु त्याचे हातीं कांहीं न लागत्तां त्यास परतावें लागलें त्या प्रसंगास उद्देशून ही कविता आहे

ही भयानक निशा निशाचरी, स्वैरिणी फिरतसे महीवरी,
पाहतां भयद रूप लोचनीं, जातसे सकळ धैर्य लोपुनि. १

किर्र शब्द करिती चहूंकडे, रात्रिचे अदय दूत हे किडे,
अंधकार भरला दिशांतरीं, प्राणि मात्र निजले घरोघरीं. २

तस्करा मम गृहास या क्षणीं, काय लाभ तुज सांग येऊनि,
द्रव्य हेतु वसतो जरी मनीं, जा कसापरत ये थुनी झणीं. ३

झोंपडी तरुतळीं उभारुनी, वास मी करित एकला वनीं,
आप्तबंधु मम मित्र सोयरे, वाटती विहग वृक्ष हे खरे. ४

संगतींत बसुनि तयांचिया, नेतसे दिवस आपुले लया,
प्रीतिनें रुचिर वाहुनि फुलां, पूजितों सतत काव्यदेविला ५

भक्तिनें करितसें तिचा स्तव, गीत गाउनि मुखें सदा नव,
तत्प्रसाद मज तेंच बा धन, आवडे अधिक कांचनाहुन. ६

पाहिजे जरि तुला तयांस ने, चोरुनि त्वरित योजि कल्पने,
बोलती जन जया जगीं धन, माझियाजवळ येइ कोठुन ? ७

जा गड्या परत आपुल्या घरीं, होउनी बहु निराश अंतरीं,
शीण मात्र तुज फार जाहला, वाटतो म्हणुनि खेद बा मला. ८

१८९९.

---

## ५४. हा ओढा काय म्हणतो ?

दिधलें होतें मला निदाघें टाकुनि कारागारीं
मुक्त जहालों परि मी येतां पर्जन्याची स्वारी. १

स्वच्छंदें मी वहात जातों खालीं शैलावरुनी
भीति न वाटे मजला जाया घोर दरींतुन विपिनीं. २

असोत कंटक किंवा मोठे प्रस्तर मार्गामाजीं
दिवस असो वा रात्रि तमोमय अप्रतिहत गति माझी. ३

भानुकरातें निर्मल जळमय हस्तीं प्रेमें धरुनी
नाचतसे मी उच्चनीच या भेदातें विस्मरुनी. ४

पवन विकंपित वृक्ष अर्पिती सुंदर सुमनें मातें
घेउनि त्यातें भेटाया मी जात असें सरितेतें. ५

व्यक्त कराया स्वप्रेमातें गातो मंजुळ गाणें
खळखळ खळखळ खळखळ खळखळ ऐसा सच्छद्वानें. ६

जातो अंतीं सरित्प्रवाहीं मिळुनी आनंदानें
क्षुद्रपरी मी गुरूपद मजला लाधे सत्संगानें.

१८९९.

---

## ५५. मित्राची तसबीर.

कविच्या एका प्रिय मित्रानें आपली तसबीर कवीस अर्पण केली. त्याविषयीं उत्तरादाखल खालील पद्यें कवीनें त्याजकडे पाठविली होतीं

झालें सख्या दिवस भेटुनि फार तूतें
मी जाहलों बहुत उत्सुक दर्शनातें;
हें जाणुनी मज तुवां तसबीर नामी
जी धाडिली तिजसी पाहुनि हर्षलों मी. १

घेतां तुझी जिवलगा तसबीर हातीं
जाई उचंबळुनि ही मम चित्तवृत्ति;
गोष्टी अनेक घडल्या तव संगतींत
त्याचें मला स्मरण या समयास होत. २

संगें तुझ्या गिरिवरी सहलीस जाणें
तत्रस्थ पादपगणीं फिरणें मजेनें;
हुंगावयास लतिकाकुसुमांस घेणें
प्रेमें कधीं मधुर वन्यफळांस खाणें. ३

तेथें शिलेवर सख्या बसतां सुखांत
मातें मनोहर कथा कथिल्या अनंत;
ज्या ज्या चमत्कृति तुला दिसल्या प्रवासीं
तज्ज्ञान तूं करुनि सत्य दिलेंस यांसी. ४

मित्रा सुसंस्कृत तुझी रमणीय वाणी
वर्णूं किती बहु तिची मजला शिराणी;
ती ऐकतां सकळ दुःख लयास जाई
आनंदपूर्ण मम मानस तूर्ण होई. ५

नाहीं तुझा विसर बा पडणार याला
देईन जीव अपुला तुझिया जिवाला;
वाक्यें मुखें जिवलगा वदलास दिव्य
कर्णांतरीं अजुनि तीं घुमती मदीय. ६

हा हा नको स्मरण त्या तव भाषणाचें !
मातें नको स्मरण त्या मधुर क्षणांचें;
घेणें नको फिरुनि ही तसबीर हातीं
देई जिचें रुचिर दर्शन दुःख अंतीं. ७

मित्रा परी बघुनि ही तसबीर मातें
जी स्पष्ट गोष्ट दिसली कथितों तुला ते;
माझें जसें कृश तुझ्या विरहें शरीर
तैसेंच ही तनु दिसे तव अल्पसार. ८

जें एकदा मुख तुझें दिसलें प्रसन्न
तें हाय आज दिसतें मजला सुखी न;
नेत्रांतली चमक रम्य कुठे निमाली !
कैशी तुझी सुविरहें स्थिति दीन केली. ९

आतां कधीं वद परस्परदर्शनाचा
येणार योग घडुनी सखया सुखाचा ?
प्रत्यक्ष दर्शन करी झणि दुःखहानि
होणार काय असल्या सदुपायनांनीं ? १०

होई प्रभात खग मंजुळ गीत गाती
गोष्टी परी कुठुनिया मज तोष देती;
झालों तुझ्या खचित मी विरहें उदास
भेटीविणें तव मला दुसरी न आस. ११

१८९९.

## ५६. भवान्या.

भवान्या नांवाचा एक वेडा कवीच्या नेहमीं पहाण्यांत येत असे.
त्यास एके दिवशीं पाहून सुचलेले विचार.

भवान्या, तुला बोलती लोक वेडा
मनीं मानुनी तुच्छ देतात पीडा;
न कोणी करी त्वत्स्थितीचा विचार
मला वाटतें ती असे दिव्य फार. १

शिला शोधुनी टेंकडीच्या तळाशीं
सुखें बैससी तूं सदा मोदराशि;
गड्या आवडे फार एकांत तूतें
तृणाच्या परी मानिसी या जगातें. २

कधीं भाक्षिसी भाकरी वाळलेली
कधीं रुक्ष भाजी कुणीही दिलेली;
करूनी कधीं राहसी तोयपाना
उद्यांची तुला अल्प चिंता असेना. ३

असो वस्त्र अंगावरी वा नसोही
तयाची तुला काळजी सत्य नाहीं;
शिला ही तुला भासते पुष्पशय्या
दिगाकाश वस्त्रें बरीं पांघराया. ४

रवीच्या करांचा न चाले दरारा
कडाडो तडित् वा पडो वारिधारा;
हिमाच्या भया अल्प देसी न थारा
न बाधो तुला ऊन पाऊस वारा. ५

कधीं हर्ष नाहीं, तुला शोक नाहीं
असेना मनीं वा जगीं काम कांहीं;
न भीति कशाची तुझा जीव वाही
फिराया दिशा मोकळ्या नित्य दाही. ६

शरीरास नानापरी त्रासवून
तपस्वी जनां होतसे साध्य जी न
प्रयत्नाविणें ती स्थिती प्राप्त झाली
भवान्या, तुला, तूं खरा भाग्यशाली. ७

असें कोण ? कोठील मी ? जावयाचें
कुठें ? देउनी ज्ञान हें जाणण्याचें,
जरी लाविलें ईश्वरें वेड मातें
अहा ! धन्य मानीन मी आपणांतें. ८

झुगारून दास्यास या नीच फार
त्यजूनी जगाचा पसारा असार;
अरण्यांत एकांतवासीं बसून
मुखानें सदा माधवा आळवीन. ९

चाकण, १५ जानेवारी १८९९

## ५७ स्मृति चित्र.

( चाल–अर्ध तनू वारुळीं बुडाली )

स्मरतो मज तो प्रसंग अजुनी दिन बहु झाले जरी
नको तें स्मरण तयाचें परी ॥ ध्रु० ॥

बाळपणीं मी सहज मजेनें गेलों एक्या दिनीं
फिराया स्वच्छंदें उपवनीं.
दिसली तेव्हां प्रभातवेळा प्रसन्न नयनां किती
विहंगम मंजुल आलापिती.
दिनकरसंगें दिसे रंगली पूर्वदिशा सुंदरी
लोचना रूप जियेचें हरी ॥ चाल ॥

झाल्या कुसुमित नाना लता
होता मंदानिल वाहता

परिमलपूरित सेवुनि ज्यातें मन मोदातें वरी. १

उद्यानीं मी वेंचित असतां प्रफुल्ल सुंदर फुलें
सहसा एक नरा देखिलें.
उग्र तयाचें रूप पाहुनी उपजे भीती मनीं
सुटला कंप शरीरा झणीं.
पाहुनि मातें वदे, ‘ बालका, मज भीसी कासया
हें घे पुस्तक खेळावया ’ ॥ चाल ॥

ऐसें सस्मित वच बोलुनी
हस्तीं पुस्तक मम देवुनी
दृष्टि पुढुनि मम नर तो झाला अंतर्हित सत्वरी. २

रम्य रेखिलीं होतीं चित्रें पशुपक्ष्यांचीं बरीं
मुद्रिलें होतें हैमाक्षरीं.
आशा, विभव, प्रीति, संपदा यांवर होते धडे
पुस्तकीं लिहिलेले रोकडे.
हर्षभरें मी नाचत गेलों सदनातें घेउनी
त्याजला नीट दिले ठेवुनि ॥ चाल ॥
गेले वत्सर कांहीं पुढें
दृष्टिस एके दिवशीं पडे
पुस्तक तें मी औत्सुक्यानें धरिलें अपुल्या करीं. ३

सुरम्य चित्रें कुरूप दिसलीं गेलीं तीं अक्षरें
मागें पुस्तक कोरें उरे.
आशा, विभव, प्रीति संपदा सुदिव्य यांचे धडे
गेले विलयाला बापुडे.
एकवार जें कारण झालें सुखवाया लोचना
उपजवी उलटी तें भावना ॥ चाल ॥
झालों खिन्न बहू मी मनीं
बोललों आणुनि जल लोचनीं
क्रूरा काळा असे तुझी ही कठोर करणी खरी ! ४

असती बाल्यीं उड्या मनाच्या उंच अहाहा किती
बेतही नित्य नवे चालती.
वाटे विक्रम करुनि कीर्तितें वरुनी आणूं घरा
इंदिरा सकल सुखाचा झरा
सकल जगातें वदावयातें लावूं कीं हा खरा
जन्मला धन्य जगीं मोहरा ॥ चाल ॥

जातां बाल्य दशा ती दुरी
उलटा अनुभव येई परी

दुःख निराशा यांचा पगडा बैसे हृदयावरी ! ६

पुणें, जून १८९९.

---

## ५८. विरोधाभास.

" कालो न यातो वयमेव याताः "

भर्तृहरी

' पळे अद्य काळ हा पळभरी न कोठें ठरे '
सखे, वचन बोलसी मजसि तें गमेना खरें;
असेंच असतें तरी सुकति हीं न गात्रावली
सदा अचल काळ हा गति परी पुढें आपुली. १

गुलाब नव एकदां विकसले कपोलांवरी
विशाल तव लोचनीं चमकली तडित् साजिरी;

गुलाब चपला तशी सकल या क्षणीं लोपलीं
सदा अचल काळ हा गति परी पुढें आपुली. २

वदून मधुर स्वरें ' जिवलगे सखे सुंदरी । '
सुधा विपुल चाखिली स्थित तुझ्या सुबिंबाधरीं;
स्वरांत अधरांत वा मधुरता नसे राहिली
सदा अचल काळ हा गति परी पुढें आपुली. ३

अहा किति नवे नवे सतत बेत केले तरी
उदात्त किति कल्पना उपजल्या तदा अंतरीं;
स्मरे न मज या क्षणीं खचित एकहि त्यांतली
सदा अचल काळ हा गति परी पुढें आपुली. ४

रथांतुनि जरी कुणी बसुनि जाय बापांचियां
नद्या तरुलता गिरी पळति सर्व वाटे तयां
असे भ्रम समस्त हा फुकट दीन मोहीं पडे
न काळ पळतो कधीं मनुज मात्र जाई पुढें ! ५

प्रयाग, डिसेंबर १८९९.

## ५९. विसरलेलें गाणें.

( चाल–लाबाइला बेलाचें पान माझ्या महादेवाला )

दे शांति
    गान मनातें मधुर किती ?
दिनरजनी
    होतों गुंगत मी वदनीं,
हतभागी
    गेलों विसरून त्यालागीं,
बणवण मी
    संप्रति फिरतों वनभूमीं,
गिरिकुहरीं
    निर्झरवल्ली तरुनिकरीं,
मज न सुचे
    गीत परी तें हृदय खचे,
नीरसर्से
    जीवित गीताविण भासे,
स्मृति करुनि
    कवण तयाची दे फिरुनि ! १

प्रयाग, १७ जानेवारी, १९००.

## ६०. त्रिवेणी-संगम.

प्रयागास असतां हा संगम पाहून कवीला सुचलेले विचार त्यानें पद्यांत ग्रथित करून आपल्या पत्रांत पाठविले होते.

( चाल:-' सारे मजला म्हणतिल कीं ' )

हृदयंगम संगम, रमणी । धृ०

गंगा नाचे निर्मलनीरा
वाहे यमुना शांत गभीरा,
सरस्वती करि गुप्त विहारा
सरितात्रय गुंफी वेणी.

गंगेसमं तूं उत्साहानें
यमुना जैशी शांतपणानें,
सरस्वतीसम अनुपम मौनें
कर लोकीं सखये करणी. २

ब्रह्मा विष्णू महेश तीन्ही
सरितारूपें येती भुवनीं,
दर्शन त्यांचें व्हावें म्हणुनी
सुलभ जनां दिनरजनीं. ३

या वेणीचा प्रवाह मोठा
लाटां मागुनि गर्जती लाटा,

जणों वाजती घणघण घंटा
जन व्हावे जागे म्हणुनी. ४

या वेणीच्या विशाल पात्रीं
रमती जलचर किति दिनरात्रीं,
उरे तयांच्या पाप न गात्रीं
शोधितसे मलहारिणी. ५

तापपापहर दर्शन घ्यावें
या वेणीचें स्नान करावें,
भावें तिजला ध्यावें जावें
भवसागर वाटे तरुनी. ६

किती दिसे हें तीर मनोहर
धवल वालुका खुलते यावर,
मधुनी मधुनी चमके सुंदर
जणुं तारा निर्मल गगनीं. ७

नवनीताचें साम्य न साहे
स्पर्शें सुखवी मृदु सिकता हे,
चालूं जातां बिलगुनि राहे
बघ कैशी माझ्या चरणीं. ८

सिकतेसम या हृदय सखे तव
सदा असूं दे निर्मल पेलव,

सद्गुण तेजें चमको अभिनव
हृदया मम राहो धरुनी. ९

खिन्न मना तव रमवायातें
रचुनि धाडितों मी गीतातें,
विश्रांतीच्या समयीं यातें
वाच सदा प्रियकरणी. १०

प्रयाग, १९००.

---

## ६१. प्रश्नोत्तरमाला.

सूर्या, स्वयंप्रकाशा, प्रातःकाळीं कशास तूं येसी ?
जनहो, कर्तव्य करा, व्हा जागे, वचन हें वदायासी ! १

रंजितरंजनशीला चंद्रा, तूं क्षीण कासया होसी ?
देवासही चुकेना नीचोच्च दशा जगा कथायासी. २

बोला, नवग्रहांनो, कवण तुम्हां दावितो तरी पंथ ?
दिव्याशक्ति चिरंतन दृश्य न नयनास कल्पनातीत. ३

नक्षत्रांनो, बोला, कां तुम्ही चमकतां सदा गगनीं ?
स्वर्गाची वाट तुम्हां दावावी स्पष्ट कोणती म्हणुनी. ४

मेघांनो, भरुनि रिते वर्षाकालीं कशास हो होतां ?
कथण्या कीं द्रव्याचा संचय विनियोग दुर्दशा येतां. ५

कोठुनि वहात येतां, वायूंनो चालला कुठें त्वरित ?
स्वर्गींचा मर्त्यांना सांगुनि संदेश चाललों परत. ६

सुंदर हिमबिंदूंनो, कां येतां काय भूवरी आहे ?
चमकुनी पृथ्वीवर या स्वर्गा जनहो चला कथाया हें. ७

सांगाहो मजलागीं कुसुमांनो कासया तुम्ही फुलतां ?
सौंदर्याची तुम्हां मर्त्यांना कळविण्यास भंगुरता. ८

उठसी क्षणांत फुटसी कां सलिलीं लीन बुडबुड्या होसी ?
जें जें सृष्ट तयाची गति अंतीं यापरी वदायासी. ९

काळा, झरझर कोठें जासी पळुनी सदैव वद यातें ?
अक्षयता देवीच्या दिव्योज्वल मंदिरा पहायातें. १०

अक्षयते, असती तूं न कळे मज देवता तरी कोण ?
गत वर्तमान भावी कालाचीं माउली मला जाण. ११

प्रश्नोत्तरमाला ही वाचक हो, करितसे तुम्हां बोधा;
वस्तूंत गूढ असती ईशाचे भाव कायते शोधा. १२

प्रयाग, १९००.

## ६२. शरयू तटाक.

कवि अयोध्येस गेला असतां शरयूचें तटाक पाहून
त्याच्या मनांत आलेले विचार.

तट शरयूचें । हें किती मनोहर साचे । ध्रु०

रामपदांचा स्पर्श जहाला
सुवर्णता ये या सिकतेला
चमकुनि दिपवी मम नयनांला
तेज इयेचें । वर्णी फळ सत्संगाचें.

श्रीसीतेच्या चरणीं मृदुता
होय तदंशें कोमल सिकता
नवनीतासम लागे हाता
मार्दव हीचें । वर्णी फळ सत्संगाचें. २

स्नेह राघवीं अनुपम होता
लक्ष्मणजीचा माहित जगता
तो हा वाहे होउनि सरिता
रूप जल याचें । प्रक्षाली पाप जगाचें. ३

उदकांतिल या पाहुनि मीना
चिद्रूपातें वाटे मिळण्या

आली भाविक वानरसेना
मीनरूप हीचें । चिन्ह खरें भक्तिपथाचें. ४

स्नान जलाचें ध्यान जलाचें
अशन जलाचें शयन जलाचें
स्थल उत्पत्ति स्थिति विलयाचें
जलचि झषाचें । जल केवळ जीवन त्याचें. ५

रामपदास्थित गंगास्नान
निशिदिनीं रामपदाचें ध्यान
तत्पदरज हें केवळ अशन
तच्चरणांचें । शयन मला लाभे कैचें ! ६

उदकीं घेई मीन समाधि
घडतां तैशी राघव पादीं
जाईल विलया आधिव्याधि
भयहि भवाचें । बीज नुरे अज्ञानाचें. ७

दिव्यस्थल हें अक्षयतेचें
स्वरूप उज्वल चैतन्याचें
धाम सुमंगल आनंदाचें
स्फुरवी काव्या । माधवानुजाच्या वाचे. ८

प्रयाग, १९००.

## ६३. दीपविसर्जन.

एके दिवशीं संध्याकाळीं नर्मदा तटाकावर कांहीं मुली दिवे सोडीत होत्या; तो प्रसंग स्मरून खालील कविता लिहिली आहे.

करीं आरती घेउनी आर्यबाला
त्वरें पातल्या नर्मदेच्या तटाला;
करूनी तयांनीं सरित्पूजनाला
प्रवाहीं दिली सोडुनी दीपमाला. १

अहा काय शोभा वदूं त्या क्षणाची
तृषा शांत झाली मदीयेक्षणाची;
तदा अस्तगामी जरी अंशुमाली
मना वाटलें यामिनी काय झाली. २

सरित्पात्र तें स्वच्छ तैसें विशाल
तदा भासलें की दुजें अंतराल;
तती त्यावरी शोभली दीपिकांची
उदेली जणो पंक्ति कीं तारकांची. ३

जशी अंतरिक्षीं फिरे चंद्रकोर
प्रवाहीं करी रम्य नौकाविहार;
नभीं स्वैर संचारतो मेघखंड
जलीं खेळती वीचि तैशा उदंड. ४

अशी दिव्य शोभा पहातां पहातां
मनीं शांत झालें लया जाय चिंता;
झणी सूचली कल्पना एक चित्ता
असे सर्व सृष्टीस जी मूलभूता. ५

दिले सोडुनि दीप जे बालिकांनीं
दिला सारिखा वेग सर्वां तयांनीं;
तयांची स्थिती तत्क्षणीं भिन्न झाली
वरी दृश्य कोणी कुणी जाय खालीं. ६

कुणी गुंतुनी राहिले भोवऱ्यांत
जलौघासवें जाय कोणी वहात;
तयांतील कांहीं तटा अन्य गेले
पुढें जाउनी अल्प मागेंचि आले. ७

जसे दीप तैसे असंख्यात जीव
प्रभू निर्मितो थोर ज्याचा प्रभाव;
तया सोडुनी देत काल–प्रवाहीं
वहाती तदौघासवें सर्व देही. ८

कुणी रंक होई कुणी होय राजा
दुजा देखणा हो तिजा हीनतेजा;
कुणी मूर्ख होई कुणी हो शहाणा
कुणी धैर्यशाली तसा भ्याड जाणा. ९

तसें कां करावें ? असें मी करीन
वृथा वल्गना मानवांच्या अजाण;
स्थितीचा असे किंकर प्राणिमात्र
स्थिती त्या करी पात्र किंवा अपात्र. १०

जरी राहिलें नर्मदा तीर दूर
जरी आज बाला न दृष्टीसमोर;
स्मरोनी तरी दीपसर्गप्रसंग
क्षणी हर्षयोगें भरे अंतरंग. ११

प्रयाग, १९००.

---

## ६४. दोन ध्वनि.

प:—

प्रीती असे खचित फार परोपकारी
अन्यार्थ ती निजसुखावरि लाथ मारी;
अर्पी स्वकाय करण्यास सुखी परातें
दे स्वर्गरूप नरकाप्रति देवता ते. १

दु:—

स्वार्थापुढें तिज कधीं दुसरें दिसेना
साधावया निजहिता भुलवी परांना;
दु:खी परास बघुनी सुख होय तीस
स्वर्गाप्रती नरक ती बनवी उदास. २

प्रयाग, १९००.

---

## ६५ तुळस आणि सब्जा.

तुळसी, सब्जा झालीं वसुधा मातेस बालकें दोन;
होतीं सुरूप दोन्ही, नव्हतें कांहीं तयांमधीं ऊन. १

प्रेम सदोदित होतें वसुधेचें सारखें तयांवरतीं;
लालनपालन त्यांचें नियमें ती जाहली सदा करती. २

क्रमिलें बालपणातें दोघांही खेळखेळुनी नाना;
शैशव सरूनी गेलें प्रौढदशा पातली पुढें त्यांना. ३

जों झाली मोठी तों तुळशीचे पावले गुण विकास;
विनयवती शीलवती लवती पाहून सर्व जन तीस. ४

उज्वल तुलसी कीर्ति श्रवुनी वैकुंठनाथ कांनाहीं;
आला पहावयातें तिला बघणार देव कां नाहीं ? ५

सद्गुण तिचे बघोनी झाला आनंद देवरायातें;
विनवी तो वसुधेतें तुलसी युवतीप्रती वरायातें. ६

वसुधेच्या संमतिनें झाली ती दिव्य विष्णुची नवरी;
सद्गुणगणमंडित ती देवी तिज वासुदेव कां न वरी. ७

तेव्हांपासुनि तिजला प्रेमानें देव वागवी स्वशिरीं,
आहे म्हणुनी झाली इहपरलोकीं सदैव पूज्य खरी. ८

इकडे हळू हळू तो सब्जाही होत चालला मोठा;
प्राप्त जहालें यौवन आला त्यातें परी अती ताठा. ९

'सब् जा' ! 'सब् जा' ! ऐसें बोलुनि दर्पें जनांस धिक्कारी;
डोळां भुई दिसेना यौवनमद पातला तया भारी. १०

झाला अप्रिय सकलां अपुल्या उद्दाम वर्तनानें तो;
गर्व नसावा कोणा कारण नाशास तो जना नेतो. ११

सुज्ञ पुसेना कोणीं तुलसी भगिनी परी न ती मानी;
सेवा करी पिराची म्हणुनी मशिदींत दीन होवोनी. १२

या लोकीं जन पावे निज तेजें उच्चनीच पदवीतें;
रावाचा रंक बने रंकाचा राव आपुल्या हातें. १३

१९००.

---

## ६६. सांत्वन.

कवीचें प्रियबालक वारलें त्या प्रसंगीं त्यानें आपल्या दुःखाकुल पत्नीस केलेला उपदेश.

प्रियकरे, रडशील किती तरी
कर विवेक जरा हृदयांतरीं;
प्रिय जरी तुज बालक तें अति
रडुनि का परते वद संप्रति ? १

उगवतां गगनीं नव चंद्रिका
मुदित हो मन पाहुनि ती न कां;

क्षणभरें मग जाय लयाप्रति
रडुनि काय पुनः परतेल ती ! २

चमकतां चपला बहु चंचला
कवण हर्षभरें न बघे तिला ?
झडकरी परि जाय लया द्युति
रडुनि काय पुनः परतेल ती ! ३

सुचतसे कवितें नव कल्पना
विपुल होय तदा सुख तन्मना;
क्षणभरें न उरे जरि तत्स्मृति
रडुनि काय पुनः परतेल ती ! ४

उमलतां कलिका लतिकेवरी
मधुर रूप तिचें नयना हरी;
विकसुनी सुकली जर मागुती
रडुनि काय पुनः फुलणार ती ! ५

बहुत सुंदर जें असतें तया
स्थिरपणा असणार कुठूनिया ?
नच करी स्थिर सुंदर संगती
रडुनि काय बरें घडणार ती ! ६

असुनि सुंदर अल्प बरें जिणें
नच कुरूपपणें बहु वांचणें;

समजतो तुज भाग्यवती सती.
प्रसवलीस अशी रुचिराकृति. ७

मृदु मना तव होय जरी क्षति
करुनि शोक कशी भरणार ती ?
प्रभु भिषग्वर गे सखये सुधी
स्तव तया तुज देइल औषधी. ८

कल्याण, १९००.

---

## ६७. प्रियेचे अश्रू.

अश्रु हे किती तरी रमणीय, यांस पाहून मना सुख होय;
प्रीतिचा खवळला तव सिंधु, स्पष्ट दाविती सखे जलबिंदु. १

प्रीति सत्य नसतां हृदयांत, कोठुनी जळ निघे नयनांत ?
प्रीति अश्रुजननी मज वाटे, दाटतां जलमिषें उर फाटे. २

अश्रु दुःख तव हे कथितातो, सुंदरी मज परी सुख देती;
प्रीतिची उलट ही बघ रीति, भिन्नभाव हृदयीं उठवी ती. ३

अश्रुंनो ! स्थिर रहा नयनीं या, चाललां त्वरित कां गळुनीया;
कामिनी नयन कंज दलाचीं, संगति प्रिय तुम्हां नच कैची ? ४

दिव्य शक्ति तुमची समजे मी, टाकितां सहज मारुनी कामी;
कोणता प्रणयि जो नच कांचे, अश्रु चारु बघतां ललनेचे ? ५

प्रीतिमुग्ध असतो जन कामी, दूषितो म्हणवुनी न तयां मी;
जे परी गतविकार महंत, तेहि पाहुनि तुम्हां द्रवतात. ६

स्फूर्तिदान करुनि बहु दिव्य, सांगतां कविस या नव काव्य;
भाग्य त्यास अनुकूळ न झालें, ज्यांस साह्य तुमचें न मिळालें. ७

अश्रुंनो ! स्थिर रहा नयनीं या, चाललां त्वरित कां पळुनीयां;
हाय हाय ! परि अश्रु गळाले, स्फूर्ति सर्व मम घेउनि गेले. ८

अश्रूंस या घन जरी करण्यास येतें,
मातें अहा ! विपुल सौख्य सदैव होतें;
गुंफूनि अश्रुमणिंचा मग रम्य हार,
कंठांत घालुनि तया कारितों विहार ! ९

---

## ६८. स्मशानगीत.

स्मशानांत रात्रीं आठ वाजण्याच्या सुमारास कदि एका लहान मृत बालकास आपल्या हातांतून खणलेल्या खाचेंत ठेवून मातीआड करण्याचे बेतांत आहे अशा वेळेस त्याच्या मनांत आलेले विचार.

या क्रूर माझिया हातीं
लोटितों तुझ्यावर माती;
दगडाची करूनी छाती
शिशुवरा ! १

ये चंद्र नभीं उदयातें
स्पर्शितसे तुझिया तनुतें;
परि शक्त न उठवूं तूतें
प्रियकरा ! २

हा रम्य वाहतो वारा
बहु हलवी तव कचभारा;
परि उठवी तव न शरीरा
प्रियकरा ! ३

मी येथ गातसे गाना
काढुनिया भेसुर ताना;
परि शके न घालूं प्राणा
प्रियकरा ! ४

लय होता चैतन्याचा
या चंद्र मरुद्गानांचा;
उपयोग न होई साचा
प्रियकरा ! ५

हे अश्रु टपाटप खालीं
गळतात शुष्क तव गालीं;
यांहीं तुज न्हाऊं घालीं
शिशुवरा ! ६

कर जो जो बा अंगाई
चिरकालिक निद्रा घेई;
भय तुजला उरलें नाहीं
प्रियकरा ! ७

जातों मी अपुल्या ठाया
यम येइल तेव्हां न्याया;
येईन तुला भेटाया
प्रियकरा ! ८

कल्याण, १९००.

---

## ६९. अळ्यावरचें पाणी.

( चालः—कसें मी मारूं । माझें नवलाचें पाखरूं )

धरीरे ध्यानीं । जग अळवावरचें पाणी ॥ धृ० ॥

पडतां पत्रीं बिंदु जलाचा
मुक्ताफलसम शोभे साचा;
मनुजा उपजे लोभ तयाचा
जाय भुलूनी. १

सुंदर किति हें दिसतें मोतीं !
घेइन ऐसें चिंतुनि चित्तीं;

जातां त्यातें धरण्या हातीं
जाय फुटूनी. २

मोहक चंचल कण सलिलाचे
जीवित तैसें नश्वर साचें,
होइल केव्हां हरण तयाचें
ये न कळूनी. ३

मिथ्या सारा जागिक पसारा
दुःखें भरला न सुखा थारा,
मोह घालिती धनसुतदारा
सत्य न मानी. ४

दिव्य चिरंतन सुख जें त्यातें
निशिदिनिं झट तं मिळवायातें,
जाउं नको त्या ईशपदातें
क्षण विसरूनी. ५

पडघवली.

---

## ७०. नामलेख.

हिंडतां सहज सागरतीरीं
लाधली मजासि शिंप रुपेरी,

तीस घेउनि करीं लिहिलें मी
आत्मनाम सिकतेवर नामी. १

राहिलों मग जरा जलधीची
कांति देखत मनोहर साची,
लाट एक इतुक्यांत निघाली
अक्षरें धुवुनि ने लिहिलेलीं. २

अब्धिची अदय देखुनि लीला
जाहलें विपुल दुःख मनाला,
दूषिलें कटुवचें बहु त्याला
मानसीं क्षण विवेक न केला. ३

वीचि वारिधि पुन्हा वर फेंकी
योग्य बोध मजला करण्या कीं—
" दुःख सोड, मनुजा सकलांची
शेवटीं स्थिति अशी घडण्याची. ४

काल सागर भयंकर फार
गर्जतो निशिदिनीं अनिवार,
फेंकुनी अपुलिया लहरीतें
जें दिसे त्वरित सर्व हरी तें. ५

नांव गांव तव सद्म शरीर
सर्व जाइल लयास अखेर,

[stamp]

जें असे उघड नश्वर त्याचा
मानसी वद विषाद कशाचा " ? ६

दिव्य बोध किति हा जलधीचा !
घेउनी समजुनी मनिं साचा,
जो जगांत निज वर्तन ठेवी
दुःख त्यास कुठुनी भय दावी ? ७

मुंबई, मे १९००.

---

## ७१. फुलांचा झेला.

एका पौर्णिमेच्या रात्रीं उद्यानांत फिरत असतां कवि आपल्या पत्नीस म्हणतो.

फुलला बघ हा गुलाब सुंदर उद्यानाचा प्राण
इंदुकरांहीं खुलला न भुले पाहुनि याला कोण ? १

लाजवील हा निजसौंदर्यें रतिच्या रक्त कपोला
सुजनां जैसे नीच पीडिती कठोर कंटक याला ! २

किंवा जैसें जगीं वेष्टितें दुःख सदा सौख्याला
तैसे कंटक वेष्टुनि बसले कांते ! या कुसुमाला. ३

व्हावा तुज हा जरी सुंदरी स्वशिरीं घालायातें
रुतले कंटक करांस कोमल सोस तरी तूं त्यातें. ४

मंदमंद किति सौरभ सोडी निर्मल हा निशिगंध
पसरुनि वदना अमृत करांतें सेवितसे स्वच्छंद. ५

लावुनि गगनाकडे स्वदृष्टी शांतपणें वर जाई
सरल सदोदित वाट वाकडी माहित यातें नाहीं. ६

निशिगंधासम सरल जगीं या मनुज जरी वागेल ?
मोक्ष तयाला मिळावयाला विलंब का लागेल ? ७

पहा मोगरा वळुनि जरा हा डुलतो कलिकाभारें
फुलविति याच्या गोंडस गेंदा स्पर्शुनि चंचल वारे. ८

प्रिये पाकळ्या पहा कशा ह्या कथिती गोष्ट हिताची
परस्परांतें बिलगुनि शोभा वाढविती कुसुमाची. ९

इतुक्या प्रेमें परस्परांशीं वर्तन होय नराचें
तरी सुखा मग काय कमी त्या ? दुःख उरे ना साचें १०

पुष्पवती ही सदाफुलीची वेल मनातें मोही
विनयवतीला पाहुनि ऐशा मुग्ध न कां कवि होई. ११

या लतिकेचें पुष्प दाखवी रंग तीन बहु रम्य
प्रथम पांढरें लाल मागुनी अंतीं मिश्र अगम्य. १२

प्रिये ! इंदिरे ! प्रेम असावें तुझें असें मजवरती
निर्मल आधीं रक्त मागुती अगम्य केवळ अंतीं. १३

चार फुलांचा रचुनी झेला करितो केशाभरण
जातिल माल्यें सुकून त्यांचें ठेव परी तूं स्मरण. १४

सुमनांसम या मानस अपुलें सखये ठेवित जाई
सरळ सहिष्णू सहानुभूतिक सत्प्रेमल सुखदायी ! १५

कल्याण, १९००.

## ७२. भगवद्गीता.

ज्यांचीं रम्य शिरें नभा कवळिती उत्तुंग ऐसे गिरी
विस्तारें निज भूमिभाग तटिनी ज्या टाकिती व्यापुनी;
नाना घोरवनें किती उपवनें यां पाहिलीं लोचनीं
पक्षीही रमणीय कर्णमधुरा ज्यांची असे वैखरी. १

तैसे देश अनेक आज चढले जे वैभवाचे शिरीं
केला वादविवाद सुज्ञ नर जे त्यांशीं वृथा गर्जुनी;
औत्सुक्यें बहु पुस्तकें मिळवुनी तीं पाहिलीं वाचुनि
नाहीं शांति परी खरी उपजली या माझिया अंतरीं. २

जैसा मीन जळाविणें तळमळे तैसा जळे मीं मनीं
कांहींही न रुचे जगांत जगणें वाटे नकोसें मला,
तों दैवें मज लाधली भगवती गीता तमोनाशिनी
जींतें अभ्यसितां शमे तळमळी आत्मा वरी शांतिला ३

आत्मज्ञान तुझ्यांत दिव्य भरलें गीते ! मुनिप्रेरिते
लाखांहीं लुटिलें तरी तव कधीं भांडार नाहीं रितें. ! ४

कल्याण, १९००.

---

## ७३. थिऑसफिकल सोसायटी.

वरील नांवानें आज काल प्रसिद्ध असणारी तत्वविवेचक मंडळी
ही कोण आहे व हिचे उद्देश काय आहेत, हें खालील
पद्यांत स्थूल मानानें वर्णिलें आहे.

कामधेनु जी चालत आली जनहो तुमच्या घरीं
नका ती हांकुनि लावूं दुरी ॥ ध्रु० ॥

नित्य सुखाचा लाभ व्हावया मानव यत्नां करी
भोगितो दुःखें नाना परी,
स्वार्थपरायण कपटपटूंच्या लागुनि नादीं फसे
तयाला मार्ग न बरवा दिसे,
मिळेल का मज कधीं सद्गुरू चिंतुनि ऐसें मनीं
झुरतसे दुःखें रात्रंदिनीं ॥ चाल ॥
ऐशा आर्त जहाल्या जना
सुखाचा मार्ग खरा दाविण्या
थिऑसफीची नम्र मंडळी प्रेमे साह्या करी. १

संघ रचावा विश्व बंधुता—भाववर्धना जनीं
भेद ते उच्चनीच विसरुनी,

तुलनात्मक अध्ययन करावें परधर्मीचें नरें
तयांतुन वेंचुनि घ्यावें खरें,
गूढ शक्ति ज्या वसती विश्वीं तैशा मानव मनीं
तयांतें काढावें शोधुनी ॥ चाल ॥
तीन हे हेतु पुढें ठेवुनी
मंडळी कार्य करी या जनीं
आद्य हेतु ज्या मान्य जहाला प्रेमें त्या स्वीकरी. २

कल्याण, १९०१.

---

## ७४. जादूचा प्रभाव.

### श्लोक.

हातीं पुस्तक घेउनि भटकतां एक्यादिनीं काननीं
बाला एक मनोरमा लवकरी माझ्यापुढें पातली;
प्रेमानें अवलोकुनी मम मुखा गालांमधीं हांसली
बोले गूढ वचांस ती करतला वेगें झणीं फुंकुनी. १

नाहीं अर्थ मला जरी समजला तत्भाषणाचा मुळीं
त्याचा अंमल बैसला मजवरी तत्काल जादूपरी;
वाचा बंद पडे उरीं धडधडे चिंता जडे अंतरीं
चेष्टाहीन सुदीन निश्चल उभा मी टाकलों त्या स्थलीं. २

वेणींतील तिनें फुलें झडकरी माझ्याकडे फेंकिलीं
झाली आपण तेथुनी न कळतां अंतर्हिता सत्वरी;
झालों मी पुरता भ्रमिष्ट कुसुमा मोदास त्या सेवुनी
तेव्हांपासुनि लागलों भटकण्या वेड्यापरी भूतलीं. ३

स्वच्छंदें फिरतों सदैव वदुनी गुंगींत कांहीं तरी
अन्या मूर्ति न चेटकीविण कधीं त्या येतसे मन्मनीं. ४

१९००.

## ७९. गुरांचा वाडा.

प्रसंग आतां दारुण आला
दुर्दैवानें घालुनि घाला,
संसाराचा नाशचि केला
काय करूं देवा ! १

पूर्वीं गोठा भरला होता
मजासि गोधना तोटा नव्हता,
उदासीनता परि ये आतां
सहसा या लागीं. २

तृण सेवोनी दिनभर रानीं
संगे वत्सा निज घेवोनी,

अनेक धेनू मग येवोनी
वसल्या या गोष्टीं. ३

बलीवर्द ते कितिक मनोहर
शेतामध्यें श्रमुनी दिनभर,
घ्याया विश्रांतीतें सुखकर
आले या ठाया. ४

भक्षायातें तृण न मिळोनी
कळप गुरांचा गेला मरुनी
दुष्काळानें नेली हरुनी
माझी संपत्ति. ५

गोठा आतां उघडुं कशाला
स्थिति दे त्याची दुःख मनाला,
म्हणुनि लावितों मी द्वाराला
आतां या स्वकरें. ६

दुष्काळांतुन पार पडोनी
येतां शक्ति द्रव्य मिळोनी,
सुंदर गोगण मग आणोनी
बांधिन आनंदें. ७

## ७६. अंबा नदीच्या तीरावर.

या तीरावर कवि गेला असतां त्याला तेथें आपल्या
प्रिय मित्राबरोबर केलेल्या क्रीडांची व अनु-
भवलेल्या सुखाची आठवण झाली.

तव तीर मनोहर होतें, हाय परी क्लेशा देतें
या क्षणीं !
पुलिनीं तव केल्या केली, स्वच्छंदें वेळोवेळीं
येवुनी.
विसरलों देहभानाला, अंबे तव मधुगानाला
सेवुंनी.
स्मरतां त्या मंगल काला, दुःखाचा येत उमाळा
मन्मनीं.
नयनांत । अश्रुजल येत । अंधही होत ।
दृष्टि मम सारी
जडतां ये सर्व शरीरीं
या क्षणीं.

मत्सखा गुणांचा ठेवा, होता मत्प्राण विसावा
या जनीं !
किंति रम्य वदन तें त्याचें, फुललें जणुं सारस साचें
जीवनीं.

ती मोहक उज्वल दृष्टि, करितसे सुधेची वृष्टि
त्या क्षणीं.
ती प्रेमल मधुरा वाणी, स्नेहाची गमली खाणी
त्या क्षणीं.
ती मूर्ति । सर्व सुख पूर्ति । देतसे स्फूर्ति ।
गान मज गाया
लावितसे हाय रडाया
त्या क्षणीं. २.

जल संचय सरतां सारा, सरसता जाय कासारा
सोडुनी.
वीणेच्या तुटतां तारा, ध्वनितें मग तेथें थारा
कोठुनी ?
अस्तंगत होतां तरणी, अंधकार टाकी धरणी
व्यापुनी.
सत्प्रेम लयाला जाई, शून्यता अहा ये हृदयीं
त्या जणीं
मत्प्राण । दुजा कीं जाण । मित्र त्यावीण ।
शून्य तट भासे
सोडिलें मला उल्हासें
या जनीं. ३.

कल्याण, १९०१.

## ७७. खंडाळ्याचा घाट.

पर्जन्यकाळीं या घाटांत सृष्टि सौंदर्याचा देखावा फारच रमणीय दिसतो या दिवसांत पुणें-मुंबईहून जातां येतांनां गाडी घाटांत आल्यावर हा देखावा पाहून मन तल्लीन होऊन जातें.

हा किती मनोहर घाट। स्वभाव कृतीचा येथें थाट ॥ धृ० ॥

दों बाजूंनीं सह्याद्रीचे विशाल तुटले कडे
पाहुनी हृदय धडाडा उडे.

जिकडे तिकडे घोर मातलीं भयाण झाडें झुडपें
बघतां ऊर नराचा दडपे.

धो धो धो धो कड्यावरूनी गर्जत येती ओढे
बघाया चित्त तयाचें ओढे.

क्रूर पशूंची घोर गर्जना रात्रंदिवसां चाले
ऐकतां शरीर थरथर हाले. १

बिकट फोडुनी घाट नेटकी वाट असे काढिली
चतुरता आंग्लप्रभूची भली.

फों फों फों फो 'आगिनगाडी' सोंसावे यांतुनी
खळेना पळही रात्रंदिनीं.

घोडे बैला वांचुनि धांवे वाफ भरारा किती
पाहुनी गुंगे माझी मति

अद्भुत कामें करी मानवी बुद्धि विशाला असे.
तियेला दुष्कर कांहीं नसे. २

चिंताग्नीनें चित्त जयाचें गेलें पोळुनी अती
जयातें शांति नसे माहिती,
नाना दुःखें निशिदिनि ज्यातें क्रूरपणें पीडिती
जयातें सौख्य न लाभे रति,
विश्वचमत्कृति पहावयाची इच्छा ज्याच्या मनीं
स्थलीं या यावें त्यानें झणीं;
हरतिल चिंता, विरतिल दुःखें होइल इच्छा पुरी
मानसीं शांति प्रकटे खरी. ३

२० आगष्ट, १९०१.

---

## ७८. अशोक वृक्षास पाहून सुचलेले विचार.

वृक्षा तुला पाहुनि या प्रसंगीं विचार येती बहु अंतरंगीं,
आहेत सृष्टींत तरू अपार तयांत तूं केवळ एक थोर. १

छाया तुझी शीतळ सांद्र भारी पुष्पें तुझीं लोचनसौख्यकारी,
देतों तुला मी म्हणुनी न मान तूं मूकरामायण सत्य जाण. २

लंकापती रावण मत्त झाला नीती अनीती समजे न त्याला,
तयार झाला कुल संहराया बळें पराची पळवून जाया. ३

साध्वी सुशीला सुकुमार सीता सोडूनी सद्मीं रघुवीर जातां,
आणावया हेम मृगा धरूनी ने जानकीतें खळ तो हरूनी ४

आणून ठेवी मग तीस मत्त वृक्षा तुझ्या प्रेमळ संगतींत,
हा मर्मभेदी इतिहास चित्ता स्मरे तुला वृक्षवरा पहातां. ५

स्वनाथ–पादांबुज–चित्त–लग्ना एकाकिनी शोकसरोतिमग्ना,
सीता सती कंठित काळ होती वृक्षा तुझी फार सहानुभूती. ६

टाकूनि हर्षे कलिकांस खालीं त्या जानकीची जपमाळ केली.
तीतें करीं घेउनि दीन रामा रामा जपे संत मनोभिरामा. ७

होतां श्रमे विव्हळ गात्रयष्टी केली तुवां कोमल पुष्पवृष्टी,
शय्या सतीला दिधली रचून परोपकारीं असशी निमग्न. ८

अशा रितीनें बहु काळ लोटे सीता रडे नाथ परी न भेटे,
उल्लंघुनी दुस्तर सागराला ये राम तों सांगत दूत आला. ९

विध्वंसुनी दुष्ट दशाननाला भेटे अयोध्यापति जानकीला,
करी तिला शांतवुनी अशोका स्वन्नाम हो सार्थ खरें अशोका. १०

लंका जधीं सोडुनि जाय सीता मनीं तिच्या जो अनुराग होता,
तुझ्यावरी ठेउनि सर्व गेली पुष्पें गमे लाल म्हणून झालीं. ११

प्रचंड झाला रघुरावणाचा संग्राम विख्यात जगांत साचा,
रचूनि रामायण वाल्मिकीनें वर्णीयला तो, वदती पुराणें. १२

गेलीं पुराणें सगळीं लयाला रामायणाचा जरि नाश झाला,
स्मरेल ती वीर कथा अशोका त्वद्दर्शनें केवळ सर्व लोकां. १३

१९००.

---

## ७९. वनवास.

( चाल:—राम स्मरावा राम. )

रम्य किती वनवास खरोखर रम्य किती वनवास ॥ ध्रु ॥
क्रूरा चिंता या हृदयातें देति न येथें त्रास
नीच विकारा न मिळे थारा चित्त न होय उदास
सुखविती कर्णा खगवर गाउनि मंजुळ संगीतांस
शीतळ छाया देउनि हरती तरु रवि संतापास
तुष्टि पावते दृष्टि देखुनी गगनीं मेघ विलास
हो सुख सेवुनि वन्य लतांच्या चारु फुलांचा वास
परिमळपूरित मारुत वाहे शांत करी गात्रांस
सुखें लाधती सहज मला हीं सुलभ न जीं धनिकास
वाटे येथें गावें भावें ध्यावें भगवंतास । खरोखर ॥ ध्रु० ॥

१९०१.

---

## ८०. कवि आणि कोकिळ.

" गाऊं नको कर पुरें तव दिव्य गान
जा येथुनी कविवरा विपिनीं निघून;
येणार काय तव दिव्य कवित्व कामा ?
कां कंठ शोषविसि तूं अपुला रिकामा ? १

बैसून कोकिल मनोहर आम्रवृक्षीं
गाणें म्हणे तुजहुनी रमणीय लक्षीं; "
ऐकूनि हें वचन खिन्न मनांत झाला
गेला कवि त्यजुनि निष्ठुर या जगाला. २

कर्णीं पडे न मग कूजित कोकिलाचें
झालें समस्त जग गानविहीन साचें;
गाणार तो पिक कसा मतिहीन दीन
जो नित्य गीत कवि पासुनि घे शिकून. ३

आलें महत्व कविचें कळुनी जगाला
दुःखें तदा हळहळे अनुताप झाला;
अन्वेषिलें बहु परी कवि तो न भेटे
अंधार घोर पसरे जग शून्य वाटे. ४

१९०२.

## ८१. मूर्तिभंजन.

गेलों एकदिनीं स्वयें उपवनीं आणावया वेंचुनी
माल्यें मंगल भक्तिनें प्रभुवरा अर्पावया पूजनीं;
कांहीं लाल निळीं तयांत पिंवळीं कांहीं तशीं श्वेतही
दूर्वा बिल्वदळें पवित्र तुळसी घेऊनि आलों गृहीं. १

गेलों देवघरांत पूजनविधी भावें कराया झणीं
बैसें आसन घालुनी मन बळें एकाग्रते आणुनी;
मूर्ती तों सहसा उपास्य मम ती भंगूनि गेली पुरी
कैचें पूजन ? शून्यता सभयता माझ्या भरे अंतरीं. २

गेलों घाबरुनी सुचे न मजला तेव्हां करावें कसें
चित्ताची समता समग्र ढळली तें होय वेडें पिसें;
केला कोप असा कसा मजवरी देवें कळेना मला—
ऐसें मी वदलों ध्वनि प्रकट तों मूर्तींतुनी जाहला. ३

" आकारास वृथा भुलूनि रडसी मूढा कशाला बरें ?
नाहीं शाश्वत नामरूप अवघें जाणें लयाला त्वरें;
जें चैतन्य चराचरीं विलसतें पूजी तया शोधुनी
आहे निश्चल, पूर्ण, अव्यय, खरें, तें ऐकलें या जनीं. ४

राहे तें हृदयांतही तव, न कां त्या पाहसी शोधुनी "
ऐसी जागृति देउनी मम मना तो लीन झाला ध्वनी;

आत्माराम कसा दिसेल मजला हा मंत्र रात्रंदिनीं
माला घेउनि मी करीं जपतसें भावें मनापासुनी. ६

कल्याण, १० आगष्ट १९०४.

## ८२. मराठी ग्रंथकरांचें संमेलन.

चलाहो जाऊं । सारस्वत मंडल पाहूं ॥ ध्रु० ॥

वसंत ऋतु हा सुंदर आला
यौवनभर ये तरुलतिकांला
प्रेमें मोहित कोकिल झाला
लागला गाऊं. १

सद्विद्येच्या क्रीडास्थाना
पुण्यपत्तना येतिल नाना
विद्वद्रत्नें वंदुनि त्यांना
शांतिस लाहूं. २

अहंभावना सांडुनि बोलूं
परस्पराशीं, हृदयें खोलूं
विचार रत्नें हर्षें झेलूं
मनीं त्या ध्याऊं. ३

सरस्वतीचा उत्सव करुनी
नम्र आपुली जी जी करणी

अर्पुनि भावें तीच्या चरणीं
तियेतें सेवूं. ४

महापर्वणी आनंदाची
नका घालवूं आली साची
विनंति इतुकी कविदासाची
संमत होऊं. ५

---

## ८३. वनभोजन.

ज्ञात विषयांचें चित्र मनोहर काढावें वाटतें
परी हें दुखें मन दाटतें । ध्रु०

एके दिवशीं मित्र जिवाचे मिळुनी सगळेजण
कराया गेलों वनभोजन.

मंगलकारक उषा अहा ती रम्य वसंतांतली
यौवनें वनदेवी मातली.

कुसुमित कोमल सुंदर वल्ली तरुसंगें रंगती
गानीं मंजुल पिक दंगती ॥ चाल ॥
आला आम्रांतें मोहर
येई करवंदाचा भार
गोड तोरणें घोसदार तीं सेवन केलीं पथें. १

जातां जातां जीर्ण शिवालय दिसलें एक्या स्थलीं
मागुनी निर्झरणी चालली
स्फटिक विमल त्या जलीं करोनी गात्रप्रक्षालना
लागलों शिवगिरिजापूजना.

नादब्रह्मद्योतक घंटा वाजवुनी पाहिली
शिवातें बिल्वदळें वाहिलीं ॥ चाल ॥
रजतमसत्वाचा देह हा
प्रभूच्या चरणीं त्यातें वहा
रहस्य आम्हां सुचवित होतीं त्रिदळें माझ्या मतें. २

विविध मजेच्या कथुनि कथांतें सारियलें भोजना
क्षणीं त्या दुःख न शिवलें मना.
याच दिनीं या स्थलींच येऊं आपण सारे पुन्हां
आणिली मित्रानें सूचना.
उत्तम उत्तम म्हणुनि तयातें वेगें अनुमोदिलें
विचारा स्थान न हृदयीं दिलें ॥ चाल ॥
आलों सायंकाळीं घरीं
चिंतित तोंच विषय अंतरीं
शुभ दिवसाची वाट जहालों औत्सुक्यें पाहते. ३

दिवसा मागुनि मास लोटले वर्षहि सरलें जरी
पुन्हां तो योग न जुळला परी.

कांहीं मेले कांहीं गेले निघुनी चौंहींकडे
स्थितीचे दास मित्र बापुडे.

मागें तैसें करीन फिरुनी व्यर्थ मनाची उडी
पुन्हा नच परते गेली घडी ॥ चाल ॥
लिहितो काळ आपुल्या करीं
शब्द हे सकलहि वस्तूंवरी
' पुन्हा न परते ' वाचुनि दुःखें हृदय अहा फाटतें ! ४

जगीं मानवा प्रभुवर देई सारे एकेकदां
परतलें बाल्य कधीं कां वदा ?
तारुण्याचा बहर एकदां येउनि जाई दुरी
परत तो काय कधीं ये तरी ?
प्रेमग्रंथी जी पहिल्यानें जुळते तीची सरी ॥
पुढें मग होते काहो तरी ? ॥ चाल ॥
होतसे भाग्योदय एकदां
तयातें उपभोगावें तदा
' पुन्हा न परते ' वचन विसरतां अनुतापा लावितें. ५

२० ऑगस्ट, १९०५.

## ८४. नवीन वधुवरांचें स्वागत.

आज मंगल गमे दिन फार
' मार्ग–शीर्ष महिना ' गुरु'–वार;
येइ आर्यभगिनी नव धामीं
' स्वागतास ' करितों तव आम्ही. १

' दादा ' सत्वगुणी सुवृत्त अमुचे धर्मीं तयांची रति
तूंही शीलवती तशी कुलवती ज्ञानार्जनीं त्वन्मति;
झाली वंद्य जशी जगा निजगुणें सीता प्रियाही धवा
तैशी होउनि तूं कृतार्थ अमुच्या आर्ये करी बांधवा. २

सद्मीं आजवरी सुखांत बसलों एक्यांच चौघेजण
केलें प्रेम परस्परीं दुखविलें नाहीं कुणाचें मन;
प्रेमीं त्या भर घालुनी सुभगिनी आम्हां सदा वागवी
केव्हांही न शिवो विकल्प तुजला शांतीस जो नागवी. ३

होतां आजवरी तुम्हीं रत सदा सद्ब्रह्मचर्यव्रती
संसारी बनलांत आज इथुनि नांदा सुखें दंपती;
हो ' दादा वहिनी ' तुम्हांस करितों ही प्रार्थना संप्रति
राहूं द्या तुमच्या सदैव हृदयीं ' धर्मालयाची ' स्मृति. ४

उभयतां तुम्ही आजपासुनी
' धर्मकार्य ' हें व्रत धरा मनीं;

' लग्न लाविलें धर्म जीवना '
धर्मवर्तनें दाखवा जनां. ९

कल्याण, १९०७ ( मार्गशीर्ष शु० ४ शके १८२७. )

---

## ८५. पलीकडे काय आहे ?

गुरुशिष्यसंवाद.

' समोर येथुन भव्य टेकडी नयना दूर दिसे जी
पैल तियेच्या वसे काय तें सांगा मजसी गुरूजी. ' १

' दरी भयंकर असे विशाला शोभित तरुलति कांहीं
स्वच्छ जलाचा निर्झर तींतुनि झुळझुळ वाहत जाई. ' २

' असे दरीच्या पुढें काय तें कथन करावें मातें
उत्सुक झालों वचन आपुलें गुरुजी परिसायातें. ' ३

' नदी मनोहर, सुंदर नगरी, पुढती पर्वत अन्य
पुढें तयाच्या दलदल मोठी विशाल सागर रम्य. ' ४

' या सर्वांच्या पुढतीं पुढतीं काय दिसे नवलाई ? '
' भूमिजलाचीं भिन्न भिन्नही रूपें अन्य न कांहीं ! ' ५

' जन्मापासुनि पहावयाचें हेंच काय नयनांहीं !
सुगम दिव्यतर याहुनि दुसरें काय गुरूजी नाहीं ? ६

‘ सोड निराशा कथितों तुजला उत्तम दिव्यस्थान
पहा दिसतसे पूर्व दिशेला सुंदर तत्सोपान. ७

अन्य सोडुनि विषय तयाचें कर तूं हृदयीं ध्यान
क्रमाक्रमानें परंपरेचें होईल तूंतें ज्ञान.’ ८

‘ असे बिकट तो काय चढाया उंच असे का फार ?
आतां किंवा वृद्धपणीं मी करुं तेथें संचार ?’ ९

‘ गगनस्पर्शी उंच जरी तो वरही अनघड जाया
भेसुर त्याचें रूप पाहुनी भिऊं नको तूं वांया. १०

आतांपासुनि चढावयाला कर बाळा सुरवात
कांहीं काळें दिसेल तूंतें दिव्य चिरंतन ज्योत. ११

जोतिर्दर्शन घडतां जाइल नश्वर तनु तव गळुनी
दिव्य सनातन चैतन्याशीं जाशिल तूंही मिळुनी !’ १२

कल्याण, ११ जुलई, १९०६.

## ८६. चिमणी.

बघ बघ बाळा वळुनी इकडे लौकर ओटी खालीं
चतुर चिमुकली चिमणी तुजला भेटायातें आली. १

गोड गोडसें पहा गातसे ‘ चिंव् चिंव् चिंव् चिंव् ’ गाणें
बागडते ही उडते फिरुनी पडते आनंदानें. २

प्रयत्न करुनी सदा मिळविते अपुल्याही अन्नाशीं
पोटासाठीं भीक न मागे केव्हां कोणापाशीं. ३

मातीमध्यें इकडे तिकडे पडले सुंदर दाणे
कसे वेंचुनी ध्यावे त्यांतें हींच बरोबर जाणें. ४

पहा पहा ही भुर्र उडाली करुनी अपुलें काम
बसेल आतां घरट्यामध्यें उपभोगित विश्राम. ५

चिमणीपासुनी शिकुनी घे घे बाळा तूं आनंद
रडणें कढणें सोडुनि देईं भलता सलता छंद. ६

दाणे जैसे वेंचुनि खाते चिमणी चातुर्यानें
शोधुनि सेवीं ज्ञानकणा तूं भरले जे अज्ञानें. ७

परावलंबी नको कधींही होऊं गेल्या प्राण
परावलंबी जिणें त्याहुनी बरवें मरणाचि जाण. ८

आनंदाची, स्वातंत्र्याची, ज्ञानाची तूं मूर्ति
होशिल जेव्हां, तुझी चिरंतन राहिल लोकीं कीर्ति. ९

या लोकींच्या कर्तव्यातें करुनी बाळा अंतीं
चिमणी गेली तैसा तूंही सेवाया जा शांती. १०

कल्याण.

## ८७. दिवाळीचा सण.

( चाल—जाऊं कामाला० )

आली दिपवाळी, गड्यानों, आली दिपवाळी ॥ धृ० ॥

रोज रोज शाळा, पुरे ती आला कंटाळा
चार दिवस आतां, मनाला कसली ना चिंता
उडूं बागडूं जशीं पाखरें स्वैर अंतराळीं. १

मौजेनें न्हाऊं, कपाळीं लाल गंध लावूं
अलंकार लेवूं, करोनी थाटमाट जेवूं
लाडु करंज्या शंकरपाळे खाऊं कडबोळीं. २

खेळ गडी नाना, जमवुनि खेळूं खेळांना
बांधुनिया किल्ले, करूंया त्यांवरती हल्ले
भावी पुरुषार्थाचे, कित्ते गिरवूं या काळीं. ३

नळे चंद्रज्योती, फटाके फुलबाज्या वाती
दारु काम सोडूं, धडाधड बार नवे काढूं
उडवूं बंदुक लटोपटीची घालुनिया गोळी. ४

खेळाचा धंदा, येतसे भरती आनंदा
फारच गमतीचे, खरोखर दिवस दिवाळीचे
तुच्छ त्यांपुढें कडीं आंगठ्या कंठी भिगबाळी. ५

कल्याण,

## ८८. काल, कीर्ति आणि विस्मृति.

मातें भव्य अशी इमारत पुढें विच्छिन्न झाली दिसे
कोणाच्या करण्या चिरंतन यशा ही बांधियेली असे ?
काला प्रश्न विचारला; मज परी देतां न तो उत्तरा,
गेला पंख उभारुनी उडुनिया व्योमीं करोनी त्वरा !

[ २ ]

व्हावें स्मारक हें म्हणोनि कवणें प्रासाद हा बांधिला ?
केला प्रश्न असा मियां फिरुनिया देखोनिया कीर्तिला;
माझा प्रश्न तिनें जसा परिसिला, दुःखीं बुडाली सती,
वेगें निश्वसुनी बघे, निजमनीं लाजून ती खालतीं.

[ ३ ]

गेलों चालत मी तसाच पुढती, तों देखिली विस्मृति,
प्रासादावरती दिसे विहरतां स्वच्छंद गर्वें अती;
केला प्रश्न तिला न जों मजसि दे ती सत्वरीं उत्तरा
" पूर्वीं बांधियला कुणास्तव असो—तो आज माझा खरा ! "

कल्याण, ६ मार्च, १९०७.

## ८९. बालकवीचा गौरव.

ता. १ मार्च १९०७ या दिवशीं जळगांव येथें भरलेल्या कविसंमेलन प्रसंगीं अध्यक्ष डॉ० कीर्तीकर यांनीं एका बालकवीचा गौरव केला तो प्रसंग या पद्यांत वर्णिला आहे.

‘ कौतुक वाटे बालकवे तव पाहुनि कविताशक्ति
हृदयीं माझ्या तुजविषयींची उपजे वत्सल भक्ति. १

ये ये इकडे हें घे बाळा वस्त्र—जरीचें पान
असेल मोलें उणें परी त्या बहुमोलाचें पानं. २

प्रेमें वस्तू अर्पण केली दिसे जरी ती सान
रसिक मानिती मोठी, देती प्रेमातें ते मान. ३

सूक्ष्म काढुनी तंतू विणिलें पट हें कार्पासाचें
किनार त्याची खुले सुवर्णीं दिसतें सुंदर साचें. ४

असेल कोष्टी किती कुशल तो जो साधा कार्पास
घेउनि हातीं विणी तयाचें मृदुल मनोहर वास. ५

घेउनि तैसे व्यवहारांतिल साधे विषय लहान
सूक्ष्म कल्पनासूत्रें करि तूं काव्यपदा निर्माण. ६

ओतुनि अपुली दिव्य प्रतिभा—सत्कवितेचा प्राण
सुवर्ण योजुनि काव्यपटाला शोभा अधिकचि आण. ७

हाय आपुली आर्यभूमिही झाली वस्त्रविहीन
चिंताव्याकुल रडे बिचारी दिसते दुःखें दीन. ८

खर्चुनि रचना चातुर्यातें कर बसनास तयार
लाज राख तूं निजजननीची गांजुनि गेली फार. ९

उणीव मोठी असे कवींची तुजसम आर्यावर्ती
दीर्घायू तुज करो प्रभू तो देवो कवितास्फूर्ति. १०

जळगांव, १ मार्च, १९०७.

---

## ९०. माझ्या लहानपणाची बाग.

( चाल—चंद्रकांतराजाची कन्या. )

नको नको ती या हृदयाला व्हाया आठवण !
गहिंवर येउनि अश्रुजलानें भरती मन्नयन.

बाळपणीं मज फुलझाडांचा नाद असे फार,
केली होती मागिल दारीं बाग मजेदार.

गुलाब, जाई, जुई, शेवती, बटमोगर, निशिगंध,
मदनबाण, मोतिया, चमेली लावियला कुंद.

ठायीं ठायीं हरित तृणाचे लावुनियां पुंज,
मध्यें केला एक मनोहर मालतिचा कुंज.

नित्य सकाळीं प्रेमभरें मीं जलसिंचन करुनी,
वाढविलीं जीं झाडें, गेलीं कुसुमांहीं भरुनी.

फुललेली ती पुष्पवाटिका पाहुनि नयनांहीं,
हर्ष जहाला जो हृदयाला, उपमा त्या नाहीं !

शाळा सुटतां सायंकाळीं तेथें म्यां जावें,
सुखें बसावें, तसें हंसावें, गाणेंही गावें.

कोकिळ, मैना, रावे, यावे तैसे भृंग, पतंग,
ऐकुनि त्यांचीं मंजुळ गाणीं व्हावें म्यां दंग.

अशा रीतिनें काल क्रमितां सहसा एक दिनीं,
प्रिय बागेतें सोडुनि गेलों निज मातुलसदनीं.

" नीट काळजी या बागेची माझ्या घे ताई, "
ऐशी विनती निजभागिनीला करुनी मी जाई.

वर्ष लोटलें, आलों फिरुनी अपुल्या सदनाला,
मागें जाउनि बाग पहातां खेद मना झाला.

गेलीं होतीं सकळहि झाडें हरहर तीं सुकुनी !
फूल कोठुनी मग त्यांवर तें दिसणारें चुकुनी ?

ती जाईची कोमल लतिका पाहुनि सुकलेली,
अश्रुजलाची वृष्टि तियेवर मोहभरें केली.

अश्रुबिंदुही नेत्रीं नुरला, रडलों मी इतुका,
सजीव नाहीं फिरुनी जहाली दुर्दैवें लतिका.

" प्रीतिच केवळ आहे जीवन जगतीं जीवांचें,
प्रीति लयाला जातां हरहर ! जीव कसा वांचे ?

ज्या वस्तूवर असेल अपुली या जगतीं प्रीति,
देणें हातीं अन्याच्या ती मूर्खाची रीति !

प्रिय विषयाला नको विसंबूं, प्राण जरी गेला । "
बाळपणींच्या बागेनें हा बोध मला केला.

कल्याण,

---

## ९१. कावळ्यांची कावकाव.

" कावकाव ' करितात कावळे, मोकळे करुनि आपुले गळे;
शांति सर्व हृदयांतली उडे, दुःखमग्न दिसतात बापुडे ! १

अंबरीं न उडणें तयां सुचे, भक्ष्यपेय बघणें न त्या रुचे;
संकटांत निजबंधु पाहुनी, धावले सकल एक होउनी. २

वृत्ति ही किति उदार या खगीं, धिक् जिणें खचित आमुचें जगीं !
ज्ञानबुद्धि मनुजीं जरी वसे, बंधुभाव न तयांत हा दिसे ! ३

काज नित्य बघुनि नवें नवें, एक बंधु झगडे दुज्यासवें;
संकटांत पडतां तयास तो, गृध्रसा मृत पशूस टोचितो. ४

व्यर्थ व्यर्थ तुमचीं सुभाषणें, व्यर्थ शंभर समाज मी म्हणे.
त्या जळोत तुमच्या महासभा ! बंधुभाव हृदयीं न जों उभा. ५

संकटीं बघुनि बंधु तत्क्षणीं, अश्रु जों प्रकटती न ईक्षणीं;
एकराष्ट्र बनवूं असें म्हणा, वल्गना विफल वाटते मना. ६

'कावकाव' परिसूं नका फुका, बंधुता प्रथम आर्य हो! शिका.
बंधुता–उदय जाहल्या विना, शक्य काय तुमच्या सुधारणा ? ७

कल्याण.

## ९२. मधमाशी.

बाळा, मधमाशी बघ मधमाशी,
गुंगतसे मधुकोशीं. ध्रु०

उडुनि सकाळीं जाय वनातें
गाउनि मंजुळ मोहक गीतें,
रंजवुनी नव रम्य सुमांतें
त्यांतिल मधुतें शोषुनि नेते,
उद्योगाची दासी. १

मधुर मधूचे आणुनि बिंदु
करी तयांचा संचय–सिंधु,

सवें घेउनि भगिनी बंधु,
पोळें रचिते ती स्वच्छंदु;
दावी संघबलासी. २

माशी शिकवी उद्यमभक्ति,
कोश मधूचा संहतिशक्ति,
कण मेणाचे कार्यासक्ति,
किंवा शिकविति जनानुरक्ति;
घे तूं उपदेशासी. ३

भाग्य आपुलें उत्कर्षावें,
दैन्य लयाला सत्वर जावें,
हेतु जरी हा हृदयीं साचा,
धडा शिकें तर मधमाशीचा;
सोडीं आलस्यासीं. ४

कल्याण.

---

## ९३. जीवितसाफल्य.

प्रफुल्ल कमलावरी चमकती रवीचे कर,
तसें स्मित तुझ्या मुखीं शिशुवरा ! दिसे सुंदर;
बघूनि वदना तुझ्या रुचिर, हर्ष होई मना,
पवित्र तव दर्शना सुरमनांतही कामना. १

तुझें हृदय भासतें विमल गांगतोयापरी,
अजूनि शिरली नसे कपटभावना अंतरीं;
सदा हसत तूं रहा जननिच्या सदंकावरी,
करीं श्रवण तद्गिरा स्रवत जी सुधा माधुरी. २

फुलें विकसती किती उपवनीं अहा ! सुंदर,
मरंदमधु सेवण्या भ्रमर गुंगती त्यांवर;
क्षणैक चमकूनि तीं त्वरित सर्व कोमेजती,
अशीच तव अर्भका ! क्षणिक शैशवाची गती. ३

शिशुत्व तव संपलें, झडकरी उठीं बालका !
सखे संवगडी तुझे जमवुनी रमे, घे सुखा;
घडी न दवडी फुका, विविध रम्य लीला करी,
असा समय का पुन्हा तुज मिळेल केव्हां तरी ? ४

विहंग उडती किती तरुतलांतुनी सुंदर,
फळें मधुर सेवुनी करिति गान चेतोहर;
सुखें निशिदिनीं सदा विहर बालका ! त्यांपरी,
न जों उदय पावली अजुनि काळजी अंतरीं. ५

कसे अहह ! बालका ! त्वरित संपले त्वद्दिन,
तुझ्या तनुवरी दिसे सुभग थाटलें यौवन;
असे उदय पावला प्रणय अंतरीं बा ! तुझ्या,
न काळ तरुणा ! वृथा दवड तूं करीं रे मजा ! ६

असत्य अपवित्रता, अनय या जगीं संचला,
न सौख्य कवणा मिळे मनुज संकटीं त्रासला;
असें जरी असे, तरी प्रणय दे सुखा त्याप्रति,
तयास उपभोगितां क्षण पडे विपद्विस्मृति. ७

परी प्रणयकाल तो नच सदा, सुखस्वप्न तें,
क्षणैक रमवी मना, फिरुनि त्या तमीं लोटतें;
तुझ्या प्रणयसागरा भरति ये पुरी संप्रति,
तयांत तरुणा ! रमे अनुभवीं सुखातें अति. ८

अहा ! हिमकणांपरी क्षणिक संपलें यौवन,
त्वदीय; तरुणा ! तुला पुरुषभाव दे दर्शन;
प्रयत्न कर तूं जगीं सतत निश्चयें संप्रति,
प्रयत्न मनुजास दे अधम उत्तमा वा गति. ९

प्रयत्न करिशी जरी मिळविण्या नरा ! तूं धन,
जरी झगडशील तूं मिरविण्या जगीं मीपण;
तुवां मिळविलें नरा ! विपुल वैभवातें जरी,
सुखा न वितरील तें, क्षणिक सर्व या भूवरी. १०

दिलें प्रभुवरें तुला सुमन मानवा ! सद्धन,
करीं विमल तूं तया सकल पाप संशोधुन;
समस्त पशुवृत्तितें त्यजुनि नीच निंदास्तुति,
अहर्निश करावया झगड तूं निजात्मोन्नति. ११

जगीं असति मूढ जे सतत निंद्यमार्गीं रत,
अशां मग सुधार तूं करुनि तन्मनें संस्कृत;
परार्तिहरणीं करीं मन परोपकारीं रत,
जरी तुजसि पाहिजे सुख नरा ! खरें शाश्वत. १२

उदात्त पुरुषार्थ हा जगुनि या जगीं साधणें,
गमे खचित त्याविना विफल मानवाचें जिणें;
करूनि कृति यापरी, सफल जीवयात्रा करी,
खरा पुरुष बा तुला समजतील लोकीं तरी. १३

कल्याण.

## ९४. आत्मयज्ञ.

अव्यक्त स्थिति सोडुनि अपुली प्रभु घेई अवतार,
दीन जनांतें तारुनि करितो दुष्टांचा संहार.

रवि शशि तारे गगनमंडळीं उदयालागीं येती,
नेती हरुनी तमास, जीवन विश्वातें नव देती.

गंगा यमुना नद्या विशाला संतत वाहत जाती,
निजजल–दानें सकल जगाचा ताप लयातें नेती.

वनीं उपवनीं नित्य मनोहर सुमनें फुलती नाना,
रूपें गंधें रसें आपुल्या देती हर्ष जनांना.

करिती सारीं आत्मयज्ञ हीं, बा मनुजा ! तुजसाठीं,
आत्मयज्ञ हा नियम जगाचा चाले त्यावर सृष्टि.

असे चालला यज्ञ निरंतर जो हा ब्रह्माण्डांत,
होई मनुजा ! तयार अपुली आहुति द्याया त्यांत.

जें जें अपुलें असेल तें तें अन्यहितास्तव द्यावें,
वैभव अपुलें खर्चुनि आपण वैभवशाली व्हावें !

वचन मनीं हें नित्य वागवीं, सोडी स्वार्था नीच,
दीन नराचा मग तूं होशिल गुरुनारायण साच.

कल्याण.

---

## ९५. मूर्तिकार.

दृष्टि फेंकित आपुली सभोंवार,
फिरत असतां स्वच्छंद मूर्तिकार;
शिला दिसली मार्गांत भव्य त्याला,
बघुनि तीतें थांबला मुग्ध झाला. १

मूर्ति होती प्रच्छन्न शिलेमाजी,
मूर्तिकारा मात्र ती दिसे आजी;
दिव्यदृष्टी कवि चित्र–मूर्तिकार,
त्वरित येतें त्या कळुनि वस्तुसार. २

कशी आणूं मूर्ति ती व्यक्ततेला,
विचारीं या तो कुशल मग्न झाला;
पुरें जाणुनि तद्रूप कल्पनेनें,
करी सुस्थिर तें शांत चिंतनानें. ३

करीं एक्या टांकीस धरुनि वेगें,
शिलेवर तो आघात करूं लागे;
स्वकर्तव्यीं संलग्नचित्त होत,
इतर सारें विसरला वस्तुजात. ४

करायाचें ज्या असे महत्कार्य,
वचन त्यानें हें सदा शिरोधार्य;
जरी उत्तम वाटतें कार्य व्हावें,
स्वकार्यातें सर्वस्व तयें द्यावें. ५

शिलेवर जे हळुहळू होत घाव,
दिसूं लागे सत्वरी तत्प्रभाव;
रूप पूर्वीचें जाउनी लयाला,
शिला लागे साकार दिसायाला. ६

दूर सारे जैं कृष्ण मेघ होती,
रम्य तारे चमकती नभःप्रान्तीं;
शिलाशकलें त्यापरी निघुनी गेलीं,
सुभग सत्वर बाहेर मूर्ति आली. ७

मूर्तिकारें काढिली शिलेंतूनी
मूर्ति सुंदर संपन्न अवयवांनीं;
तीस पाहुनि कृतकृत्य मनीं झाला,
हर्षरंगीं नाचला ! गृहा गेला. ८

सफल होतीं सद्यत्न मानवाचे,
हृदय त्याचें तैं हर्षभरें नाचे !
शीण सत्वर सर्वही लया जाई,
कार्य करण्या सामर्थ्य नवें येई. ९

त्याच ठायीं मग एक भक्त आला,
मूर्ति पाहूनि चित्तांत फार धाला;
रम्य मंदिर बांधूनि एक तेथें,
मूर्ति नेउनि ठेविली तयें हातें. १०

शिला पूर्वीं जी एक रूपहीन,
तीस देऊं लागले लोक मान;
विजन होती जी भूमि एककालीं,
तीच पुण्यक्षेत्रभू पुढें झाली ! ११

क्षुद्र दगडा देवत्व द्यावयाचें,
असे मनुजा ! सामर्थ्य तुझें साचें !
कसा दीनाहुनि दीन असा होसी ?
मूर्तिकाराचा कां न धडा घेसी ? १२

तुझ्या मार्गीं जे दगड आड येती,
घाव त्यांवर आपुल्या घाल हातीं;
काढ त्यांतुनि रमणीय दिव्य मूर्ति !
करिल मग ती तव सर्व कामपूर्ति ! १३

कल्याण, १८ आक्टोबर, १९०७.

---

## ९६. कवि आणि मयूर.

किती भाग्यशाली अहा ! तूं मयूरा !
प्रभूनें दिला दिव्य तूतें पिसारा;
उभारूनि त्या थयथया नाच नाच !
नसे त्याहुनी थोर आनंद साच ! १

मला पाहुनी दूर जाऊं नको तूं !
धरायास भीती मनीं काय हेतू ?
सख्या ! सत्वरी सोड साऱ्या भयातें,
तुझें आणि माझें असे सत्य नातें. २

चिरंजीव तूं दास त्या शारदेचा,
करीतों मनीं ध्यास मीही तियेचा;
मिळाले तुला स्थान बा तत्पदाशीं,
जगीं येउनी धन्य तूं जाहलासी ! ३

निमाले कवी कालिदासा समान,
असंख्यात जे गाउनी दिव्य गान;
सदा शारदाराधनीं रंगलेले
तुझ्या सारखे सर्व ते मुक्त झाले. ४

करीं घेउनी शारदा दिव्य वीणा,
तियेंतूनि काढीतसे नाद नाना;
सदा गुंग होऊनि त्या नादरंगीं,
करीती सुखें तांडवा स्वैर अंगीं. ५

जयापासुनी विश्व निर्माण झालें,
जयाच्यामुळें विश्व हें सर्व चाले;
अशा दिव्य नादीं मिळालें रमाया,
जयां, धन्य ते धन्य झाले जगीं या ! ६

मना वाटतें शारदाध्यान भावें,
करावें, भजावें तिला, स्तोत्र गावें;
परी ध्यान तें हाय ! साधे न मातें,
प्रपंचांत या वृत्ति भंगूनि जाते. ७

जरी बैसलों स्तोत्र तीचें कराया,
कधीं लागलों आरतीतें रचाया;
क्षणीं विघ्न येई, द्विधा चित्त होई,
क्षणार्धांत तो योग भंगूनि जाई ! ८

नको व्यर्थ संसार वाटे पसारा,
पुरा शीणलों वाहुनी थोर भारा;
वृथा गुंतुनी घोर संसार पाशीं,
असे साध्य जें टाकिले दूर त्यासीं. ९

जयाच्या मनीं साध्य कांहीं करावें,
तयानें तयाशीं सदा युक्त व्हावें;
पुरा योग झाल्याविना साध्य नोहे,
जगीं एकही कार्य हें स्पष्ट आहे. १०

असो; नाच मित्रा मयूरा ! असाच,
मनीं माझिया अल्प हेवा न साच;
सहस्रावधी आपुल्या लोचनांहीं,
सुखें शारदादर्शना नित्य घेई. ११

परी शेवटीं प्रार्थना एक तूतें,
सख्या ! सांग संदेश त्या शारदेतें:—
" पदीं दीन दासास या स्थान देई;
दुजें याहुनी साध्य कांहींच नाहीं. " १२

कल्याण.

## ९७. फुलांतला वास.

मधुर तुझा कुसुमवरा ! वास हा किती !
गुंगतसे हुंगुनि तुज खचित मन्मति.

उपजविसी हर्ष नवा प्रतिपदीं मनीं
अंगीं तव वसत असे काय मोहिनी ?

गंधहीन असुनि तुझी वल्लरी फुला !
परिमल हा कवणें तुज सांग बा दिला ?

' पृथिवी ही गंधगुणा ' बोलते श्रुति,
काय तिनें उकलेना गूढ हें अति.

स्वर्गीं जें मधुर सुधा अमर सेविती
तींतिल मधुबिंदु अमित गळुनि खालतीं.

हिमरूपें पुष्पवरा ! पडुनि तुजवरी
अर्पियली काय तयीं मधुरता तरी ?

अमरत्वा मर्त्यजनां द्यावया सुरीं
सोडियले श्वास मधुर विमल तुजवरी.

भिनले ते तुजमध्यें सकल तत्वतां
म्हणुनी तुज लब्ध सुमा ! काय मधुरता ?
जाणे तो ईश एक गूढ रोकडें
मनुजाचें ज्ञान किती क्षुद्र बापुडें.

वैभव तव पाहुनि परि वाटतें फुला !
मर्त्य न तूं नंदनवनयोग्य कोमला !

सुखवावें असुखहतां मानवांप्रति
दिव्य वस्तु धाडुनि दे देव खालतीं.

दिव्याची संगत दे दिव्यता नरा,
होवो तव संगति या म्हणुनि पामरा.

कोमेजुनि जाशिल तूं यापुढें जरी
तव संगें मरण्यांतचि धन्यता खरी !

कल्याण, ५ एप्रिल, १९०७.

---

## ९८. मुलींची विद्येची भुपाळी.

प्रभात झाली गडे, उगवला गगनीं वासरमणि
चला शिकूं या आनंदानें विद्या सगळ्या जणी. ॥ ध्रु० ॥

गंगा यमुना गोदावरी
तीर्थें पावन हीं भूवरी
परी न विद्येची यां सरी
मानस—मल—हरणीं. १

विद्या शिकवी व्यवहार
सत्य न्याय सदाचार

जगांत विद्या गुरु थोर
अज्ञानोद्धरणीं. २

मातापितरां बंधूजनां
विनवुनि वळवूं त्यांच्या मना
तत्साह्यानें विद्याधना
घेऊं संपादुनी. ३

महत्कार्य हें साधाया
नमन करूं या प्रभुराया
ईशकृपेविण सारे वाया
प्रयत्न या भुवनीं. ४

कल्याण, १ आगष्ट, १९०७.

---

## ९९. उषास्वप्न.

चाल—चंद्रकांत राजाची कन्या०

“ स्वप्नसंगमीं देउनि मजला अधरामृतपान,
कोठें जासी सोडुनि नाथा ! दासीतें दीन ?

तव विरहें ही विव्हल झाली अबला हतभागी,
वदत मुखानें उषा जहाली निद्रेंतुनि जागी. ”

होय अनावर दुःख मनाला, नयनीं जल लोटे,
सख्या भोंवतीं पाहुनि तीतें शरम परी वाटे.

सखी जिवाची तिची तियेला पुसे चित्रलेखा,
" नाथा, म्हणुनी कवणा बाई मारिसि तूं हांका ?
पाणिग्रहण न तुझें, कुमारी अजुनी तूं अससी,
अनुचित मग हें वचन मुखानें कैसें गे ! वदसी. "

उषा बोलली " काय कथूं तुज गडे चित्रलेखे !
निद्रागत मी असतां स्वप्नीं पुरुषवरा देखें.

सुंदर त्याचें रूप पाहुनी मदनें लाजावें,
नयनयुगातें बघतां कमलें कोमेजुनि जावें.

मेघासम सांवळा, मनोहर पीतांबरधारी,
शूर, विक्रमी पाहुनि होती मुग्ध जया नारी.

प्रेमाचा निज लावुनि चटका प्रियकर मम गेला,
लोटुनि शोकार्णवीं सखे ! मज कैसा अबलेला !

शोधितसें त्या, व्याकुल होतें चित्तीं संस्मरुनी,
प्रियकर माझा कवण मला दे आणुनि गे ! फिरुनी ? "

चित्रलेखिका वदे उषेला " शोक पुरे आतां !
त्रैलोक्यीं जर असेल तर मी आणिन तव नाथा.

शूर, विक्रमी, सुंदर जीं जीं लोकीं नवरत्नें,
काढिन त्यांचीं गडे हुबेहुब चित्रें मी यत्नें.

हळुच खुणेनें त्यांतुनि दाखिव रमण तुझा मजला,
उगी ! पुरे कर, किती रडावें पदर दिसे भिजला ! ”

वदुनि असें ती काढुनि दावी चित्रें दनुजांचीं,
देवगणांचीं, गंधर्वांचीं, तेवीं मनुजांचीं.

हळू हळू मग काढूं लागे यादव नरवीर,
प्रद्युम्नाचें चित्र उषेचा अस्ता ने धीर.

अनिरुद्धाच्या काढी चित्रा चतुरा ज्या काळीं,
एकाएकीं लाजुनि खालीं मान उषा घाली.

उदासीनता जाय लया, ती, हर्षभरें डोले,
“ प्राणेश्वर हा ! हाच सखे मम ! ” हांसुनियां बोले.

योगबलानें चित्रलेखिका घेउनि मग आली,
अनिरुद्धातें उषेस दाउनि कृतकार्या झाली.

कवि म्हणती कीं “ जें जें दिसतें स्वप्नीं तें खोटें,
स्वप्न उषेचें खरें जहालें नवल गमे मोठें !

उषेपरी जर दिव्य स्वप्नें हाय ! खरीं होतीं,
या संसारीं दुःखें सारीं त्वरित लया जातीं !

धन्य उषा ती अप्राप्याचा लाभ जिला झाला,
कथुनि तियेच्या दिव्य स्वप्ना काविंकिंकर धाला.

कल्याण, ९ ऑगष्ट, १९०७.

## १००. छत्रसाल आणि शिवाजी यांची भेट.

बुंदेलचा भूपति छत्रसाल,
कर्तृत्वशाली नयधर्मशील;
कीर्ती शिवाची परिसुनि त्याला,
भेटावया उत्सुक फार झाला. १

संकेत आधीं ठरवून त्याशीं,
जाया निघाला नृप दक्षिणेशीं;
सोसूनि मार्गीं बहु संकटांला,
भीमानदीच्या उतरे तटाला. २

पात्रा नदीच्या बघुनी विशाल,
आनंद पावे बहु छत्रसाल;
मार्गीं तया जे श्रम फार झाले,
क्षणांत सारे विलयास गेले. ३

त्या रम्य तीरीं शिवराय आला,
धाला मनीं भेटुनि छत्रसाला;
दोघांस पाहूनि गमे मनाला,
कृष्णार्जुनांचा नव योग झाला. ४

होतें करीं जें निज खड्ग त्याला,
अर्पी शिवाजी प्रभु छत्रसाला;

न खड्ग तें क्षत्रिय तेज मूर्त
समर्पिलें त्यास रिपुक्षयार्थ. ५

प्रेमें शिवानें उपदेश केला
वीरोत्तमा त्या मग छत्रसाला;
वाणी शिवाची अमृतप्रवाह
ज्या सेवितां जाय शमूनि दाह. ६

" स्वधर्मरक्षा कर तूं श्रमानें
नरा खरा तारक धर्म जाणें;
ज्याची असे जागृत धर्मबुद्धि
त्याची घडे निश्चय कार्यसिद्धि. ७

देशावरी ठेवुनि भक्ति आर्या
सर्वस्व अर्पीं निजदेशकार्या;
झाली जरी देशहितार्थ हानि
चित्तांत वीरा नच खेद मानीं. ८

जो दे स्वदेशास जगीं न मान
नीचाहुनी नीच तयास जाण;
कीं जन्मला तो अवनीस भार
तें व्यर्थ त्याचें जगणें असार. ९

स्वातंत्र्यसंपादन बा कराया
करीत जा यत्न सदैव राया;

मार्गीं तुझ्या येतिल आड त्यांतें
संहारुनी बा मिळवी यशातें. १०

स्वातंत्र्य नाहीं तर सर्व नाहीं
स्वातंत्र्य ही वस्तु अमोल पाहीं;
स्वातंत्र्य नाहीं तर जन्म वायां
स्वातंत्र्य हा हेतु जगीं जगाया. ११

निर्माण आधीं कर संघशक्ति
' सामर्थ्य संघीं ' स्मर ही सदुक्ति;
योजूनि नाना मग धीट युक्ति
संपादुनी घे निजदेशमुक्ति " १२

ऐशापरी बोधुनि छत्रसाला
देई निरोपा शिवराय त्याला;
केली कृती काय तयें पुढारां
तें सर्व ठावें इतिहासकारां. १३

कल्याण, १४ आगष्ट, १९०७.

## १०१. विषवृक्ष.

( चाल—अर्धतनू वारुळीं बुडाली. )

[ १ ]

जळो जळो तो वृक्ष विषारी स्मरतां त्या अंतरीं,
भयानें धडकी भरते उरीं. ॥ ध्रु० ॥
मत्प्रिय भगिनी फुलें वेंचण्या गेली एके दिनीं,
बरोबर घेउनिया मैत्रिणी;
होता श्रावणमास मजेचा, सृष्टि जहाली नवी,
तरूंतें रम्य फुटे पालवी;
जिकडे तिकडे रान उगवलें हिरवें नयना दिसे
गमे कीं जलमय वसुधा हंसे !
फुललीं वन्यसुमें सुंदर,
कचोरा कुरडू चेतोहर,
वेंचित वेंचित पारिजातकासन्निध ये सत्वरी.

[ २ ]

पारिजातका हातीं धरुनी गद्गद ती हालवी,
फुलांची वृष्टि जहाली नवी;
फुलें नव्हे तीं रम्यतारका गळल्या गगनांतुनी
गमे ! तत्सौंदर्या पाहुनी.

जों मद्भगिनी औत्सुक्यें तीं वेंचूं लागे अहा,
वर्तलें अद्भुत सहसा पहा !
निघाला तरुच्या गर्भातुनी,
फों फों करित विषारी फणी,
कोमल चरणीं मम भगिनीच्या दारुण दंशा करी !

[ ३ ]

झंजावातें कदली तैशी ताई खालीं पडे,
भयंकर मूर्च्छा तीतें जडे;
विकल जहालीं गात्रें, पडली परडी हातांतली
बिचारी मरणोन्मुख जाहली !
दूर भयानें उभ्या, कांपती ताईच्या मैत्रिणी,
धजेना जवळी जाया कुणी;
कांहीं घटका गेल्यावरी,
पहाती हलवुनी तीतें करीं;
परी उठेना; दीन बिचारी ! मृत पडली भूवरी !

[ ४ ]

अमरवृक्ष ज्या समजुनी निर्भय आलिंगावें करीं,
लपावा सर्प तयाभीतरीं !
हार फुलांचा सुखकर म्हणुनी घालावें त्या गळां
निघावा त्यांतुनि का इंगळा ?

प्राणरक्षणाकारितां घ्यावी मात्रा संजीवनी,
हरावे प्राण तिनें का झणीं ?
अथवा नवल कशाचें तरी ?
अनुभव संसारीं यापरी !
बाह्यमनोहर वृंदावनफल विषमय गर्भी धरी !

कल्याण, १७ ऑगष्ट, १९०७.

## १०२. समाधि आणि जाईची वेल.

होती एक समाध सुंदर उभी एक्या नदीच्या तटीं
जाईची फुलली लता तिजवरी छाया करी गोमटी;
तेथें एकदिनीं मजेंत बसला होता कवी जाउनी
संवादास तयांचिया परिसुनि आश्चर्य पावे मनीं. १

' जे ताजे हिमबिंदु नित्य तुझिया पुष्पांवरी वर्षती
त्यांचें तूं करितेस काय लतिके सांगे मला संप्रति;
बोले प्रश्न समाधिचा परिसुनी तीतें लता सुंदर
देही जो वसतो तुझ्यांत कसलें त्या रूप देसी तर. २

" देही येइल जो तया "—ध्वनि निघे तेव्हां समाधींतुनी
" कालानें प्रतिदेव मी बनवितें त्याचें अघ क्षालुनी; "
" ताजे जे हिमबिंदु नित्य पडती माझ्या प्रसूनावरी
त्यांचें तैल सुगंधयुक्त करित्यें " वल्ली वदे उत्तरीं. ३

कल्याण.

## १०३. भाऊबीज.

दिवाळीचा सण, भाउबीज आली
म्हणुनि गंगू आनंदमग्न झाली;
घरीं येतां आपुला भाउराया
झटे त्याचा सत्कार ती कराया. १

किती त्याशीं भांडली याजमागें
किती लावुनि बोलली तया रागें;
किती वेळां धरियला अबोलाही
आज त्याचें नच भान तिला कांहीं. २

भाउराया लाडक्या पहातांच
भरे प्रेमानें हृदय तिचें साच;
नव्या रंगीं बापुडी दंग झाली
पूर्ववर्तन विसरून सर्व गेली. ३

बाळपणचें प्रेम तें खरें प्रेम
निर्विकारी निस्सीमही अकाम;
जगीं दुसरें त्यापरी प्रेम नाहीं
असे अनुभविलें धन्य ते जयांहीं. ४

तया मग ती आदरें स्नान घाली
कुंकुमाचा दे रम्य तिलक भालीं;

वरी मंगल अक्षता लावुनीया
स्वयें ओवाळी गंगु भाउराया. ५

निज प्रेमातें व्यक्त करायाही
एक पुतळी तिस भाउराय देई;
प्रीति यानें व्यक्त का होय साची ?
परी केवळ समजूत ही मनाची ! ६

भाउराया बसवून भोजनास
करी गंगू मग फार आग्रहास;
सुपक्वान्नें वाढुनि त्यास गोड
करी मनिंचें आपुल्या पुरें कोड. ७

विनोदानें बोलतां चालतांना
एकमेकाशीं खेळ खेळतांना;
उभयतांतें चित्तांत धन्य होई
भाउबीजेचा सुदिन सुखें जाई. ८

बालकांनो सोडुनी द्वेष रागा
जशी गंगू वागली तसे वागा;
प्रेम शांती आनंद सौख्य चारी
तुम्हां शोधित येतील घरीं दारीं. ९

कल्याण, १३ आक्टोबर, १९०७.

## १०४. लहान मुलें.

या इकडे या रम्य मुलांनो खेळा सुंदर खेळ
संगें तुमच्या आनंदानें जातो माझा वेळ.

तुम्हां पाहुनी मनिंचे सारे विरती खिन्न विचार
हृदयीं आनंदाचें भरतें येतें या अनिवार.

क्रूरा चिंता न करी तुमच्या कोमल हृदयीं वास
विचारमार्गीं सदा वाहती मंद समीरण खास.

परी हृदय हें भरलें माझें गाढ तमानें सारें
विचारमार्गीं वाहति माझ्या सोसाट्याचे वारे.

गोड मुलांनो खेळा खेळां गा गा मंजुल गाणीं
गृहदेवीतें हर्ष होतसे परिसुनि तुमची वाणी.

अस्तित्वानें तुमच्या केवळ संसारा शोभा या
रम्य भूषणें तुम्ही गृहाचीं बाकी सारें वायां.

गुप्त जहालां एकाएकीं तुम्हीं कांहीं काल
गमेल एका क्षणांत सारें जीवित कवडीमोल.

सकल पुस्तकीं ज्ञान लाभतें तुमच्या रम्य कृतींत
नलगे पुस्तक उघडायातें तुमच्या सान्निध्यांत.

अहां मधुर तर तुम्ही खरोखर सकल सुकाव्यांहून
सजीव काव्यें एकच तुम्ही बाकी प्राणावीण.

कल्याण, १९०८.

## १०५. जाईजुईचें भांडण.

उद्यान होता मम एक नामी,
गेलों फिरायास तयामधें मी;
तेथें फुलें चित्रविचित्र नाना
म्यां पाहिलीं, सुंदर हासतांना ! १

गुलाब होता फुलला नवीन,
सदाफुली, चंपक कामबाण;
पाहोनियां मोहक मोतियाला
आनंद झाला मम मानसाला. २

राणी फुलांची सुकुमार जाई,
प्रेमें मला ' ये ! ' म्हणवूनि बाही !
जाऊनि तीतें मग म्यां करानें
आलिंगिलें चुंबुनि आदरानें. ३

जुई तियेची भगिनी लहान,
पहात होती कृति ही दुरून;
तीतें न ऐसा अवमान साहे
माझ्याकडे होउनि रुष्ट पाहे ! ४

अत्यंत माझा सदय स्वभाव,
अंतस्थ तीचा समजोनि भाव;

करावया सांत्वन दुःखितेचें,
प्रसून मीं चुंबियलें जुईचें. ५

" हे चंचला ! धिक् ! अनुदारता ही—
प्रेमीं तुझ्या निश्चलता न कांहीं ! "
जाई तदा निष्ठुर शब्द बोले,
मर्मीं तयांहीं मम घाय केले. ६

व्हावा न त्यांचा झगडा म्हणोनी,
आलिंगिल्या मीं स्वकरांत दोन्ही;
कोमेजल्या तों लतिका क्षणांत !
मी मात्र दुःखें झुरलों मनांत ! ७

१८ जुलई, १९०८.

---

## १०६. देवाचे दूत.

दिनान्तीं लया जाय जैं अंशुमाली
करस्पर्शनें पश्चिमा रक्त झाली;
मनोहारि तें दृश्य पाहोनि सारें
त्वरें चित्र आलेखिलें चित्रकारें. १

निघाला युवा जावया दूर देशीं
करी सांत्वना भेटुनी स्वप्रियेशीं;

कवीनें प्रसंगास त्या पाहियेलें
झणी त्यावरी काव्य निर्माण केलें. २

रडूं लागलें लाडकें बाळ तान्हें
तया शांतवी माय गाऊनि गाणें;
तिच्या वादकें ऐकुनि गोड ताना
सतारींतुनी निर्मिलें सुस्वरांना. ३

करीं आपुल्या बांधितां केश बाला
तयां शोभवी घालुनी पुष्पमाला;
तिला पाहुनी मोहिला मूर्तिकार
शिलेची करी मूर्ति तैशी तयार. ४

जगीं व्यक्त होतात जे दिव्य भास
कथायास गूढार्थ त्यांचा जनांस;
चितारी कवी वादनाचार्य थोर
खरे भूवरी जन्मती मूर्तिकार. ५

प्रभूचे न जाणोनि हेतू, सदैव
जगीं भोगिती दुःख जे अज्ञ जीव;
अशांच्या कराया मनःसांत्वनातें
प्रभू प्रेषितो दूत हे या जगातें. ६

असंख्यात दुःखें जगीं नांदताती
नसे सौख्य कांहीं मना क्लेश होती;

परी सत्य केली असे जीवयात्रा
गमे याच दूतीं सदा प्राणिमात्रा. ७

जरी भूवरी चित्र संगीत काव्य
कळा तीन ना प्रेषिता देव दिव्य;
अरण्यापरी भासती सर्व भू ही
जगाया जगीं त्रासते सत्य देही. ८

जया लाभली संगति प्रेषितांची
जयीं सेविली माधुरी तत्कलांची;
अहा वाटती धन्य ते लोक यातें !
असे लाधला स्वर्गसौख्यांश त्यांतें ! ९

प्रभो मागणें अन्य माझें न कांहीं
कलांचें मला दिव्य या ज्ञान देईं !
तुझा दूत मी सर्व ठायीं फिरोनी
जगांतील टाकीन दुःखें हरोनी ! १०

कल्याण, १९०९.

---

## १०७. बाऊ. !

रात्रीं जाउनि बैसलों सहज मी एके दिनीं अंगणीं
आली धांवत मागुनि दुडदुडा मत्कन्यका तों झणी;

प्रेमानें करपाश घालुनि गळां अंकावरी ती बसे
लोळे निर्भय कौतुकें मजकडे सप्रेम पाही हंसे. १

होती तैं नव चंद्रिका उगवली व्योमीं तमोवारिणी
जोत्स्ना शीतल शुभ्र सुंदर तिची फाके मनोहारिणी;
तेजस्वी नव तारका चमकल्या त्या चंद्रिकेमोंवतीं
देखावा रमणीय तो बघुनियां आनंदलों मी अती. २

माझी प्रेमळ कन्यका मज गमे तेव्हां दुजी चंद्रिका
इंदूचा नव कौमुदीसम मला दे हास्य तीचें सुखा;
नक्षत्रांस असंख्य ये नच तिच्या नेत्रद्वयाची सरी !
वाटे स्वर्गसुखानुभूति जणुं मी तैं घेतसे भूवरी ! ३

ब्रम्हानंद सुखास मी क्षणभरी सेवीत जों यावरी
कन्या मामक तों बघे मुरडुनी मागें हळू सत्वरी;
कांपे त्या सरशी भयें दचकुनी वेगें रडूं लागली
घर्मानें भिजली तिची तनुलता दीना दिसे भागली. ४

मागें पाहुनि ओरडे म्हणतसे ' बाऊ ' अशी अक्षरें
बाऊ ये कुठुनी तिथे मजसि हें कांहीं कळेना खरें;
मी ही गोंधळलों सुचे न मजला मूढा जहाली मति
ब्रम्हानंदनगाहुनी घसरलों आलों झणी खालती. ५

वृत्ती बावरल्या स्थिरा करुनियां मागें पुन्हां पाहतां
कन्येची पडली भयप्रद दिसे छाया मला तत्वतां;

बाऊ मानुनि साउलीस रडते ही पोर वेडी खरी
अज्ञानें फसलीच केवळ दिसे शंका पळाली दुरी. ६

ईषत् हास्य करोनि म्यां बघुनिया दीना सुतेची स्थिती
वेगें दर्पण आणवोनि धरिला तो मी तिच्या मागुती;
पाहोनी प्रतिबिंबलें शिशु दुजें तैं स्वच्छ त्या दर्पणीं
हांसे गद्गद कन्यका भय तिचें गेलें लयातें झणी. ७

बाऊ तो नव्हता, भ्रमांत तिजला अज्ञान घाली परी
होतां ओळख वस्तुची झडकरी भीती तिची हो दुरी;
मत्कन्येसम मूढ अज्ञ जन या आहेत लोकीं किती !
रज्जूतें नच ओळखूनि तिजला सर्पभ्रमें ताडिती ! ८

आहें कोण ? जगांत या मज कुणी निर्माण केलें तरी ?
जन्मा येउनि कोणतें मज असे कर्तव्य या भूवरी ?
आहे सत्य मदीय रूपहि कसें नेणोनि हें अंतरीं
भीती आदरिती वृथा जन जगीं मानूनि माया खरी ! ९

जेव्हां ये मग सत्स्वरूप कळुनी ज्ञानाचिया दर्पणीं
माया जाय लया समस्त मनिंची भीती उडे तत्क्षणीं;
जो जाणे निजरूप सद्गुरुकृपें ज्ञानाचिया साधनें
त्यानें मात्र जगीं कृतार्थ अपुलें जन्मूनि केलें जिणें ! १०

कल्याण, ६ जुलई, १९०९.

## १०८. तीन वृत्ति.

जाई मी फिरण्यास नाद म्हणुनी कोठें तरी एकला
जातां एक दिनीं बकूल तरु मी मार्गामधीं देखिला;
नक्षत्रें गगनीं जशीं चमकती नाना अपारद्युति
होतीं भूमिवरी फुलें पसरलीं मागें पुढें भोंवतीं. १

होती वेळ सकाळची कितितरी आनंददायी मना
भासे तैं जग जीर्णता त्यजुनिया तारुण्य घे कीं पुन्हा;
पुष्पांचा सुटला सुगंध पसरी चौफेर वायू जया
सेवाया बसलों तदा तरुतलीं मी शांत चित्तें तया. २

त्या उन्मादक सौरभें हरखलों मी गुंग झालों मनीं
माझें भान मला उरे न, नकळे स्वर्गीं असें वा वनीं;
वेंचायास फुलें करांत परड्या घेवोनि तों सत्वरी
आल्या तीन मुली पदध्वनि मला जागा तयांचा करी. ३

आहा त्या वनदेवताच अथवा दिव्यांगना ना मुली
त्यांचा संभव होय काय न कळे किंवा रमेच्या कुळीं;
त्यांच्या कोमल मुग्ध रम्य बघुनी रूपा गमे अंतरीं
आल्या नूतन कल्पवृक्षकलिका स्वर्गांतुनी भूवरी. ४

एकीनें परिधानलें धवलसें दुग्धापरी अंबर
नेसे दाडिमरक्त वस्त्र दुसरी अत्यंत चेतोहर;

आली कज्जळ कृष्ण रम्य तिसरी लेऊनि बाला पट
त्यांचा संगम पाहतां स्थलचि तें भासे त्रिवेणीतट ! ५

एका मागुन एक त्या तरुतळीं वेंचीत होत्या फुलें
पुष्पें कोमल फार, मंद म्हणुनी त्या टाकिती पाउलें;
होत्या हांसत गातही मधुनिया गाणें कुणी मंजुळ
त्यांच्या सुस्वर संगमा परिसुनी मच्चित्त हो विव्हळ. ६

बालांनीं परड्यांतुनी जमविलीं ताजीं फुलें सुंदर
नेत्रीं बाष्प तसे नवे चमकती बिंदू हिमाचे वर;
बोले एक दुजीस ‘ हीं तुजहुनी माझीं पहा गे किती ’
‘ यांचें तूं करणार काय ? ’ पुसती त्या एकमेकींप्रती. ७

‘ यांचा हार रचूनि मी प्रभुपदीं वाहीन भावें तया ’
‘ पुष्पांचा रमणीय गुच्छ करुनी अर्पीन नाथा प्रिया; ’
‘ वेणी गुंफुनिया मनोहर करीं घालीन मी कुंतलीं ’
एकामागुन एक बोलत असे तेथोनि गेल्या मुली. ८

बाळा तें स्थल सोडुनी आपुलिया गेहास गेल्यावरी
त्यांच्या उक्तिवरी विचार करण्या मी लागलों अंतरीं;
‘ पुष्पें एकच वेंचिलीं तरुतळीं होतीं तिघीं हीं जर
कां त्यांच्या उपयोजनेंत पडलें मोठें असें अंतर ? ’ ९

सृष्टी ही त्रिगुणात्मिका वदत हा सिद्धांत आले मुनि
त्यांचा प्रत्यय आज ये मज पुरा त्या बालिका पाहुनि;

होती सात्विक वृत्तिची प्रभुपदीं अर्पीतसे जी फुलां
देवा भक्तिसमर्पणाविण न जी अन्या धरी हेतुला. १०

बाळा राजस वृत्तिची प्रियकरा जी गुच्छ अर्पीतसे
प्रेमाचें प्रतिदान नाथ वितरो हेतू मनींचा असे;
होती तामस जी वदे ‘ गुफुनि मी घालीन वेणी शिरीं ’
स्वार्थावांचुनि कोणता न दुसरा हेतू तिच्या अंतरीं ! ११

त्यांचे वेषहि वृत्तिसूचक असे होते कसे ते पहा
सत्वा श्वेत रुचे रजा अरुण तो काळा तमातें अहा;
ज्याची वृत्ति जशी तशींच घडती कार्यें तयाहातुनीं
हें तों सत्य असे सनातन परी मी जाणिलें या क्षणीं. १२

मी ज्या ज्या समयीं बकूल तरुतें पाहीं वनीं हिंडतां
येती मन्नयनापुढें झडकरी बाला तिन्ही तत्वतां;
त्यांनीं जें कृतिनें मला शिकविलें तें तत्व मातें स्मरे—
‘ सृष्टी ही त्रिगुणात्मिका मनुज हा वृत्तीं तसा आचरे. ’ १३

कल्याण, ७ ऑगष्ट १९०९.

---

## १०९. सोनचांपा आणि निवडुंग.

“ नकळे मज निवडुंगा ! केलें तुज कां म्हणोनि निर्माण,
भूमीस भार केवळ असशी तूं व्यर्थ जन्म तव जाण. १

भरलें शरीर सारें कांट्यांनीं सौकुमार्य लव नाहीं,
न रमे चित्त बघोनि क्षुद्र तुझें तें प्रसून नयनांहीं. २

तूं मजपुढें कितीसें ? दिनमणिची काजव्यास ये न सरी,
माझें सुमन पहा हें रूपें गंधें जनास मुग्ध करी." ३

"बडबड पुरे मदान्धा सोडुनि दे त्वरित मूढपण हें तूं,
प्रत्येक वस्तु केली ईशें धरुनी विशिष्ट मनिं हेतू. ४

तुजसम माल्य न माझें म्हणुनि मला खेद अल्पही नाहीं,
त्वत्कुसुमसंगतीनें विषयीं मन सक्त सर्वदा होई. ५

मर्यादोल्लंघन जे करिती त्यां योग्य मार्ग दावाया,
सृजिलें प्रभुनें मातें कां देशी दोष त्याजला वाया. ६

ईशपदप्राप्तीचा मार्ग असे बिकट कंटकीं भरला,
हें तत्व सांगतों मी, जाणे जो तोचि एक जन तरला. ७

रूप तुझें रम्य परी व्यर्थ तयाचा कशास अभिमान ?
सृष्टींतिल सुंदरता क्षणभंगुर चंपका ! मनीं जाण." ८

चंपक निवडुंगातें पाहुनि सुचले विचार जे चार,
कथिलें त्यांतें कवनीं घ्यावें रसिकीं तयांतुनी सार. ९

कल्याण.

## ११०. सुरवंटास पाहून सुचलेले विचार.

पूर्वीं यांतिल एकही न पडला दृष्टीस माझ्या मुळीं
आले हे सुरवंट आज इतुके कोठोनियां या स्थळीं ?
ही यांची नवसृष्टि पाहुनि अशी वाटे मदीयांतरीं
माया अद्भुत ईश्वरा तव, कळे कोणा न ती भूवरी. १

प्राणी निर्मुनि साधिलें हित तुवां हें आमुचें कोणतें ?
देवा एक तुलाच माहित खरें आम्ही असूं नेणते !
त्वां निर्मूनि सुतीक्ष्ण दाहक अशीं यांच्या शरीरीं कुसें
यांतें तापद भार फार मनुजा केलें कशाला असें ? २

यांचा स्पर्श न होय जों, त्वरित त्या हो तीव्र दाह स्थलीं
लागे काय पिसेंच, आग न शमे होई अती काहिली;
ऐसे हे सुरवंट तापद जरी आम्हां समस्तां अती
देसी सुंदर रूप सत्वर कसें तूं ईश्वरा यां प्रती ? ३

कांहीं काळ असाच ताप मनुजा देऊन झाल्यावरी
यांचीं सर्व कुसें गळूनि पडती ये तेज अंगावरी;
यांतें सुंदर पंख दोन फुटती जाया उडोनी दुरी
होऊनी फुलपाखरें उडुनि हे जाती प्रसूनांवरी ! ४

तापा देउनि पाप नित्य करिती जे जीव या भूवरी
त्यांच्या तूं करिसी हिता प्रभुवरा हो त्वत्कृपा त्यावरी !

हे देवा तुजला ' दयानिधि ' असें जें सुज्ञ संबोधिती
वाटे सार्थचि तें, समान तुजला सारे जगीं भासती ! ५

प्राणी तो सुरवंट हीन, करिसी त्याचें स्वरूपांतर
झाली कां मग बा तुझी अवकृपा जाणे न माझ्यावर ?
द्यावें नूतन रूप सत्वर तुवां आतां दयाळा मला
तूतें मी विनवीतसें न करुणा ये कां अजूनी तुला ? ६

जन्मा येउनि या जगीं नच परां मी दुःख केव्हां दिलें
अन्यांपासुनि जाहले प्रभुवरा अन्याय मी साहिले;
पापाचें भय बाळगूनि हृदयीं मी वर्तलों नेहमीं
कां ऐसा असुनी, कृपेस तुझिया सत्पात्र वाटे न मी ? ७

देहाचा जड भार वाहुनि सदा कंटाळलों मी अती
दृश्यें स्थूल जगांतलीं बघुनियां ये मांद्य दृष्टीप्रती;
येऊं दे म्हणुनी दया प्रभुवरा माझी तुला अंतरीं
दे मातें रमणीय पंख, उडुनी जाईन मी सत्वरीं ! ८

पक्षांतें पसरूनियां विहरतो चंडोल जैसा नभीं
आनंदें पथ आक्रमीन गगनीं. मातें कुणाची न भी;
तेजःपुंज खगोल दिव्य नयनीं मी पाहतां तेथुनी
माझें मीपण विस्मरोनि सहसा भोगीन कीं उन्मनी ! ९

कल्याण.

---

## १११. गाण्याची उत्पत्ति.

हें निर्मिलें प्रथम जें जग ईश्वरानें
कोणीहि तैं मनुज गानकले न जाणे;
चित्ता श्रमार्त अपुल्या रमवावयाला
कांहींच साधन तदा नव्हतें तयाला. १

जो तो करी अविरत श्रम सर्वकाल
शांतीविणें सरुनि जाय निशा विशाल;
ऐशा क्रमें हळुहळू निज जीविताला
कंटाळला मनुज दुःखित हाय ! झाला. २

गाण्याविणें मनुज विव्हळ फार झाला
आली म्हणून करुणा परमेश्वराला;
पाचारिलें मग तयें निजगायकांतें
गंधर्व गानपटु सुंदर अप्सरांतें. ३

गाणें नसे म्हणुनि मानव खिन्न झाला
'जा जा तयास शिकवा झणि गावयाला—'
आज्ञा अशी परिसुनी प्रभुची जहाली
गायास लागति समस्तची अंतरालीं. ४

नादें भरे सकल तें गगनावकाश
आरंभ होय जणुं गानकलोत्सवास;

आलाप ते मधुर दिव्य सुराप्सरांचे
कीं लोटले प्रबल ओघ सुधारसाचे ! ५

होता तदा फिरत कोकिल अंतरिक्षीं
तो गानलोलुप करी श्रवणास पक्षी;
आकंठ गानरस सेवुनि तृप्त झाला
गाणें जगास मग ये शिकवावयाला. ६

स्कंधीं बसोनि पिक आम्रमहीरुहाचे
आलाप काढित मनोहर पंचमाचे;
तें ऐकुनी मधुर कूजित कोकिलांचें
नाचे तदा हृदय हर्षित मानवांचें. ७

संसार हा विषम कंटकपूर्ण सारा
दु:खें अनंत छळिती न सुखास थारा;
मार्गा तरी मनुज आक्रमितो सुखानें
आतां मनास रिझवूनि म्हणूनि गाणें ! ८

ऐशापरी अमर गानकला जगांत
द्यायास शांति मनुजा अवतार घेत !
ज्या मानवास समजे रुचि या कलेची
वाटे तयावर कृपा सदय प्रभूची. ९

गाणें क्षणांत हरितें मनिंचा विषाद
चित्तास शांत करितें वितरी प्रसाद;

गाणें असे प्रबल मोहक सर्व जीवां
गाणें अहा विसरवी निज देहभावा ! १०

आहा ! जिणें खचित गानविहीन वायां
स्वर्गीय गान नव जीवन दे जगा या;
निर्गान जीवित रुचेल कुणा क्षणैक ?
गाण्याविणें सकल नीरस मृत्युलोक ! ११

कल्याण, ४ सप्टेंबर, १९०९

---

## ११२. धन्य कोण ?

व्यायामा करुनी तुवां स्वतनुचें सामर्थ्य संपादिलें
‘ भीमाचा अवतार हा ’ तुज जरी लोकीं म्हणूं लागले;
शक्तीचा उपयोग भारहरणीं हो ना पराच्या जरी
सारी शक्ति तुझी वृथा मज गमे बा मानवा भूवरी. १

अभ्यासा करुनी अनेक वर्षें विद्या तुवां साधिली
तूतें ‘ पंडित ’ ही प्रशस्त पदवी लोकीं जरीही दिली;
लोकाज्ञान हरावया जर तुवां ना ती कधीं योजिली
मातें सर्व तुझी गमे विफल ती विद्या जरी चांगली. २

नाना कष्ट करूनियां निशिदिनीं संपादिलें त्वां धन
आहे हा दुसरा ‘ कुबेर ’ वदती पाहूनि तूतें जन;

नाहीं त्वां दिधलें जरी धन परा दारिद्य नाशावया
या लोकीं तर संपदा मिळविली त्वां एवढी कासया ! ३

नाहीं ते करुनी प्रयत्नाचि तुवां सत्ता करीं आणिली
इंद्राचीच जणों म्हणूनि तिजला लोकांत वाखाणिली;
सत्ता ती न जरी परार्तिहरणीं त्वां मानवा लाविली
मातें ती गमते प्रयत्न करुनी त्वां व्यर्थ संपादिली; ४

विद्वत्ता अधिकार वैभव तसें सामर्थ्य हीं साधनें
स्वार्थातें उपयोजिणें मज गमे हें मानवाचें उणें;
जाणी स्वार्थ न या जगीं कवण तो ? सर्वांस तो ठाउका
जो अन्यास्तव आत्मयज्ञ करितो तो धन्य लोकीं निका ! ५

कल्याण.

---

## ११३. रानांतलें फूल.

जेथें वावरती अहर्निश सुमा नानापरीचे जन
सोडोनी असलें तुवां स्थल कसें स्वीकारिलें हें वन ?
एकांतप्रियता तुझी बघुनि ही बा वाटतें मन्मना
आहे त्वां पहिला धडा शिकविला योगाचिया साधना. १

पुष्पा तूं बसण्यास पात्र असुनी पृथ्वीपतीच्या शिरीं
वृत्ती लीन अती धरूनि वससी या काननाभीतरीं;

वाटेना लवही अहंकृति तुला त्वद्गौरवाची कशी !
जावें मीपण विस्मरोनिच कसें हें वर्तनें दाविसी. २

भूमी पंकिल जाहली सकल ही माझ्या तुझ्या भोवतीं
तूं होतेंस तसेंच निर्मल परी मी पाहतों संप्रति;
राखावी निजवृत्ति लेपरहिता मोहक्षणीं सज्जनें
तत्वा या उपदेशिसी सुकुसुमा तूं आपुल्या वर्तनें. ३

बा पुष्पा फुलुनी प्रसन्न करिसी क्लांताचिया लोचना
सोडोनी निज सौरभास करिसी तूं घ्राणसंतर्पणा;
अन्याचें सुख साधण्यास अपुली देशी अहा आहुति
आहे काय परोपकार कथिसी हें तूं करोनी कृति. ४

दृष्टी लावुनि आपुली प्रभुकडे भावें प्रसूना सदा
ध्यानीं मग्न तयाचिया असासि तूं, " जायास मोठ्या पदा;
आहे एकचि लक्ष्य वस्तु मनुजा तो स्थाणु सर्वेश्वर
त्याचें ध्यान करी " असें सुचविसी, "सारें दुजें नश्वर." ५

एकांतप्रियता अहंकृतिविणें वृत्ती विलीना अती
तैशी निर्मलता परोपकरणीं पुष्पा मनाची रती;
पाहोनि गुण हे तुझे गमतसे योगीच कोणी तरी
पुष्पाचें रमणीय रूप धरुनी जन्मास ये भूवरीं. ६

या संसारवनांतुनी विचरतां गेलों चुकूनी पथा
व्हावा सद्गुरु मार्गदर्शक कुणी ऐसें मना वाटतां;

पुष्पा मी तुझियाकडे झडकरीं येईन, दावी मला
जो आहे ऋजुमार्ग त्या क्रमुनियां सेवीन मी शांतिला. ७

कल्याण.

---

## ११४. सदोदित !

जो काल होतां उदयास आला
गेला जरी भास्कर तो लयाला,
तदुष्णता सुंदर तत्प्रभाही
अजूनि माझ्या स्मरणांत राही. १

जें काल होतें फुललें प्रसून
तें आज गेलें जरिही सुकून,
स्मरे मला वास अजूनि त्याचा
सौंदर्य उत्कर्ष करी मनाचा. २

जो एकदां मित्र असे जिवाचा
गेला जरी सोडुनि आज साचा,
कधीं कधीं होत असे अजून
अस्तित्व त्याचें मज भासमान. ३

जें एकदां उद्भवलें जगांत
तें नष्ट झालें जरि वस्तुजात,

हो ज्ञात तत्सार निजेंद्रियातें
अस्तित्व त्याचें कळतें मनातें. ४

जगांतुनी वस्तु निघोनि जाई
सूक्ष्मस्वरूपें परि नित्य राही,
आकार तीचा जरि नष्ट होत
वस्तू असे जागृत भावनेंत. ५

विभावसू मित्र तसें प्रसून
माझ्यांत गेलीं असती मिळून !
तीं नष्ट झाली म्हणणें असत्य
विराजती या हृदयांत नित्य. ६

कल्याण.

---

## ११८. विंचू.

दु:सह भारी, डसला मज विंचु विषारी ॥ ध्रु० ॥

सर्वांगाची झाली लाही
तीव्र वेदना उठल्या देहीं
लहरीमागें लहरचि येई
सर्व शरीरीं १

क्षुद्राचि नांगी किती खरोखर
विक्रम तीचा परी भयंकर
दिसे विरोधाभास निरंतर
या संसारीं. २

असुनी एकचि बिंदु विषाचा
होई देहीं सिंधु तयाचा
प्रभुची लीला जाणे कैंचा
मनुज भिकारी. ३

यत्नें केलें औषध–पाणी
मंत्र घातिला दंशस्थानीं
शमवुनि पीडा परी न कोणी
दुःख निवारी. ४

जीवित–यात्रा ही क्रमतांना
दंशिति मनुजा वृश्चिक नाना
सद्गुरु मांत्रिक एकचि त्यांना
अन्य न तारी. ५

नाशी दारुण भव–रोगातें
ऐसा सद्गुरु मिळतां यातें
डसोत विंचू सहस्र त्यातें
कवण विचारी. ६

कल्याण.

---

## ११६ जीवाचें अमरत्व.

स्वातीचा जलबिंदु एक पडतां मेघांतुनी सागरीं
माझें जीवित जाय आज विलया ऐसें म्हणे अंतरीं;
घेई शोषुनि शुक्ति तों अपुलिया गर्भी तया वाढवी
देई मौक्तिकरूप सुंदर तया जैं कांतिला गाढ वी. १

कोळी येउनि काढिलें, वर तयें शुक्तीस अब्धींतुनी
आतां होइल सत्यनाश उपजे तैं भीति मुक्तामनीं;
हा हा अद्भुत वर्तलें नवल तों तें रम्य मुक्ताफल
भूपाच्या पडुनी करीं चमकलें तच्छेखरीं सोज्ज्वल. २

झाला नाश न बिंदुचा घडुनि ये त्याचेंच रूपांतर
मुक्तावेष धरोनि तो विलसला जीवंत या भूवर;
मृत्यू या न जगांत, शाश्वत वसे हा जीव रूपांतरीं
जें जें उद्भवतें पुन्हा विलय तें पावे, वृथा वैखरी. ३

कल्याण.

---

## ११७. शरत्काल.

[ १ ]

शरत्काल हा किती सुखावहा. सांगू सखया तरी,
संप्रती दुःख नो [illegible]करी ॥ ध्रु० ॥

पर्जन्याच्या वृष्टीनें ही निर्मल झाली धरा,
दिसतसे लोचनचेतोहरा;
तडाग वापी तटिनी भरल्या स्फटिक जलानें अती,
वाटतें हर्षभरें हांसती !
तरुलतिकांची तरुण जोडपीं हरितांबर लेवुनि,
टाकिती जननयना मोहुनी.
सृष्टी यौवनभावा धरी,
अंगीं नूतन कांती वरी,
तरुण कामिनीसम ही दिसते सुंदर शरदीं खरी.

[ २ ]

जिकडे तिकडे हरित तृणाचीं कुरणें विस्तारतीं,
तयांतुनि निर्झरही वाहती;
या कुरणांतुनि दिनभर चरती स्वच्छंदें गोधनें,
किती तीं निर्भय त्यांचीं मनें !
घेउनि हातीं वाजविताती गोप-शिशू बांसरी,
बैसुनी सान्निध कोठें तरी.
ऐकुनि मंजुल वंशीध्वनी,
जाती धेनू संमोहुनी,
ब्रम्हानंदीं निमग्न होती लक्ष न चरण्यावरी.

[ ३ ]

बारा महिने श्रम जे केले शेतकऱ्यांहीं अती,
तयांचें सार्थक हो संप्रति;
हीं धान्याचीं पिकलीं शेतें पिंवळीं सोन्यापरी,
पाहतां सुख होई अंतरीं;
उड्या घालिती या शेतांवर पक्षीही येउनी,
मुखानें मधुगीतें गाउनी;
धेनू पक्षी नारी नर,
सर्वां आनंदाचा भर,
नाहीं ठावा लेशहि कवणा चिंतेचा अंतरीं.

[ ४ ]

अन्नपूरणा देवी वाटे अवतरली मंगला,
करूं या उत्सव तीचा चला;
आणुनि कणसें नव धान्याचीं वाहूं या तिजवरी,
दाखवूं नैवेद्या सत्वरीं;
गाउनि गाणीं स्तुतिपर तिजला भक्तीनें आळवूं,
तियेचें आशीर्वच मेळवूं.
शारदे दे गे सौख्या सदा,
न शिवो आम्हांतें आपदा;
प्रार्थुनि ऐसें करूं मनाची करमणूक या पुरी.

कल्याण, १९१२.

---

## ११८. तारेची प्रणय पत्रिका.

विद्याध्ययनासाठीं सोमदेव अर्थात् चंद्र, ज्यावेळीं देवगुरु बृहस्पतीच्या आश्रमांत वास करीत होता, त्यावेळीं त्याचें अनुपम सौंदर्य पाहून गुरुपत्नी तारा त्याचेवर मोहित झाली. विद्याध्ययन संपल्यावर गुरुदक्षिणा देऊन गुरूचा निरोप घ्यावयाची इच्छा चंद्रानें प्रकट केली, तेव्हां आपल्या मनांतील हेतु तारेला गुप्त ठेववेना. पतिव्रताधर्म विसरून जाऊन तारेनें खालील पत्र चंद्रास पाठविलें:—

" सुधांश सिंधो संबोधावें कैसे तुजलागीं;
नच जाणे ही प्रणय विमूढा तारा, हतभागी ! १

हे नररत्ना असें गुरूची तुझिया मी जाया;
दुर्विधियोगें इच्छा करितें दासी तव व्हाया ! २

कोण लाज ही !—जळो लेखणी ! मेली अविचारी !
व्यक्त करी जी इच्छा माझी पापमयी भारी ! ३

अथवा तुजला कसा लेखणी ! देऊं मी दोष ?
हस्ताधीना असती तूं गे ! हस्त मनोदास ! ४

होतां पापी मन, तूं होसी पापी नियमानें;
मरे पदाश्रित लतिका, जळतां तरुशिर अनिलानें. ५

कुकर्मरत तो दुर्मति जैसा मालवि दीपातें;
इच्छितसें मी नष्ट कराया हे स्मृति गे तूंते ! ६

मनश्चोर मम कवण असे तो ? नारी मी कवण ?
भूत भविष्यत्–यांचीं न कधीं होवो आठवण ! ७

प्राणसख्या ! तूं ये रे, तर मग दे भेटी मजला !
लज्जा भीति मान कुलाचा तुजसाठीं त्यजिला ! ८

स्वधर्मपंजर भंगुनि उडुनी कुलहंसी जाई;
येउनि सत्वर तारानाथा ! धरि तीतें पायीं ! ९

तारा नाथा ! कवणें तुज हें दिधलें अभिधान ?
नामदायका मम हृदयाचें होय कसें ज्ञान ! १०

मुदित पंकजीं परिमल राहे गुप्त निशा होतां,
या हृदयींचें प्रेम तसें; परि विफला ती चिंता ! ११

ज्वलदग्नीतें लपवूं शकला आजवरी कवण ?
तारानाथाचि तूं, तारेची ज्वाला करिं शमन ! १२

निजराज्यातें सोडुनि, अपुल्या कर्तव्या त्यजुनी,
भ्रमेल कैसा भूपति नाथा ? दूर अशा विजनीं ? १३

खरशर तूणी, सुमधनु हस्तीं अपुल्या घेवोनी,
सहायहीना पुरी आक्रमी मदन रथी कोणी ! १४

दुजा तुझ्याविण या अबलेचें कवण करी त्राण ?
ये ये नाथा ! सत्वर आतां, विव्हळ हो प्राण ? १५

मी ज्या दिवशीं–म्हणूं कशी मी कुदिन असे त्यास ?
पाहियलें तव मुख कमला जें लाजवि मदनास ! १६

प्रथम ज्या दिनीं सदाश्रमीं या होय तवागमन,
सरोजिनीसम विकसित झालें सहसा खिन्न मन. १७

कितीक वेळां पाहियलें हे मुकुरीं हतवदन ?
घालुनि कुसुमें भूषविलें या कृष्ण कचा सुधन. १८

दुकूळ ल्यालें रम्य, भिकारी वल्कल अवगणुनी;
वन देवीची याच्ञा केली दे भूषा म्हणुनी ! १९

मनांत माझ्या कसा जन्मला भाव असा भिन्न,
हर हर मजला न कळे तेव्हां झालें बहु खिन्न. २०

वसंत येतां विविध भूषणें घेई वनराजी,
तारा–यौवन–वनर्तु–राजचि तूं, कळलें आजी ! २१

विद्येसाठीं बससी जेव्हा गुरुचरण प्रांतीं
गृहकर्मातें सोडुनि बैसे जाउनि एकांती. २२

प्राण सख्या ! तव मधुमधुरस्वर आयकितां कानीं,
मृदंग वीणा, मंजुल मुरली तुच्छ मनीं मानीं. २३

वचन सुधेचे करवर्षण तूं, नाचेनचि हर्षें !
जशी मयूरी होउनि मत्ता मेघ जधीं वर्षे. २४

गुर्वादेशें जासी विपिनीं घेउनि गोवृंद,
दूर एकला फिरशी बहुदिन जेव्हां स्वच्छंद— २५

विरहाग्नीनें व्यथित होउनी रडली तैं तारा,
अनुदिन; सांगूं कुणास तें मी मन्मानसचोरा ? २६

गुरूपत्नी मी म्हणुनी मजला करिसी जैं नमन,
वाटे मजला तुझ्या कृतीचें करितां तैं मनन-- २७

" मानधना ? मीं युवती, स्वामी तूं मत्प्राणाचा !
मानभंगभय धरुनी चित्तीं, नमिसी मज साचा ! २८

भोजन होतां आचमना जळ आणाया जासी,
हळुच तुझ्यास्तव नेउनि ठेवीं नाना वस्तूंसी. २९

शयनागारीं तांबुल, सुमनें सुरभि कुशस्थानीं,
ताराकान्ता ! स्मरतें कां तुज ठेवियलीं कोणी ? ३०

कोमल कमळाहून जयाचीं गात्रें सुकुमार,
तृणशयनीं त्या पाहुनि, होई खेद मना फार. ३१

मृदुल म्हणोनी, रचित असें मी शय्या कुसुमांची;
तैं वाटे जें मनास, कोठुनि ओळख तुज त्याची ? ३२

पूजेसाठीं आणायातें माल्यें जैं जासी,
ठायीं ठायीं नव पुष्पांचे बघसी तूं राशी ३३

हांसुनि वदसी " दीन दयाळू माता वनदेवी,
व्हावे मजला श्रम न म्हणोनी, जमवुनि हीं ठेवी. " ३४

परंतु तुजला सत्य कथा मी कथितें रे आतां
जाई सोडुनि शयन निशीथीं अपुलें मी नाथा ! ३५

विविध मनोहर वेंचुनि पुष्पें फिरुनी उद्यानीं,
ठायीं ठायीं ठेवियलीं मीं व्हावीं तुज म्हणुनी. ३६

जे जळबिंदू कुसुमदळांवर दिसले तैं स्वामी !
अभागिनीचे अश्रु अहा ते गळले ! कथितें मीं ! ३७

वेडी झालें त्वत्प्रेमाचा लागुनियां ध्यास,
प्रतिपुष्पातें वदलें जें जें काय कथूं त्यास ! ३८

वदें चंपका " वर्ण पाहुनी लाविल तुज हात
प्राणसखा मम, जेव्हां त्यांतें सांग अशी मात — ३९

' ज्या वरवर्णा पाहुनि झालों निष्प्रभ अभिमानें,
रुचिर वर्ण तो विवर्ण झाला तुझिया विरहानें ' ४०

मन्मन शरमे,–वदे कदंबा जें,–तें सांगाया !
सहज तुझ्या तें येइल ध्यानीं, रसिकांच्या राया ! ४१

मृगशिशु अंकीं धरिसी, परिसुनि लोकमुखीं वार्ता,
किति हरिणाचीं धरिलीं बाळें होउनि विरहार्ता ! ४२

दुर्दैवाची किती कहाणी सांगूं, तुज नाथा !
नकळे तुजला काय लिहूं मी भान नसे आतां ! ४३

तारा पाहुनि गगनीं माझा विव्हल हो प्राण !
मत्सर उपजे, भ्रमें सपत्नी मानुनि त्या जाण ! ४४

' झांकुनि टाकुनि कर रोहिणीच्या कांतीचा ऱ्हास ! '
म्हणुनी पाचारिलें कितीदां श्यामल मेघास ! ४५

ऱ्हदीं पाहुनी प्रफुल्ल पद्मा रम्य निशाकाळीं,
खुडुनि तयातें फेंकुनि देई रागें मी खालीं ! ४६

सरसी सन्निध पाहुनि तूतें, एकांतीं जाईं !
पडुनि भूतलीं अश्रुकणांहीं भिजवुनि मुख घेईं ! ४७

अभिमानें मी म्हणे ' दुर्विधे ! कां मम छलना ही ?
यौवन नाहीं, कां मजठायीं सुंदरता नाहीं ? " ४८

पूर्वकथा ही परी स्मरोनी लाभ नसे आतां,
कधीन अनुकुल येईल जेव्हां काळ मला, नाथा ! ४९

सुदक्षिणेतें देउनि सोमा ! गुरुमन तोषविसी !
गुरुपत्नी ही मागे भिक्षा दे इतुकी तिजसी ! ५०

अहर्निशीं मी छायारूपें राहिन तुजपाशीं,
दासीभावें दिवानिशीं तव सेविन चरणांसीं ! ५१

गतजन्मीं मी नकळे केलें काय तरी पाप,
असा विधीनें म्हणुनी लिहिला भालीं मम ताप. ५२

ऋषिवंशीं मम जन्म असोनी, चांडाळिण झालें !
अमरतरूतें हरहर ! कैसें विषमय फळ आलें ! ५३

कोकिळनीडीं कुणीं ठेविला काकशिशू न कळे !
पापजळाचा प्रवाह कैसा गंगाजळिं मिसळे ! ५४

पंजरमुक्ता मैनेतें का फिरुनि रुचे कारा ?
या हो नाथा ! या दीनेतें प्रेमें स्वीकारा ! ५५

विहंगराजा ने मज उडुनी कुंजवनीं जाऊं !
प्रणयकांक्षिणी तव पद सोडुनि कोठें मी राहूं ? ५६

जेथें जाशी येईन तेथें करीन जें करिसी !
तनु-मन-धन मम अर्पियलें मीं प्राणसख्या ! तुजसीं ! ५७

' शशी कलंकी ' लोकीं ऐसें वदती जन तुजला,
कलंकिनी कर या तारेला, कुळधर्म त्यजिला ! ५८

येरे सत्वर तारारमणा ! तुजविण तळमळतें !
कानन जैसें दावाग्नीनें, विरहें मी जळतें ! ५९

करितां सेवा तुझी चकोरी अमृत तिला देसी,
अभागिनीवर सुधाकरा ! कां अदय असा होसी ? ६०

सरोजिनीचें काय तपोबळ म्हणुनी तिशीं रमसी ?
करिन तपा त्या अन्न वर्जुनी सांगें तूं मजसी ! ६१

असेल हृदयीं दया दयाळा ! सत्वर तर येईं ?
नवयौवन हें वन्यसुमासम सुकतें मम पाहीं ! ६२

गुप्तपणें निजवैभव अर्पी सिंधूतें गंगा,
नवयौवन हें अर्पिन तैसें तूतें श्रीरंगा ! ६३

जाउनि विपिनीं सुमवृंतें मी लिहिलें या पत्रा
नयनकज्जलें, लाजत लाजत भयकंपित गात्रा ! ६४

दासीनें या काय लिहावें याहुनि ? ती अज्ञ !
असेल झाली चूक, दयाळा ! क्षम तूं सर्वज्ञ. ६५

काय मनानें कथिलें ! लिहिलें लेखणिनें काय ?
भान न मातें येरे नाथा ! दाव तुझे पाय ! ६६

दोषांची तूं क्षमा करीं मम सकळ, दया सिंधो !
येथिल सन्निध म्हणेन तेव्हां ' क्षमिलें मज ' इन्दो ! ६७

तारा नाथा ! याहुनि सांगूं कायचि; मी दीन !
जगणें मरणें माझें आतां तुझिया आधीन ! " ६८

लिहिली ताराप्रणयपत्रिका वंगज कविरत्नें,
माधवानुजें रूप मराठी तीस दिलें यत्नें. ६९

१९१२.

---

## ११९. शकुंतलेची प्रणयपत्रिका.

शकुंतलेच्या लावण्यावर मोहित होऊन दुष्यंत राजानें तिच्याशीं गांधर्व विवाह केला. विवाहानंतर राजा स्वदेशी परत गेला. कांहीं काळानें त्याला शकुंतलेचा विसर पडला. त्या प्रसंगास उद्देशून खालील पत्रिका शकुंतलेनें दुष्यंत राजाकडे पाठविली आहे.

" राजेन्द्रा तुज नमन करी ही दासी वनवासी,
कशी जहाली विस्मृति माझी तुझिया हृदयासी ? १

विसर न मातें होय परी तव, जों देहीं प्राण !
हृदय न माझें माझ्या पाशीं, पायांची आण ! २

आशेच्या मी लागुन नादीं, वेडी हो झालें !
होतां कांहीं भास मनातें नाथ गमे आले ! ३

धूलिराशितें बघतां गगनीं, श्रवतां स्वन कानीं,
वाटे सेना घेउनि आलें न्याया मम कोणी ! ४

उत्सुक होउनि दर्शन घ्याया शशिचें जणु राका,
अनुसूयेतें प्रियंवदेतें मारितसें हांकाः-- ५

पहा सख्यानो ! अहा ! उदेला दिन हा सोन्याचा;
स्मरण जहालें स्वामीतें मम, अनुभव ये साचा. ६

परी क्षणार्धें होय निराशा येईना कोणी !
अभागिनी मी रडें अहाहा ! स्फुंद स्फुंदोनी ! ७

प्रथम पूजिलें पदयुगुलातें जेथें अपुल्या मीं,
कुंजवनीं त्या जाऊन फिरतें व्यग्रमनें स्वामी ! ८

फुलें प्रफुल्लित मुकुलित लतिका बघतें नयनांहीं;
स्वन पवनाचा, अलिगुंजारव कर्णीं मम येई. ९

नाद झऱ्यांचा झुळझुळ, तरूंच्या मर्मर पर्णांची,
कपोत निस्वन निजकांतेच्या प्रेमा जो याची. १०

परिसुनि कोकिलकूजित करित प्रश्ना मी त्यालाः--
' पिका कशाला गासी ? कसला हर्ष तुला झाला ? ११

मधु मदनाचा दास, मधूच्या तूं रे आधीन,
मदन मोहिला ज्यानें त्याविण विफल तुझें गान ? ' १२

अलिगुंजारव ऐकुनि वाटे रडते वनदेवी
मृदुस्वरें, मज दुःखित पाहुनि माय मला जेंवीं. १३

स्रोतोनादां श्रवुनी गमतें, तुजला भूपाळा !
देव वनाचा निंदी, क्रोधें देइल शापाला. १४

सरस जोंवरी रमेल तुजशीं मारुत आनंदीं
शुष्कचि होतां देइल फेकुनि तुजला तो छंदी !' १५

वदतें ऐसें मी पर्णातें उद्देशुनि वाता;
पवनें पर्णा, तुवां तसें कां त्यजिलें ? मज नाथा ! १६

भ्रांतमनें मी डोळे मिटुनी बसतें तरुखालीं,
बघेन केव्हां पदपद्मातें उत्कंठा झाली. १७

नाद पदांचा परिसुनी नाचे उल्हासें हृदय,
नेत्र उघडितां होय निराशा, छळितो विधि अदय. १८

सन्निध आल्या कुरंगिनीतें लोटितसें दूर,
रागें तिजवर अपशब्दांचा करितें भडिमार. १९

उच्चरवें मी वदतें ' भृंगा ! ये अधरीं बैस !
मज रक्षाया येइल फिरुनी पूरुकूलोत्तंस !' २०

मधुलोभी अलि कशास येतो नीरस मुख माजें !
पुष्प वाळलें फेंकुनि देती, आदरिती ताजें. २१

जेथें लिहिलीं प्रेमभरें मी कमलदलीं गीतें,
येउनि जेथें तुवा निवविलें विरह ज्वालेतें ! २२

लतामंडप स्मरतो का तो प्राणसख्या ! तू तें ?
जाऊनी तेथें रडतें, लिहितें शोकाची गीतें. २३

कर जोडोनी प्रभंजनातें, वदतें मी त्यासीं:—
‘ ने ही माझी विरह पत्रिका राजपदापाशीं. ’ २४

कधीं कुरंगा संबोधुनी मी प्रार्थितसें त्याला:—
‘ वायुगतीनें जाउनि दे ही गीती नाथाला. २५

आशैशव मी पोशियलें तुज यत्नें मृगबाळा !
स्मर उपकारा प्राण नकोसा विरहें मज झाला ! ’ २६

दुर्दैवाची कथूं कहाणी किति मी भूपाला !
सखीद्वयाविण माहित नाहीं अन्या कवणाला. २७

प्रियंवदा सखि अनुसूयाहि येतां मजपाशीं
मुग्ध बसें मी, पाहुनि मातें खेदाचि हो त्यांसी. २८

पाहुनि मजला दुःखित, तुजला निंदिति ऋषिबाला;
मर्मीं त्यांचे शब्द झोंबती जणु हृदयीं भाला ! २९

जितकीं म्हणुनी परिचित विपिनीं स्थानें मी फिरतें;
रडतें, कढतें दुःखावेगें, स्मरुनी तुज झुरतें ! ३०

तो तरु ! जेथें गुप्तपणें त्वां नाथा ! मज वरिली !
निकुंज ! जेथें सुमशय्येवर नव रजनी सरली; ३१

प्रवेशितां त्या गेहीं उठती जे हृदयीं भाव,
मनीं विचारुनि पहा नरेन्द्रा ! राग पुरे, पाव. ३२

अदय विधात्या ! तुझ्या मनीं रे कपट किती हाय !
प्रेम तरूतें हरहर ! यावीं विषम फळें काय ? ३३

अशा प्रकारें नित्य भ्रमतें विपिनीं प्राणेशा !
जरी गौतमी नसती, नव्हती जगण्याची आशा. ३४

वेणीफणिची हौस न वाटे तिळभर हृदया या,
मलिन वल्कलें नेसुनि राया ! झांकितसें काया. ३५

अन्नावर मन कधीं न जाई, न रुचे मज कांहीं
शून्य मनस्का होउनि फिरतें हाय ! दिशा दाही ! ३६

दुःखें सोडुनि दीर्घश्वासा ढळढळ मी रडतें,
ज्ञानविहीना मूर्च्छित होउनि भूमिवरी पडतें. ३७

मधेंच नाथा ! नयनमनोहर दिसते तव मूर्ति,
आलिंगाया पदपद्मातें करितें कर वरती. ३८

भासाचि केवळ होय निराशा हरहर ! हृदयाची—
पाप कोणतें केलें नकळे ! कां विधि मज जाची ? ३९

विरामदात्री निद्रा रात्रीं येतां मज थोडी,
अनुभवितें जें स्वप्नीं त्याची काय कथूं गोडी ! ४०

बघतें सुंदर राजहर्म्य मी—रचिला रत्नांहीं,
द्वारीं झुलती हत्ती, सीमा यद्रूपा नाहीं ! ४१

नाना कनकासनें मनोहर सुमशय्यास्थानें,
फिरती दासी चंचल चपला जणु सौंदर्यानें ! ४२

ठायीं ठायीं नव मुक्तांचे पाहतसें राशि,
ध्वनि वीणेचा श्रवतें, घेतें गंधामोदासी. ४३

सुवर्णसिंहासनीं पाहतें तुजला नृपनाथा !
राजदण्ड तव करीं, शोभतें छत्र तुझ्या माथां. ४४

समुद्रवलयांकिता क्षिती, तव नत झाली चरणीं;
जागृत होतां रडतें नाथा ! हें सारें स्मरुनी. ४५

भूपाळा ! तव देवेन्द्रासम महिमा ऐश्वर्य
अतुल जगीं या, मानधनी तूं असशी नृपवर्य. ४६

परी नको तें कांहीं ! मजला चाड न विभवाची;
घडो संगती तव चरणांची, इतुकें मी याची. ४७

मी वनवासी, वल्कलवसना, फळमूळाहारी,
राजभोग ते नकोत मातें नच ते सुखकारी ! ४८

कलाधराशीं रमे रोहिणी संतत आकाशीं
परी कुमुदिनी पूजितसे या भूलोकीं त्यासीं ! ४९

दासी म्हणुनि राखा मजला निजचरणांपाशीं,
येवो करुणा या दीनेची तुझिया हृदयासी ! ५०

बाळपणीं मम सोडुनि गेलीं पितरें मजलागीं,
परान्नपोषित जगलें कां मी हर हर हतभागी. ५१

शकुंतलेचा काय तरी या झाला अपराध ?
तरुणपणीं मज टाकुनि कसला साधियला वाद ? ५२

सौख्य विहंगम बसला मानुनि नीडचि मम हृदय
व्याधमिषें कां वधिलें त्यांतें, भूपाळा ! अदय ! ५३

म्हणती असती क्षत्रकुळीं तूं बाहुबळ श्रेष्ठ,
काय लाभलें यश तुज, देउनि अबलेतें कष्ट ? ५४

कण्वतात मम येतिल आतां विपिनीं जैं फिरुनी,
काय तयांतें सांगूं ? सांगा मजसि दया करुनी. ५५

प्राणेशा ! तुज निंदिति जेव्हां बोलुनि ऋषिबाला—
काय कथूं मी ? नाथा ! कैसें शांत करूं त्यांला ? ५६

व्याकुळ झालें हृदय वियोगें तुझिया, मम नाथा !
समजावूं मी कसें तयाला ? सांग झणीं आतां ! ५७

माहित नाहीं यावें कैसें राजसभेमाजीं,
वनचर मी, मज मान्य करावी, विनती ही माझी. ५८

जळांत बुडतां सूक्ष्म तृणाचा जन घे आधार,
त्यजिली कवणें स्वप्राणांची आशा अनिवार ? " ५९

' शकुंतलापत्रिका ' लिहियली वंगज कवि रत्नें;
' माधवानुजें ' रूप मराठी तीस दिलें यत्नें. ६०

कल्याण, १९१३.

## १२०. तेव्हां आणि आतां.

अनुभव गुरु झाला, मनींचा मोह लया गेला.
बाल्यीं असतां मी, अहा तो काळ किती नामी
जग हें आनंदी, मानुनी रमलों स्वच्छंदीं
आनंदाचा आज परी त्या भास न हृदयाला. १
खेळगडी नाना, जमवुनी हृदय दिलें त्यांना
मित्रप्रेमाला, वाटलें पूर जणो आला
हरहर त्यांतील मित्र एकही आज न कामाला. २
पितरांची प्रीति, मजवरी प्राणाधिक होती
बंधू भगिनींचा, मजवरी लोभ गमे साचा
स्वार्थी त्यांचें प्रेम परी तें प्रत्यय मज आला. ३
विद्वत्ता मोठी, मिळवुनी देशहितासाठीं
तनु मन धन अपुलें, वाहुनि घ्यावें म्हणुनि भलें
आशा केली व्यर्थचि गेली धिक् मज मूढाला. ४
सिंहाची शक्ति, वाटलें बाल्यीं मज होती
उंच उंच नाना, कल्पना करिती उड्डाणा
तेव्हां आतां ताडुनि बघतां बदल किती झाला. ५
बाल्यींच्या आशा, भयंकर चेटकिणी विवशा
मोहाचें जाळें, पसरुनी करिती वाटोळें
मोहित होउनि फसतो मानव करितो दुःखाला. ६

कल्याण, १९१४.

# १२१. नैवेद्य.

जे सृष्टींत अहर्निशीं परिसतों मी मंजु नाना स्वन
होते मोहित चित्तवृत्ति मम जें ऐकोनियां गायन;
तन्माधूर्य रूचीचिया अनुभवा घेतां मनापासुनी
आधीं अर्पिन मी तुला प्रभुवरा नैवेद्य तीचा ह्मणी. १

सौख्य स्पर्श तनूप्रती निशिदिनीं होतात जे माझिया
गात्रांचा मम ज्यामुळें सकलही संताप जाई लया;
तत्सौख्या उपभोगितां अनुपमा हर्षे मनापासुनी
आधीं अर्पिन मी तुला प्रभुवरा नैवेद्य त्याचा ह्मणी. २

रूपें जी रमणीय मी बघतसें सृष्टींत नानापरी
ज्यांची सुंदरता बघोनि नयनीं आल्हाद हो अंतरीं;
तत्सौंदर्य सुखाचिया अनुभवा घेतां मनापासुनी
आधीं अर्पिन मी तुला प्रभुवरा नैवेद्य त्याचा ह्मणीं. ३

जे जे सद्रस पुष्टिदायक असे आहेत वस्त्वंतरीं
ज्यांची चाखिलिया रुची सुमधुरा तृप्तीस जिव्हा वरी;
ती नाना रसमाधुरी प्रतिदिनीं आस्वादितां भोजनीं
आधीं अर्पिन मी तुला प्रभुवरा नैवेद्य तीचा ह्मणीं. ४

जो पुष्पांत वनस्पतीस विलसे सद्गंध रात्रंदिन
ज्याचें सेवन केलिया क्षणभरी हो घ्राण संतर्पण;

ऐसा सौरभ सेवितां मधुर तो हर्षं मनापासुनी
आधीं अर्पिन मी तुला प्रभुवरा नैवेद्य त्याचा क्षणीं. ५

जे जे प्राप्त सुखोपभोग मजला होतील दैवें जनीं
आधीं ते तुजला निवेदुनि तयां सेवीन मी मागुनीं;
तूतें अर्पियल्याविणें प्रभुवरा लोकीं सुखा सेवणें
ऐशी नीच कृतघ्नता नच शिवो त्याहून जावो जिणें. ६

कल्याण, १३ फेब्रुआरी, १९१४.

---

## १२२. वाणीचा उपयोग.

येती अहर्निश विचार मनांत नाना
सांगावया सकळ ते निज बांधवांना;
वाणी दिली सुलभ साधन ईश्वरानें
केले जगावर किती उपकार त्यानें ! १

चित्तीं विचारुनि करा उपयोग तीचा
कामीं अयोग्य अपुली शिणवा न वाचा;
आलें मुखीं वचन तें सहसा न बोला
घेतां न ये परत शब्द निघोनि गेला. २

वाणीमधें प्रबलशक्ति करी निवास
वाणी शुभाशुभ समर्थ करावयास;

वाणी कुणा हंसविते रडवीहि कोणा
दे सौख्य दुःख अथवा जगतीं जनांना. ३

जे शत्रु ते तिजमुळें निज मित्र होती
जे मित्र ते विषमवैर जगीं करीती;
ती चेतवी निजबळें मृतकल्प त्यांना
ती मारिते गरल घालुनि जीवमाना. ४

आहे अलौकिक अशी वचनांत शक्ति
बोला जपूनि शिशुनो म्हणुनी सदुक्ति;
उद्वेग जें उपजवी न मनीं पराचे
ऐसे वदा वचन संतत आत्मवाचे. ५

जो सत्यपूर्ण असुनी प्रिय हो जनांतें
जी ऐकिल्यास हितकारक नित्य होते;
वाणी अशी वदुनि व्हा प्रिय सर्व लोकीं
या बोलतात तप—वाङ्मय जे विवेकी. ६

कल्याण, डिसेंबर, १९१४.

## १२३. भूत भविष्य आणि वर्तमान.

‘ गेले जे दिन ते अहा किती तरी होते सुहाने मम !
चिंता ना शिवली मना विहरलों स्वच्छंद पक्ष्यासम;
मातें उत्तम लाधता जर पुन्हां तो काळ होतें बरें ! ’
चित्तीं आणुनि भूतकाळ अपुल्या ऐसें कुणी उद्गरे. १

‘ सौख्याचा उगवेल वासर उद्यां आनंददायी मना
चिंता जाउनियां पुरेल मनिंची माझ्या तदा कामना;’
कोणी होउनी मानसीं अपुलिया सौख्यार्थ उत्कंठित
ऐसें वाक्य वदे मनीं स्मरुनियां हर्षे भाविष्याप्रत. २

वाटे मंगल काल अन्य न मला या वर्तमानासम
याचें स्वागत मीं सदा करितसें हा काळ सर्वोत्तम
गेला तो न बरा पुढें नच कळे येईल कैसा तरी
सौख्याचा दिन आजचा म्हणुनि मी आलिंगितों सत्वरी. ३

कल्याण, १९१५.

---

## १२४. श्रेष्ठ ज्ञान.

द्वारीं भिकारी मम एक आला
देऊनि त्या मी धन तोषवीला,
तें संपतां तो परते फिरून
होता तसा वस्त्रविहीन दीन. १

त्याची स्थिती पाहुनि दीन फार
आत्मोन्नतीचा कथिला विचार,
ध्यानीं तया याचक पूर्ण घेई
तेथूनिया शीघ्र निघोनि जाई. २

म्यां पाहिलें त्या मग दीर्घ काळें
स्वरूप त्याचें दिसलें निराळें,
विचारभिक्षा फळली तयाला
सतेज संपन्नचि तो जहाला. २

होई विचारें नर रंक राव
आहे तयाचा अतुल प्रभाव,
जाई विचार प्रळया कधीं न
लोकीं असे श्रेष्ठ विचार ज्ञान. ४

कल्याण, १९१५.

---

## १२५. गीतांजलि.

प्रसिद्ध बंगाली कविवर श्रीयुत बाबू रवींद्रनथ टागोर यानीं 'गीतांजली' नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. त्याच त्यांनी स्वतःच केलेलें इंग्रजी गद्य भाषांतर वाचून त्यावर पाश्चिमात्य कवि व रसिक विद्वान् किती मोहित झाले आहेत हें वर्तमान पत्रांच्या वाचकांस नव्यानें सांगण्याची गरज नाहीं. अशा सर्वमान्य ग्रंथाचा मराठी वाचकांस अल्पांशानें तरी रसास्वाद घेतां यावा, म्हणून मूळ बंगाली गीतांजलीवरून हीं खालील पद्यें लिहिलीं आहेत.

[ १ ]

हें सान सुमन तूं सत्वर घेई खुडुनी
जाईल थांबतां मातीमध्यें पडुनी;
जरि मिळे न यातें स्थान तुझ्या सुमहारीं
निजकरें दुखवुनि देवा या स्वीकारी.

दिन सरुनी न कळत होइल संध्याकाळ
जाईल निघोनी तव पूजेचा वेळ;
सुमनोहर रंग न याचा ! हें खरें
वास ये यास बेताचा ! हें खरें
तरि यास मान सेवेचा ! दे त्वरें
जों काल न गेला घेई त्यातें खुडुनी
जाईल थांबतां कोमेजुनि हें पडुनी.

[ २ ]

जेव्हां खेळत मी असें तुजसवें स्वच्छंद नानापरी
केला प्रश्न न कोण तूं म्हणवुनी केव्हाहि तूतें हरी;
लज्जा भीति तदा मनांत न वसे चिंता नसे अंतरीं
होता वाहत जीवितौघ मम हा प्रक्षुब्ध सिंधूपरी.

होता रम्य उषा स्वयें उठविसी निद्रेंतुनी तूं मला
घेऊनी अपुल्यासवें भ्रमसि तूं मातें वनीं एकला;
तैं गानें म्हटलीं तुवां समजलीं नाहींत मातें जरी
त्याचा काढुनि मी प्रतिध्वनि सख्या नाचें उडें भूवरी !

झाला खेळ पुरा अहा बघतसें मी काय हें लोचनीं
स्तब्ध व्योम विशाल हे रविशशी निःशब्द ही मेदिनी;
लावूनी नयनद्वया अपुलियां त्वत्पादपद्माकडे
सारें विस्मित विश्व हें तुजपुढें राहे उभें बापुडें !

[ ३ ]

जैं जीवनौघ मम होइल शुष्क साचा
वर्षाव तूं कर झणी करुणारसाचा;
गेली जरी मधुरता सगळी लयातें
येऊनि गा मज सुधेसम गोड गीतें.

होऊनिया प्रबल कर्म जधीं मला तें
पाडील बद्ध करूनी तव विस्मृतीतें;
ये ईश्वरा त्वदिय घेउनि दिव्य शांति
मोहांतुनी मम झणी करण्यास मुक्ति.

माझें जधीं कृपण हें मन शक्तिहीन
भीरूपरी बसतसे असहाय दीन;
ये द्वार तैं उघडुनी हृदयांत देवा
जैसा प्रवेश नगरींत नृपें करावा.

जैं वासना प्रबल होउनि, मोहजाळीं
घाली मनास, न सुचे मति मंद झाली;
हे पावना त्वरित घेउनि ये प्रकाश
माझ्याकडे, कर झणी मम मोहनाश.

[ ४ ]

उठति मेघ नभीं वरचेवरी
हळुहळू पसरे तम भूवरी;

बघत वाट बसूं किति एकला
जिवलगा तव मी न कळे मला. १

करितसें व्यवसाय जनांसवें
समय जाय तदा निघुनि जवें,
परि अतां तिमिरावृत या दिनीं
कवणही न सख्या तुजवांचुनी. २

जरि तुवां मजला अवहेलुनी
मुख न दावियलें अपुलें झणी,
तर कसा तिमिरावृत काळ हा
निघुनि जाइल हें नकळे अहा. ३

बघत शून्य सुदूर नभाकडे
हृदय हें भ्रमतें मम बापुडें;
तरल होय मरुल्लहरीपरी
बघुं सख्या तव वाट किती तरी. ४

[ ९ ]

गुणालया तूं करिसी कैसें गान कळेना तरी
परिसतों विस्मित मीं अंतरीं. ॥ ध्रु० ॥

तव गानाचें दिव्य तेज या दीप्त जगातें करी
गगन हें स्वरलहरींनीं भरी.

तव गानाचा पवित्र निर्झर कठिण शिळा भेदुनी
वाहतो वेगें भुवनांतुनी.
गान करावें तुझ्या संगतीं येतें माझ्या मनीं
निघेना सूरचि कंठांतुनी. ।। चाल० ।।
यत्नें काढितसें मी स्वर
परी तो बेसुर ये बाहिर
तव गानाच्या अनंत जाळीं फसलों विहगापरी
जाहली कुंठित मम वैखरी. १

[ ६ ]

ज्यांचा माझा परिचय नसे स्नेह त्यांशीं जहाला
मातें लाधे स्थल परगृहीं, त्वत्कृपा ही दयाळा;
दूरस्थां त्वां सदयहृदयें आणिलें एक ठायां
पूर्वीं होतां परजन तया बंधु केलेस राया. १

जेव्हां येई निजगृह मला सोडण्याचा प्रसंग
कैशी होय स्थिति म्हणुनि हें भीत हो अंतरंग;
जें जें लोकीं नव दिसतसे त्यांत राहे पुराण
तेथें तूही वससि सदया राहतें हें न भान. २

योनीमध्यें बहुविध मला घालुनी जन्म देसी
ज्या ज्या लोकीं अनुभव नवे लाविसी घ्यावयासी;
तेथें तेथें मजसि दिससी तोच तूं मित्र माझा
त्वत्साह्यानें मम परजनीं होतसे स्नेह ताजा. ३

ज्यानें तूतें विनतशरणा ! जाणिलें त्यास नाहीं
कोठें कांहीं म्हणुनि परकें या जगीं सर्वदाही;
माझी आहे तुजसि सखया प्रार्थना एक शेखीं
मातें व्हावा विसर न तुझा, एक जो तूं अनेकीं. ४

[ ७ ]

जरी करिसि तूं सख्या मजसवें न संभाषण
तुझें भरुनि मौन मी स्वहृदयीं तया साहिन;
सतारक जशी निशा अवनतानना तीपरी
प्रशांत हृदयें तुझी करिन मी प्रतीक्षा हरी १

सरेल रजनी उषा करिल दीप्त ही मेदिनी
सुदिव्य मधुरा गिरा तव निघेल खा भेदुनी;
प्रतिध्वनि तिचा उठे सकल पक्षिनीडांतुनी
मधुस्वन तिचा अहा विकसवील पुष्पें वनीं. २

[ ८ ]

येतां संकट रक्षि तूं मज न ही माझी तुला प्रार्थना
वाटेना मजला विपद्भय असें दे धैर्य माझ्या मना;
दुःखापासुनि ताप हो न करिसी त्याचें जरी सांत्वन
मी दुःखावर मेळवीन विजया ऐसें करी मन्मन. १

कोणीही मज संकटांत नच ये साह्या कराया जरी
माझें होय न अंगिचें बल कमी ऐसें प्रभो तूं करी;

संसारांत न ये जरी यश मला झाली पुरी वंचना
त्याचें अल्पहि दुःख होउ न मला ऐसें करी या मना. २

माझें त्राण करीं न ही प्रभुवरा माझी तुला प्रार्थना
मी जाईन तरूनि ही भव नदी दे शक्ति ऐशी मना;
माझा भार करोनि फार हलका त्वां सोत्विलें ना जरी
सारा भार सहावयास मजला सामर्थ्य दे श्रीहरी. ३

संसारीं मज लाधलें जर कधीं प्रारब्धयोगें सुख
ध्यावें ओळखुनी तुझें प्रभुवरा म्यां नम्र भावें मुख;
दुर्दैवें जर दुःखभोग घडला हो पूर्ण ना कामना
स्पर्शो त्वद्विषयीं न संशय कधीं हे ईश्वरा मन्मना. ४

[ ९ ]

या जन्मीं जर ईश्वरा मज नसे होणें तुझें दर्शन
नाहीं तें घडलें सदैव म्हणुनी दुःखें झुरे मन्मन;
याची विस्मृति ना पडो क्षणभरी मी या जगीं जोंवरी
राहो जागृत भावना निशिदिनीं ही माझिया अंतरीं. १

बाजारीं बसुनी अनेक करुनी व्यापार रात्रंदिन
झालें प्राप्त जरी अपार मजला प्रारब्ध योगें धन;
कांहीं मेळविलें न मी मज सदा वाटो जगीं जोंवरी
राहो जागृत भावना निशिदिनीं ही माझिया अंतरीं. २

मार्गातें क्रमितां जधीं थकुनि मी बैसें तरूच्या तळीं
ध्याया विश्रम टाकुनी क्षणभरी कंथा जुनी आपुली;
आहे दीर्घ मला अजूनि पुढती जाणें क्रमूनी पथ
याची विस्मृति ना पडो मनिं वसो ही भावना संतत. ३

यानें भूषविलें गृहास अपुल्या नाना कला मोजुनी
चाले हास्य विनोद मंजुल निघे सर्वत्र वंशीध्वनि
नाहीं मी सदनीं तुला प्रभुवरा पाचारिलें त्यापरी
याची विस्मृति ना पडो मज, वसो ही भावना अंतरीं. ४

[ १० ]

आलों येथें मी प्रभुराया गाया तूतें गान
जगन्मांदिरीं तुझिया मजला देईं अल्पस्थान. १

नाहीं तुझिया भुवनीं मजला काज दुजें या आतां
गीतस्वर मी स्वच्छंदानें काढित राहिन नाथा. २

तव पूजेचा समय जधीं ये शांत निशीथीं राया
करी सत्वरी या दासातें आज्ञा तेव्हां गाया. ३

प्रभातकालीं निघेल जेव्हां सुंदर वीणासूर
बोलावुनि घे सन्निध देवा ठेवुं नको मज दूर. ४

[ ११ ]

करिसि मजासि आज्ञा गान जैं गा म्हणोनी
हृदय सदभिमानें जाय माझें भरोनी;

बघुनि तव मुखातें होतसे हर्ष फार
खळखळ नयनीं या लोटतो बाष्पपूर. १

कठिन कटु वसे जें माझिया सर्व देहीं
त्वरित विलय पावे गानमाधुर्यडोहीं;
जलधिवरुनि हर्षें जातसे पक्षि जेंवी
उडत तुजकडे ये भक्ति मत्प्रेम तेंवी. २

तुजसि बहुत माझें आवडे नम्रगान
परिसुनि तव होती सर्वदा तृप्त कान;
म्हणुनि तुजपुढें मी गायकाच्या मिषानें
बसुनि म्हणतसे हें ईश्वरा नित्य गाणें. ३

जरि मम मनिं आलें स्पर्शणें शक्य जें न
चरण तव दयाळा, त्यां करी स्पर्श गान;
विसरुनि अधिकारा दंग होऊनि नामीं
प्रभुसि चुकुनि माझ्या ' बंधु ' संबोधितों मी. ४

[ १२ ]

जननि दुःखें गाळूनि अश्रुनीर
तयाचा मी गुंफीन तुला हार;
तुझी स्थाली गे स्वर्णभूषणाची
वरिल शोभा त्यामुळें अधिक साची. १

चंद्रसूर्यहि तारका असंख्यात
तुझ्या चरणीं नूपुरें चमकतात;
परी दुःखाचा मदिय अलंकार
तुझ्या वक्षातें शोभवील फार. २

अखिल वैभव धनधान्य सर्व कांहीं
तुझ्यापासुनि मनुजास लब्ध होई;
जरी तुजला वाटलें मला देई
मनीं नसलें तर जननि सकल नेई. ३

परी दुःखाचा मीच असें स्वामी
तुला अर्पितसें जननि तें जधीं मी;
कृपा करिसी स्वीकार करुनि त्याचा
हाच वाटे अभिमान मला साचा. ४

[ १३ ]

( चाल—उद्धवा शांतवन )

जें गान गावया आलों गाउनि तें अजुनि न झालें
जुळविण्यांत वीणातारा सकलायु लयाला गेलें ॥ ध्रु० ॥

परि तारा जुळल्या नाहीं सूर न ते मिळुनी आले
लाधावें गाणें म्हणुनी व्याकुल हें चित्त जहालें;
पुष्प नसे विकसित झालें वायूनें केवळ हाले
परिसिली न त्याची वाणी नच मुखावलोकन केलें;

मत्सदनावरुनी जातां तच्चरणध्वनीतें श्रविलें
बाळण्यांत आसन त्याला दिन सर्व लयाला गेलें. ॥ चाल ॥

परि दीप लावला नाहीं
बोलावूं कैसा गेहीं
तद्दर्शन हो आशा ही
परि अजुनी नाहीं घडलें. १

[ १४ ]

मार्गी शून्य नदीतटीं हळुहळू रानांतुनी एकली
जासी घेउनि दीप गे कवण तूं झांकुनि त्या अंचलीं;
देई दीप मला तुझा गृह असे माझें तमें व्यापिलें
बाला पाहुनि यापरी तिजसी मी साश्चर्य जिज्ञासिलें. १

नेत्रीं सुंदर पाहुनी मजकडे मंदिप्रकाशांतुनी
बोले ‘ दीपविसर्जनास सालेलीं मी चाललें या क्षणीं ’
बालेचें वच ऐकुनी क्षण उभा मी राहिलों पाहत
गेला दीप कुठें तरी झरझरा ओघासवें वाहत. २

“ बाले दीप तुझे समस्त असतां लावूनि झाले घरीं
कोठें घेउनि चाललीस फिरुनी दीपास या तूं करीं;
माझें व्याप्त असे अगार तिमिरें दे दीप हा तूं मला ”
होतां रात्र हळुहळू फिरुनिया मीं प्रश्न केला तिला. ३

पाहोनी मज बालिका क्षण मनीं आशंकुनी बोलली
“ अर्पाया गगनास दीप मम हा मी पातलें या स्थळीं; ”
बालेचें वच ऐकुनी क्षण उभा मी राहिलों पाहत
होता दीप तिचा वृथा जळत तो शून्यावकाशीं स्थित. ४

“ दीपातें हृदया समीप धरुनी कोणास तूं शोधिसी
माझें व्याप्त असे तमें सदन गे दे दीप तूं हा मशीं;
रात्रीं द्विप्रहरीं निशीथसमयीं अंधार जैं दाटला
बालेसन्निध जाउनी फिरुनिया मी प्रश्न केला तिला. ५

नेत्रीं रम्य पुनः बघोनि वदली ती बालिका सत्वरी
“ जातें घेउनि हा प्रदीप्त करण्या दीपावली साजिरी; ”
बालेचें वच ऐकुनी क्षण उभा मी राहियेलों तधीं
गेला दीप तिचा वृथा जळुनिया दीपांत लक्षावधि. ६

[ १९ ]

( अर्ध तनू वारुळीं— )

खटाटोप हा व्यर्थ कशाला करिसी वेडच्या नरा
पहारे उघडुनि नयनें जरा. ॥ ध्रु० ॥

देवगृहाचें द्वार लावुनी बैसुनिया आसनीं
कुणाच्या अससी रत पूजनीं !

भजन कुणाचें करिसी घेउनि वीणा अपुल्या करीं
परिसितो कोण तुझी वैखरी !

हातीं घेउनि माळ जपाची व्यर्थ मणी ओढिसी
कुणाचें नाम मुखीं काढिसी ?
नाहीं देव तुझ्यारे पुढें
भरला तमही चोंहींकडे
तिमिरीं बसुनी जीवित वाया घालविसी पामरा. १

लांगल घेउनि जेथ कृषीवल भूमी तेंनांगरी
शिलातें फोडुनि मार्गा करी,
ग्रीष्मर्तूच्या असह्य दाहीं अथवा जलवर्षणीं
करो तो श्रम कोठेंही जनीं,
वसे तयाच्या संतत सन्निध तो प्रेमें श्रीहरी
मलिन घे वसना अंगावरी,
व्हावा देव तुला तो जरी
टाकी शुचि वसनांतें दुरी
तत्सम धूलीमध्यें येरे श्रमण्या करुनि त्वरा. २

'मुक्ति मुक्ति' तूं उच्च रवानें निशिदिनिं आक्रोशसी
परी ती मुक्ति मिळावी कशी,
हर्षें प्रभुनें स्वीकृत केलें सृजनाचें बंधन
बद्ध तो प्राकृत जैसा जन,
पुरे ध्यान तव धूपदीप हीं माल्यें दे टाकुनी

सत्वरी ये बाहेरी जनीं,
न लगे वसन शुची संप्रती
लागो धूली देहाप्रती
रत हो कर्मी प्रभुच्या संगें कर्मयोग हा खरा ३

कल्याण.

कागद शाई वगैरे सर्व तऱ्हेचें
मुद्रणसाहित्य मिळण्याचें
विश्वसनीय ठिकाण
सुदामा पेपर मार्ट
जनरल पोस्टासमोर, फोर्ट, मुंबई